# प्रकरण तीन

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

### 3.425 सौर उर्जा पंप संच खरेदी करणेबाबत.

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी सन 2015-2016 या वित्तिय वर्षात सौर उर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजने अंतर्गत 7 नग सौर उर्जा पंप संच काही गावासाठी खरेदी केले असून त्यावर रक्कम रुपये 19,98,500/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/ भाग 111/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम क्रमांक 11 प्रमाणे वित्त विभागाकडून कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रकमा 15 मार्च नंतर मंजूर करण्यात येणार नसल्याने खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तूंची खरेदी वित्तिय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पूर्वीच करणे आवश्यक असताना ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी सौर उर्जा पंप संचाची खरेदीची प्रक्रिया वरील नियमाप्रमाणे न राबविता सदरची खरेदी नियमबाहयपणे दिनांक 31/03/2016 रोजी केलेली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सदर शासन निर्णयाचे पालन केलेले नाही. सदर नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2) कोळशी पाडोळे या गावास पुरवठा आदेश दिनांक 09/03/2016 रोजी दिलेला आहे. पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत म्हणजेच दिनांक 08/04/2016 पर्यंत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक असताना मालाचा पुरवठा दिनांक 17/06/2016 रोजी केल्याचे दिसून येते. म्हणजेच मालाचा पुरवठा विलंबाने केलेला आहे. मालाचा पुरवठा विलंबाने झाल्याचे निदर्शनास येऊ नये, याकरिता संबंधित ग्रामसेवक यांनी सदर दिनांकावर उप्परलेखन करुन माल दिनांक 17/03/2016 रोजी प्राप्त झाल्याचे दर्शविलेले आहे. यावरुन माल विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदर अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा सादर करावा.

3) झाडघर या गावासाठी सौर उर्जा पंप संचाचा पुरवठा आदेश दिनांक 09/03/2016 रोजी दिलेला आहे. पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. म्हणजेच दिनांक 08/04/2016 पर्यंत मालाचा पुरवठा करणे आवश्यक होते. तथापि, सदर पुरवठादाराने मालाचा पुरवठा दिनांक 21/06/2016 रोजी केला आहे. विलंबाने पुरवठा केल्याबद्दल रक्कम रुपये 14,275/- एवढी दंडाची रक्कम संबंधित पुरवठादार यांचेकडून वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

4) सौर उर्जा पंप संच कार्यान्वित केलेले फोटो उप अभियंता व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी साक्षांकित करणे आवश्यक असताना वरील सर्व सौर उर्जा पंप संचाचे फोटो साक्षांकित केलेले नाहीत.

5) मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम 2006, कलम 66 नुसार कमी वापरलेल्या मुद्रांक पेपरची किंमत रुपये 300/- संबंधित पुरवठादार यांचेकडून वसूल करुन शासनाकडे भरणा करावी.

6) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश क्रमांक नियो- 2014/ प्र.क्र.31/का.1(3) 1739/ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, दिनांक 28/03/2015 मधील अटी व शर्तीप्रमाणे खर्चाचा ताळमेळ, काम पूर्णत्वाचे दाखले आणि उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

### 3.426 मौजे कायरी भोयेपाडा येथील विहीर दुरुस्ती तालुका जव्हार

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर कामावर रक्कम रुपये 3,41,925 /- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय जिपर/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा देणे बंधनकारक आहे. सदर कामाचे कार्यादेश दिनांक 25/02/2015 रोजीचे असून वरील काम माहे जुलै 2015 मध्ये पूर्ण झालेले आहे. ठेकेदारांनी दिनांक 01/09/2015 रोजी म्हणजेच काम संपल्यावर कामगार विमा हप्ता भरणा केलेले आहे.

2) बाब क्रमांक 1 नुसार Dismenting strure stone masonary 32.97 घनमीटर काम केलेले आहे. (MB पृष्ठ क्रमांक 41 दिनांक 27/06/2015 नोंद) त्यातील किमान 40 टक्के Rubble वापर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. तरी 13.18 cmt डबर रूपये 300/- प्रमाणे रूपये 3,954/- ठेकेदाराकडून वसूल करून पूर्तता दर्शवावी.

3) सदर कामासाठी 240 तास डिझेल इंजिनाद्वारे Dewatering केलेले आहे. देयकासोबत लॉग बुकचा उतारा जोडणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

4) UCR M/15 M/20 ह्या दर्जाच्या कामासाठी कामाच्या परिमाणानुसार (UCR 72.37M/15 3.38 M/20-9-4 सिमेंट आवश्यकता 262 गोणी होती. ठेकेदाराने जव्हार येथील आर.के.लुलानिया यांचेकडून दिनांक 26/06/2015 च्या पावती नुसार 219 गोणी सिमेंट खरेदी केलेले आहे. त्यानुसार दिनांक 26/06/2015 च्या पावतीनुसार 43 गोणी सिमेंट सदर कामावर कमी वापर केलेला असल्याने सदर कामाचा दर्जा तांत्रिकरित्या उत्तम असल्याबाबत खात्री देता येत नाही.

5) सदर कामासाठी आवश्यक 262 गोणी सिमेंट एसीसी 219 गोणी सिमेंट वापर केल्याने सदर कामावर 43 गोणी सिमेंट कमी वापर केला आहे. बाबनिहाय यु सी आर एम 15 व एम 20 बाबीचा अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या दारात प्रमाण सेल्फीक साहित्य वाटप धरून डी एस आर दर निश्चित केलेला असून त्यांना देयकात अंदाजपत्रकामध्ये नमुद दरानेच देयक अदाईगी झालेले आहे. कमी वापर सिमेंट 43 प्रति गोणी रूपये 330/- नुसार रूपये 14,190/- जादा प्रदान झालेली रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

6) सदर कामासाठी डबर 79.6 सी एम टी 11.96 सी एम टी खडी 34.26 सी एम टी वाळू या गौण खाण खनिजाचा वापर झालेला आहे. ठेकेदाराने एकूण 125.82 सी एम टी रॉयल्टी कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे महसुली उत्पन्न बुडालेले आहे. तरी ठेकेदाराकडून 125.82 सी एम टी 10.67 दराने होणारी रॉयल्टी रक्कम रूपये 8,890/- वसूल करून महसुली भरणा करून पूर्तता दर्शवावी.

7) सार्वजानिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जी आर 34/ स. 4/ 5999 दिनांक 08/01/2007 नुसार साहित्य वापर करणेपूर्वी साहित्याची प्रयोग शाळेत चाचणी करून अहवाल प्राप्त झाल्यानंतर साहित्य वापर करणे आवश्यक आहे. असे असतांना सिमेंट रेती डबर साहित्य तपासणी वापरानंतर दिनांक 20/08/2015 केलेली आहे.

**3.427 मोखाडा येथे नळपाणी पुरवठा दुरुस्ती पाणी पुरवठा दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर कामावर रक्कम रूपये 24,92,302/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र क्र 23/ परास -7 दिनांक 30/10/2009 नुसार 1% विमा देणे बंधनकारक आहे. कामाच्या मुल्यांकनानुसार रूपये 24,923/- इतकी रक्कम विमा हप्ता भरणे आवश्यक असताना ठेकेदारांनी फक्त रूपये 10,419/- इतकी रक्कम विमा हप्ता भरलेली आहे. देयक अदागई करतांना देयकातून कमी विमा हप्ता भरणा रूपये 14,419/- देय असून कपात करून विमा हप्ता रक्कम भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता देयकाची अदागई केलेली आहे. तरी ठेकेदारांकडून विमा हप्ता भरणा करणे रक्कम रूपये 14,419/- वसूल करून शासन भरणा करावी.

2) बाब क्रमांक 2 Dismanting lonstruction Rcc E sR for 12M ह्यात किती लोखंड होते व त्याच्या भंगाराची हात किंमत जिल्हा दर सूची 12/13 प्रमाणे किती होती? ह्या बाबत प्राकलनामध्ये नोंद केलेली नाही. तसेच

त्यांची किंमत प्राकलनामधून अथवा मुल्यांकानामधून वजाती केलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास येते.

3) सदर कामासाठी बाबनिहाय एकूण सिमेंट वापर 543 गोणी आवश्यक आहे. तथापि, ठेकेदारांनी देयकासोबत सिमेंट खरेदी पावती जोडलेली नसल्याने त्या कामावर आवश्यकतेनुसार सिमेंट वापर केला असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

4) कामाच्या नस्तीसोबत व देयकासोबत जोडलेल्या छायाचित्रावरून नाम फलक दिसून येत नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक व्हिपीएस/1099/पशा/98/08 दि 20/05/1998 नुसार कामाच्या ठिकाणी 5 फुट x 4 फुट आकाराच्या लोखंडी नामफलक लावणे गरजेचे असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

5) सदर कामासाठी 54 cmt खडी व 24cmt वाळू असे एकूण 78 cmt गौण खान खनिजांचा वापर केलेला आहे. ठेकेदारांनी गौण खाण खनिज वाहतूक परवाना पावत्या देयकाकारीता सादर केलेल्या नसल्याने देयकाची अदागई करताना 78cmt गौण खाण खानिजाकरिता रूपये 70.68/cmt ह्या दराने होणारी रॉयल्टी रक्कम रूपये 5,513/- देयकातून कपात करून महसूल खाती भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नसल्याने रक्कम रूपये 5,513/- वसूल करणे आवश्यक आहे.

**3.428 मौजे सायदे हट्टीपाडा येथे विहिरीचे बांधकाम करणे. ता. मोखाडा**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर कामावर रक्कम रूपये 4,88,483/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्रक्र 23/पसंत/-7, दिनांक 30/10/2009 नुसार 1% विमा देणे बंधनकारक आहे. कामाच्या मूल्यांकनानुसार रूपये 4,900/- इतकी रक्कम विमा हप्ता भरणे आवश्यक असताना ठेकेदारांनी रक्कम रूपये 3,140/- विमा हप्ता भरणा केलेली आहे. उर्वरित रूपये 760/- रक्कम देयकातून कपात करून भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामासाठी वापरण्यात आलेले सिमेंट खरेदीची पावती ठेकेदारांनी सादर केलेली नाही. देयकासोबत सिमेंट खरेदी पावती नसल्याने आवश्यकतेनुसार सिमेंट कामावर वापर केल्याची पडताळणी करता आलेली नाही.

3) बाब क्रमांक 15 नुसार पाण्याचे नमुने तपासणीकरीता रक्कम रूपये 2,000/- देयकातून रक्कम अदागई केलेली आहे. तथापि, देयकासोबत व नस्तीसोबत सदर पाण्याचे नमुने तपासणी अहवाल (Water sampal Testing Report) जोडलेले नसल्याने सदरची तपासणी न करताच त्या बाबीवर रूपये 2,000/- अदागई झालेली आहे. तरी संबंधित ठेकेदारांकडून रक्कम रूपये 2,000/- वसुली करून शासन भरणा करून लेखापरीक्षणास पूर्तता दाखवावी.

4) सदर कामावरील बाब क्रमांक 5 नुसार 171.71cmt exav in hard rock बाब क्रमांक 17 साठी servicibale material 17.17 cmt@ रूपये 424.60/- प्रमाणे प्राकलनामधून रूपये 7,290/- वजा केलेलं आहेत. तथापि, बाब क्रमांक 5 नुसार 171.71 cmt exav in hard rock मधून निघालेल्या hard rock पैकी किमान 20% hard rock डबर म्हणून बाब क्रमांक 17 साठी वापर करणे आवश्यक होते. त्यानुसार 20% परिमाण 34.34 cmt@ रूपये 424.60/- = रूपये 14,582/- प्राकलनामधून वजाती होणे आवश्यक होते. तरी रूपये 7,292/- वसूल करणे आवश्यक आहे.

5) सदर कामासाठी बाब क्रमांक 16 नुसार 113.84cmt गौण खान खनिजांसाठी @ रूपये 70.67/- प्रती cmt प्रमाणे रूपये 8,045/- रॉयल्टी चार्जस देयकात दिलेले आहेत. ठेकेदारांने सदर कामासाठी वापर करण्यात आलेल्या गौण खाण खनिजांच्या पावत्या देयकासोबत अथवा नस्तीसोबत सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे देयकातून रॉयल्टी रक्कम रूपये 8,045/- कपात करून महसूलखाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.429 मौजे बामणगांव येथील नदीवर बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रत्यक्ष खर्च रूपये 20,00,000/- करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 (1) नुसार कार्यादेश देण्यापुर्वी ठेकेदाराकडून घेण्यांत आलेल्या विहित शुल्काच्या मुद्रांकावरील करारनाम्यामध्ये कामाचे नांव व सर्व अटी व शर्ती करारनाम्यात निर्दिष्ट करून करारपत्र करणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 - 2 नुसार करारातील अटी शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करारनाम्यामध्ये नमुद करण्यांत आलेली नाही.

2) सदर कामासाठी दिनांक 08/04/2015 रोजी जिल्हा परीषदेच्या संकेतस्थळावर ई-निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर निविदेच्या अटी / शर्तीमध्ये निविदा Upload करावयाचा कालावधी नमुद केला आहे. परंतु, निविदा उघडण्याचा दिनांक / वेळ नमुद केलेला नाही. निविदा कार्यवाहीचे इतिवृत्ताचे अवलोकन केले असता निवीदा उघडतेवेळी प्राप्त निविदाधारकांपैकी एकही निविदाधारक हजर नसल्याचे समजते. सदर निविदेची Short Notice स्थानिक दैनिकामध्ये का देण्यांत आली नाही? याचा समर्पक तरतुदीनुसार खुलासा अनुपालनासोबत सादर करण्यांत यावा.

3) किमान दरपत्रधारकाचे Technical Bid मध्ये Upload केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती नस्तीसोबत ठेवण्यांत आलेली नाहीत. त्यामुळे सदर ठेकेदाराने निवीदेमधील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे किंवा कसे? याची लेखापरीक्षणामध्ये खातरजमा करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक मटैम/1208 प्र.क्र.30/का/1412, दिनांक 17/01/2008 चे परिच्छेद क्रमांक 17 नुसार सदर काम इतर कोणत्याही निधीमधून मंजूर / प्रस्तावित नसल्याची आवश्यक कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासहिता 1968 चे नियम 157 मध्ये निर्देशीत केल्यानुसार कंत्राटदाराची नोंदवही नमुना नंबर 49 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर कार्यवाहीची अंमलबजावणी केलेली नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले आहे.

6) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील दिनांक 11/05/2015 चे आदेशान्वये बांधकामांसाठी वापरण्यांत आलेल्या खडी / रेती / डबर यावर प्रती ब्रास रूपये 400/- स्वामित्वधन (Royalty) संबंधीत ठेकेदाराकडून वसुल केलेली आहे. अनुज्ञेय असलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेपैकी कमी भरणा केलेली रक्कम रूपये 6,000/- संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करुन चलनाव्दारे शासनजमा करावी.

**3.430 मौजे मोहपाडा (आळी आंबिवली) येथे पाइपलाइन टाकणे. तालुका खालापुर**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,99,068/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 मध्ये निर्देशीत केल्यानुसार करारनामा नमुना नंबर 48 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. नियम 146(1) नुसार कार्यारंभ आदेश देणेपुर्वी मक्तेदाराकडून करारनामा करून घेऊन कामाच्या अटी व शर्ती नमूद करणे व नियम 148(2) नुसार अटी व शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद आवश्यक आहे. तथापि, या नियमाची अंमलबजावणी केलेली नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले आहे.

2) B-1 टेंडर फॉर्ममध्ये विहीत असलेला तपशील अपुर्ण असून सदर फॉर्मवर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

3) सिमेंट वापर तक्ताप्रमाणे सदर कामासाठी एकून 281 गोणी सिमेंट वापरण्यात आले आहे. परंतु, सिमेंट खरेदी बिल अथवा डिलिव्हरी चलन तपासणीस उपलब्ध झाले नाही.

4) काम बाब क्रमांक 2 40mm पाईपसाठी रुपये 18,198/- व 50mm पाईपसाठी रुपये 22,472/- असे एकूण रुपये 40,670/- इतकी रक्कम खर्च केली आहे. परंतु, सदर पाईप खरेदी केलेबाबत बिल किंवा डिलिव्हरी चलन पाईपचे टेस्ट रेपोर्ट तपासणीस उपलब्ध झाले नाही.

5) कामाची मुदत 6 महिने आहे व कार्यारंभ आदेश दिनांक 21/01/2015 दिला असताना काम दिनांक 20/06/2015 रोजी पूर्ण होणे आवश्यक असताना दिनांक 19/01/2016 रोजी काम पूर्ण झाले आहे. सदर काम 6 महिने विलंबाने पूर्ण झाले आहे. काम विलंबाने पूर्ण झाल्यामुळे बी.1 टेंडर मधील अटी शर्ती क्रमांक 2 तसेच लेखा संहिता 1968 चे नियम 148(1) नुसार काम विलंबाने केल्यामुळे कामाच्या देयकातून कमीत कमी 1 टक्का व जास्तीत जास्त 10 टक्के दंडाची रक्कम कपात केली नाही.

### 3.431 उंबर्डे तालुका पेण येथे साठवण टाकी बांधणे तालुका पेण.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,19,502/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 मध्ये निर्देशीत केल्यानुसार करारनामे नमुना नंबर 48 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. नियम 146(1) नुसार कार्यारंभ आदेश देणेपुर्वी मक्तेदाराकडून करारनामा करून घेऊन कामाच्या अटी व शर्ती नमूद करणे व नियम 148(2) नुसार अटी व शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद आवश्यक आहे. तथापि, या नियमाची अंमलबजावणी केलेली नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास 1088/सी आर 3041/26 दिनांक 14/09/1988 नुसार कामाखालील जमिनीची मालकी शासनाची / जिल्हा परिषद यांची असल्याशिवाय कोणतेही बांधकाम करू नये, असे स्पष्ट आदेश असताना मालकीबाबतची आवश्यक कागदपत्रे लेखापरीक्षणास अवगत केलेली नाहीत.

3) मक्तेदार यांचे संबंधी कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाही.

4) कामपूर्ण केल्याचा दिनांक 23/01/2016 असून साहित्य चाचणी अहवाल दिनांक 01/02/2016 रोजीचा आहे. म्हणजेच काम सुरु करणेपुर्वी साहित्य चाचणी केली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/1099/प्र.क्र. 44/5408, दिनांक 20/05/1999 व ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक स्था.वि.का/ 2003/प्र.क्र.369/का/369/का.1445, दिनांक 18/11/2003 नुसार रक्कम रुपये 20,000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या कामाच्या ठिकाणी लोखंडी नामफलक कामाचे तपशिलासह बसविणे बंधनकारक असताना तसा नामफलक बसविला नाही. तसेच अंदाजपत्रकात तरतूद केली नाही.

6) कामासाठी वापरलेले सिमेंट खरेदी केलेची बिले / डिलिव्हरी तपासणीस उपलब्ध झाली नाही.

7) खर्च बाब क्रमांक 8 पाईप रुपये 37,785/- खरेदी केलेचे बिल व टेस्ट रिपोर्ट उपलब्ध नाही.

8) खर्च बाब क्रमांक 9 रुपये 3,000/- इतके व्हॉल्वसाठी प्रदान केले आहे. DSR मधील सर्वसाधारण सूचना नुसार व्हॉल्वचे HYDROLIC TEST झालेशिवाय सदर बाबीचे 10 टक्के प्रदान करू नये, अशी सूचना असताना प्रदान केले आहे.

9) कार्यारंभ आदेश दिनांक 06/01/2016 रोजीचा आहे व काम पूर्ण दाखला दिनांक 23/01/2016 रोजीचा आहे आहे. कामावर 21 दिवस पाणी मारणे आवश्यक असताना त्यापूर्वीच कामपूर्ण दाखला कसा दिला? याचा खुलासा करावा.

### 3.432 सावर्डे येथे नळपाणी पुरवठा योजनेसाठी सेटलिंग टँक बांधणे तालुका चिपळूण.

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना शासन निधी डोंगरी

विकास कार्यक्रम योजनेतून सावर्डे येथे नळपाणी पुरवठा योजनेसाठी सेटलिंग टँक बांधणे कामाची नस्ती तपासली असता सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 12,41,170/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा पत्रात मक्तेदाराचा दर्जा वर्ग - 6 व त्यावरील नमूद असतांना काम वर्ग - 3 च्या मक्तेदारास (स्थापत्य) देण्यात आले आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) निविदा फॉर्ममधील विवरणपत्र 1 ते 4 कोरे असून त्यावर मक्तेदाराच्या सहया दिसून येतात.

3) काम पूर्णत्व दाखल्यानुसार खर्च रुपये 12,41,294/- व प्रत्यक्ष खर्च रुपये 12,41,170/- असा असून तफावतीबाबत खुलासा व्हावा.

4) अर्धसमास ज्ञापन क्रमांक 12, दिनांक 09/05/2017 नुसार मोजमाप नोंदवही मागविण्यात आली होती. मात्र, ती पुरविण्यात आली नाही. त्यामुळे कामाच्या मोजमापाची खात्री करता आलेली नाही.

5) पाणी टाकी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केल्याचे अभिलेख नस्तीत उपलब्ध नाहीत.

6) ज्या जागेत सदरची पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे, त्या जागेच्या जमिन मालकाकडून सदर जागा ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. मात्र, याबबात नस्तीत बक्षिसपत्र, 7/12 उपलब्ध नाही.

7) सदर पाण्याची टाकी बांधण्यासाठी वापरण्यात आलेल्या वाळू, खडी यांचेवरील नियमानुसार देय असलेले स्वामित्व धन वसूल करण्यात आलेले नाही.

**3.433 वायंगणी अमरेवाडी सडेवाडी नपापु योजना दुरुस्त करणे कामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,92,370/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील कामाची प्रशासकीय मंजूरी सन 2014-2015 ची असून दरसूची सन 2012-2013 ची वापरण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) कामाचा स्थलदर्शक नकाशा जोडलेला नाही.

3) कामाचे अंदाजपत्रक हे तीन लाखावरील असल्याने महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/277/प्रक्र/172/पं.रा.7 दिनांक 19/10/2011 नुसार ई-निविदा का काढण्यांत आली नाही? याचा खुलासा करावा.

4) सदर कामाचे सर्वसाधारण वर्णन पाहता पाईप लाईन दुरुस्ती करणे, जी आय एस पाईप टाकणे, 5000 लीटर क्षमतेची टाकी बसविणे इत्यादी कामे आवश्यक बाबत नोंद आहे. तथापि, पंपसेट 5 HP पंप बसविणेच्या कामाचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे सहाय्यक भू-वैज्ञानिक यांच्या प्रपत्र "ब" मधील अहवालात विदयुत पंप चालू असलेची नोंद आहे. असे असताना अंदाजपत्रकांत बाब क्रमांक 1 मध्ये 5 HP पंप बसविणेबाबत तरतूद करुन पंप सेट बसविण्याची आवश्यकता काय? याचा खुलासा करावा व आवश्यकता नसताना पंप सेट बसविल्याने पंपाची रक्कम रूपये 33,453/- वसुलपात्र असून त्याची संबंधितांकडून वसुली करण्यांत यावी

5) सदर कामावरील जुने साहित्य उदा.विद्युत पंप इत्यादी ग्रामपंचायतीच्या अभिलेखी नोंद घेवून ते ताब्यात ठेवल्याबाबतचा सरपंच ग्रामपंचायत यांजकडील दाखला नस्तीमध्ये जोडण्यांत आलेला नाही.

6) अंदाजपत्रकांत नमूद केलेप्रमाणे कामाचा नामफलक लावल्याबाबत रक्कम रूपये 2,000/- मक्तेदार यांना प्रदान केले आहेत. तथापि, नामफलक लावल्याचा फोटो नस्तीमध्ये जोडलेला नसल्याने रक्कम रूपये 2,000/- वसुलपात्र ठरते.

7) अंतिम देयकात रक्कम नोंदताना रकमेत खाडाखोड केली आहे. सदरची खाडाखोड लेखापरिक्षणांस मान्य नाही.

8) सदर कामावर 13 बॅग सिमेंट वापरले आहे. तथापि, सिमेंट वापरण्यापूर्वी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार चाचणी अहवाल घेण्यांत आलेले नाहीत.

9) वरील कामाची पूर्ण करण्याची मुदत दिनांक 30/06/2014 होती. परंतु, काम वेळेत पूर्ण झाले नसल्याने मक्तेदार यांनी मुदतवाढीचा अर्ज वेळेत न देता तो उशिरा दिनांक 21/07/2015 रोजी दिला आहे व त्यास अनुसरुन दिनांक 27/08/2015 च्या आदेशाने दिनांक 30/09/2015 पर्यंत काम पूर्ण करणेस मुदतवाढ दिली आहे. वास्तविक मक्तेदाराने मुदतवाढीचा अर्ज वेळेत देणे गरजेचे होते व सदर काम हे टंचाई कार्यक्रमातून घेतले असलेने ते वेळेत करणे बंधनकारक होते. त्यामुळे सदर प्रकरणी जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

10) कामाचे मूल्यांकन रूपये 3,16,470/- एवढे झाले असून देयक रक्कम रूपये 2,92,370/- या रकमेचे अंतिम प्रदान केले आहे. याचा अर्थ मक्तेदारांस रक्कम रूपये 24,100/-एवढे कमी प्रदान झाले ते मक्तेदाराने मान्य कसे केले ?

**3.434 वरवडे खालची मुस्लिमवाडी सार्वजनिक विहीर दुरुस्त करणे कामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,48,655/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील काम हे तीन लाखावरील असल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/277/प्रक्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 नुसार कामाची ई-टेंडरींग प्रक्रिया राबविण्यांत आलेली दिसून येत नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

2) मक्तेदाराने सादर केलेल्या निविदा पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 4 वर अंदाजपत्रकीय रक्कम नमूद नाही. तरी निविदा कशी सादर करुन घेणेत आली.

3) नमुना नंबर 58 देयकामध्ये ब-याच आकडयामध्ये खाडाखोडी केलेल्या असून व्हाईटनर लावून आकडे लिहीले आहेत. ते लेखापरीक्षणास मान्य नाहीत. केलेली दुरुस्ती जबाबदार अधिका-यानी साक्षांकित केलेली नाही.

4) वरील कामाचे एकूण मुल्यांकन रूपये 3,61,361/- असून देयक रूपये 3,48,655/- या रकमेस मर्यादित राहून प्रदान केले आहे. याचा अर्थ मक्तेदारास रक्कम रूपये 12,706/- कमी प्रदान झाले आहे. तरी मक्तेदाराने एवढे कमी प्रदान मान्य कसे केले ? तसेच अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा मक्तेदाराने जादा काम कोणाच्या आदेशाने केले?

5) अंदाजपत्रकांत तरतूद करुनही मक्तेदाराने कामाच्या ठिकाणी कामाचा नामफलक लावलेला नाही. तरी ग्रामविकास जलसंधारण विभाग यांजकडील दिनांक 20/05/1999 च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करणेची असताना, ती का करणेत आली नाही? याचा खुलासा करावा.

6) कामाचा फोटो नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे काम पूर्ण झाल्याची खात्री होत नाही.

**3.435 मौजे कळंबिस्त गणशेळवाडी नपापू योजना विशेष दुरुस्ती करणे कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 119 दिनांक 18/02/2016 अन्वये रक्कम रुपये 4,74,210/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील काम हे टंचाई कार्यक्रमामधून घेणेत आले असून त्यांस जिल्हाधिकारी यांनी दिनांक 27/03/2015 रोजी प्रशासकीय मंजूरी दिली असताना कामाचे आदेश दिनांक 24/06/2015 रोजी एवढया उशिराने देण्याचे प्रयोजन काय?

2) कामाचे आदेश पावसाळा कालावधीत कसे देणेत आले?

3) कामाचे अंदाजपत्रक हे तीन लाखावरील असल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/277/प्रक्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 नुसार कामाची ई-टेंडरींग प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

4) नस्तीसोबत नमुना नंबर 25 पाहता त्यातील नोंद अपूर्ण असून त्यामध्ये योजना कधीपासून अस्तित्वात आहे? याची तारीखवार नोंद नाही.

5) कामाची मुदत दिनांक 30/06/2015 पर्यंत होती. परंतु, काम वेळेत पूर्ण झाले नसल्याने मक्तेदाराने दिनांक 23/07/2015 च्या अर्जान्वये मुदतवाढीसाठी अर्ज दिला असून त्यांस अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 2993, दिनांक 11/02/2016 च्य आदेशान्वये दिनांक 30/09/2015 (पूर्वीचा दिनांक नमूद करुन) पर्यंत काम पूर्ण करण्यांस व विलंबासाठी दंडाची रक्कम आकारुन कामास मुदतवाढ मंजूर करण्यांत आली. तथापि, मक्तेदाराने हे काम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढीचा अर्ज वेळेत दिला नसून काम टंचाई कार्यक्रमातून असूनही ते पूर्ण करण्यास निष्काळजीपणा केला आहे. त्यामुळे याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार कार्यवाही केलेली नाही.

### 3.436 मौजे जामसंडे वेळेवाडी येथे तात्पूरती पूरक नळयोजना करणे कामातील अनियमितता.

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 93, दिनांक 09/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,72,338/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणे कामास जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे आदेश क्रमांक 4003 दिनांक 26/05/2015 च्या आदेशान्वये प्रशासकीय मंजूरी देणेत आली असून कामास उपअभियंता, ग्रामिण पाणी पूरवठा, देवगड यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. तथापि, अंदाजपत्रकासोबत कामाचा स्थलदर्शक नकाशा व आराखडा जोडण्यात आलेला नाही. त्यामूळे कामाची जागा मोजणी अंतर इत्यादींची खात्री करता येत नाही.

2) सदर कामाच्या जागेचा 7/12 उतारा पहाता त्यामध्ये प्रकाश गणपत चांदोस्कर, सुंदर गणपत चांदोस्कर, कुणाल गणपत चांदोस्कर व शाम गणपत चांदोस्कर इत्यादींची नावे नमूद आहेत. तसेच 7/12 वर बँक ऑफ इंडिया, देवगड यांच्याकडील कर्जाच्या बोजाची नोंद आहे. तरी खाजगी मालकीच्या जागेत काम कसे करण्यात आले अथवा सदरचा 7/12 उतारा जोडण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच खाजगी जागेत काम केले असेल तर त्याचे बक्षिसपत्र जोडण्यात आले नाही. तरी याबाबत योग्य तो खुलासा करावा.

3) निविदा पूस्तिकामधील पान क्रमांक 4 वर सर्वसाधारण वर्णन, अंदाजपत्रकीय रक्कम इत्यादी नमूद केलेले नाही. त्यामूळे कामाचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे? याचा तपशिल समजून येत नाही.

4) वरीलप्रमाणे कामाचे आदेश पाहता ते पावसाळा कालावधीत देणेत आले आहेत. तरी पावसाच्या ऋतूमध्ये आदेश कसे देणेत आले?

5) काम पूर्ण करण्याची तारीख 30/06/2015 होती. परंतू, काम पूर्ण करण्यास विलंब झाल्याने मक्तेदार सरपंच ग्रामपंचायत जामसंडे यांनी दिनांक 22/12/2015 च्या अर्जान्वये ई - टेंडरींग व पावसाळयाचे कारण नमूद करुन कामास मूदतवाढ मागीतली आहे. विलंबाचे कारण संयुक्तीक वाटत नाही. तथापि, सदर विलंबास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे आदेश क्रमांक 3344, दिनांक 04/03/2016 अन्वये मागील दिनांक 31/12/2015 नमूद करुन काम पूर्ण करण्यासाठी दंड आकारुन मूदतवाढ मंजूर केली आहे. यावरुन असे दिसते की, मक्तेदाराने मूदतवाढीचा अर्ज वेळेत न देता तो 5 महीन्यांनी सादर केला आहे. यावरुन काम पूर्ण करण्यामध्ये मक्तेदाराने निष्काळजीपणा केला आहे. तरी याबाबत जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नूसार कार्यवाही करण्यात आली नाही. सदरचे काम हे टंचाई कार्यक्रमांतर्गत असताना यासाठी जिल्हाधिकारी यांची कामे तात्काळ करणेबाबतचे आदेश असताना पाणी पुरवठा विभागाने नियमबाहय मूदतवाढीसाठी शिफारस कशी केली? याचा खूलासा करावा.

6) मुल्यांकन देयकात कामाच्या ठिकाणी नामफलक लावल्याबाबत रक्कम नमूद करुन मक्तेदारास प्रदान केले आहे. तथापि, नस्तीसोबत कामाच्या नामफलकाचा फोटो जोडलेला नसल्याने सदरबाबत प्रदान केलेली रक्कम रूपये 2,000/- वसूलपात्र ठरते.

7) कामाचे मूल्यांकन रूपये 4,92,380/- झाले असून देयक रूपये 4,72,338/- ला अंतिम केले आहे. पर्यायाने मक्तेदारास रूपये 20,042/- कमी प्रदान झाले आहे. ते त्याने मान्य कसे केले. भाग क्रमांक 1,2,3,4 प्रमाणे एकत्रित अंदाजपत्रक करुन तांत्रिक मंजूरी दिली असून देयकासोबतचे वाढ बचत विवरणपत्र पहाता एकूण रूपये

1,19,221/- ची वाढ झाली आहे. तसेच काही बाबींवर एकूण रूपये 73,579/- बचत झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 120(2) नुसार अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामूळे होणारी बचत इतर बाबीवर खर्च करण्याची तरतूद नाही. तसेच सदर कार्यवाहीस जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 118(1) नूसार त्यास पूर्व मंजूरी घेणे आवश्यक होते. तथापि, त्याप्रमाणे मंजूरी घेणेत आलेली नाही.

**3.437 सामुंडी (सराफ देवाची वाडी) तालुका त्र्यंबकेश्वर येथे पिण्याची पाण्याची विहीर बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,98,172/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त कामातील बाब क्रमांक 1 व 2 मध्ये खोदकाम करणे या बाबींचा समावेश केलेला असुन त्यावर रक्कम रूपये 1,59,238/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदरहु बाबी करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची सन 2013-2014 मधील सेक्शन ई-खोदकाम बाब क्रमांक 10 (a) तसेच 10 (b) मधील दरानुसार आकारणी करून कंत्राटदारास रक्कम अदा केलेली आहे. बाब क्रमांक 10 (a) व 11 (a) मध्ये नदी पात्र व धरण परिसरातील खोदकामाचा समावेश होतो. तथापि, उपरोक्त काम हे श्री विष्णु सुरवारा गुंड यांचे जमीनीत केलेली आहे. त्यामुळे सदर जागेतील खोदकामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची सन 2013-2014 मधील सेक्शन ई-खोदकाम हेड वर्क्स पृष्ठ क्रमांक 53 वरील अनुक्रमे बाब क्रमांक 10(b) व 11(b) समोर दर्शविलेल्या दरांचा वापर करणे आवश्यक होते. तरी रक्कम रूपये 20,174.36/- इतकी संबंधितास जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम रूपये 20,174.36/- संबंधिताकडुन वसुल करून करावी.

2) सदर कामाच्या नस्तीत नमुद केलेप्रमाणे काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर काम पुर्ण दिनांक 06/08/2015 दर्शविलेली आहे व हस्तांतरण दाखल्यावर (ताबा पावतीवर) दिनांक 17/07/2015 नमुद केलेली आहे. सदरहु बाब विसंगत असुन, विहीर बांधकाम पुर्ण होणेची आधी विहीर ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिलेली आहे, असे दिसुन येते.

3) सदर कामाच्या नस्तीतील कॉक्रीट क्युब च्या चाचणी अहवालानुसार कॉक्रीट क्युब ची गुणवत्ता M-25 दर्शविलेली आहे. तथापि, सदर कामाच्या बिलात कॉक्रीट क्युब M-15 वापरलेचे दिसुन येते, ही बाब विसंगत आहे.

4) जिल्हा परिषद, नाशिक यांचे काम वाटप समितीने शिफारस केलेल्या काम वाटप करावयाच्या कामांबाबतच्या तक्यावर अध्यक्ष, काम वाटप समिती तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांची स्वाक्षरी नाही.

5) प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 8 अन्वये सदरील कामे ही सन 2014-2015 या आर्थिक वर्षात पुर्ण होणे बंधनकारक होते. तथापि, सदर काम हे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात पुर्ण केलेले आहेत. याबाबत खुलासा अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**3.438 भिलमाळ (राजेबाबाची वाडी) तालुका त्र्यंबकेश्वर येथे पिण्याची पाण्याची विहीर बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,99,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त कामातील बाब क्रमांक 1 व 2 मध्ये खोदकाम करणे या बाबींचा समावेश केलेला असुन त्यावर रक्कम रूपये 1,59,238/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदरहु बाबी करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर सुची सन 2013-2014 मधील सेक्शन ई-खोदकाम बाब क्रमांक 10 (a) तसेच 10 (b) मधील दरानुसार आकारणी करून कंत्राटदारास रक्कम अदा केलेली आहे. बाब क्रमांक 10 (a) व 11 (a) मध्ये नदी पात्र व धरण परिसरातील खोदकामाचा समावेश होतो. तथापि, उपरोक्त काम हे श्री. सावळीराम तुळशिराम अंबापुरे यांचे जमीनीत केलेली आहे. त्यामुळे सदर जागेतील खोदकामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर सुची सन 2013-2014 मधील सेक्शन ई-

खोदकाम हेड वर्क्स पृष्ठ क्रमांक 53 वरील अनुक्रमे बाब क्रमांक 10(b) व 11(b) समोर दर्शविलेल्या दरांचा वापर करणे आवश्यक होते. तरी रक्कम रूपये 20,174.36/- इतकी संबंधितास जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम रूपये 20,174.36/- संबंधिताकडुन वसुल करावे.

2) सदर कामाच्या नस्तीत नमुद केलेप्रमाणे काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर काम पुर्ण दिनांक 06/08/2015 दर्शविलेली आहे व हस्तांतरण दाखल्यावर(ताबा पावतीवर) दिनांक 20/07/2015 नमुद केलेली आहे. सदरहु बाब विसंगत असुन, विहीर बांधकाम पुर्ण होणेची आधी विहीर ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिलेली आहे, असे दिसुन येते.

3) कर्मवीर काकासाहेब वाघ इंजिनियरींग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, नाशिक यांचे स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे पत्र जा.क्रं.kkwier/civil/t& c/146/15 दिनांक 09/06/2015 च्या पत्रान्वये विहीरीकरीता M-25 गुणवत्ता असलेले concrete वापरणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत. तथापि, प्रत्यक्षात बांधकामासाठी M-15 गुणवत्ता असलेल्या concrete चा वापर केलेला आहे.

4) जिल्हा परिषद, नाशिक यांचे काम वाटप समितीने शिफारस केलेल्या काम वाटप करावयाच्या कामांबाबतच्या तक्यावर अध्यक्ष, काम वाटप समिती तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांची स्वाक्षरी नाही.

5) प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 8 अन्वये सदरील कामे ही सन 2014-2015 या आर्थिक वर्षात पुर्ण होणे बंधनकारक होते. तथापि, सदर काम हे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात पुर्ण केलेले आहेत. याबाबत खुलासा अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**3.439 शासकीय आश्रमशाळा म्हसगण तालुका पेठ येथील नळ पाणी पुरवठा योजना करणे या कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर कामाचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता, झालेला खर्च रक्कम रूपये 8,83,193/- बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) म्हसगण आश्रमशाळा तालुका पेठ नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी रूपये 9,83,000/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचे मार्फत निधी उपलब्ध करून दिल्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक 3053, दिनांक 08/10/2008 अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या कामासाठी निविदा क्रमांक 25 काढण्यात आली असून निवीदेची किंमत रुपये 9,23,310/- इतकी होती. या कामाचे कार्यादेश क्रमांक जिपना ग्रापापुवि/ निवीदा/ 111/2008 दिनांक 31/01/2009 अन्वये मे. योगेश्वरी मजूर बांधकाम सहकारी संस्था मर्या., नाशिक यांना देण्यात आले होते. त्याप्रमाणे संस्थेमार्फत काम चालू करण्यात आले होते. विहीरीचे खोदकाम सुरू केल्यानंतर ग्रामस्थ म्हसगण यांनी आक्षेप घेऊन विहीरीचे काम बंद केले. त्यांना वेळोवेळी विनंती करूनही काम सुरू केल्याचा प्रयत्न करून सुदधा ग्रामस्थ, म्हसगण काम करू देण्यास तयार नव्हते. यामुळे सदर कामावर संबधीत ठेकेदार यांचे मार्फत फक्त पाईप व स्लुस वॉल चा पुरवठा केलेला असल्याने निवीदा क्रमांक 25 सन 2008-2009 चे रूपये 58,574/- रक्कमेचे अंतिम देयक तयार करून विभागीय कार्यालयास सादर केले आहे.

तथापि, सदर आश्रम शाळेची पिण्याच्या पाण्याची समस्या तशीच राहील्याने व कामासाठी आदिवासी विभागामार्फत उपलब्ध करून दिलेल्या एकूण रूपये 9,83,970/- (प्रशासकीय मान्यता) पैकी रूपये 9,25,396/- इतका निधी शिल्लक असल्याने आश्रमशाळेसाठी शाळेच्या आवारात बोअरवेल घेऊन त्यावरूनच पाणी पुरवठा योजना राबवावी, असे प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक 27/02/2012 रोजीच्या समक्ष पहाणी दौऱ्यामध्ये आदेशित केलेले होते. त्यानुसार म्हसगण आश्रम शाळेच्या आवारात बोअरवेल चा उदभव दाखला घेऊन नवीन प्रचलित दरसुचीनुसार (सन 2012-2013) रूपये 9,15,920/- चे अंदाजपत्रकास तयार करण्यात आले. या अंदाजपत्रकामध्ये पुर्वीच्या निवीदेमधुन तत्कालीन ठेकेदार यांनी पुरवठा केलेल्या साहित्याच्या संपुर्ण वापर गृहीत धरण्यात आलेला होता.

मक्तेदार श्री. सप्तश्रृंगी कन्स्ट्रक्शन मुपो विंचूर तालुका निफाड यांनी उपरोक्तपणे उर्वरीत साहित्य जमा केल्याचे आढळून आलेले नसुन, त्यामुळे रक्कम रूपये 29,262/- नुकसान झालेले आहे. सदरहु रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

2) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 नुसार रुपये 141.34/- प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड, वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

सबब रक्कम रुपये 141.34/- प्र.घ.मी. या दराने उपरोक्त कामासाठीची रॉयल्टीची रक्कम रुपये 33,916/- वसूल करून “0853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

**3.440 मौजे शिवाजीनगर, तालुका साक्री, जिल्हा धुळे नळ पाणीपुरवठा कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 80,23,613/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 अन्वये कामावर वापरण्यासाठी खरेदी केलेल्या साहित्याची प्रयोगशाळेतून तपासणी करुन विहित गुणवत्तेची खात्री करुन वापर करणे असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) समितीने कामासाठी लागणारे साहित्य हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा जिल्हा परिषद मान्यताप्राप्त यादीतील उत्पादक पुरवठादाराकडून भारतीय मानक संस्थेच्या निकषानुसार असलेल्या स्पेसिफीकेशननुसार उच्च प्रतीचे खरेदी करणे आवश्यक असतांना समितीने स्थानिक पुरवठाराकडून साहित्य खरेदी केलेले आहे.

3) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु -07, दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये सुचीत केल्याप्रमाणे रुपये 50.00 लाखापर्यत किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी गामपंचायत / ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समित्या करतील व योजना पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्ती करतील. तसेच या योजनांची अंमलबजावणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने /ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद लेखा संहितेमध्ये विहीत केल्याप्रमाणे निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा. तसेच योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी ग्रामपंचायतीने / ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने संबधीत ठेकेदाराशी करारनामा करताना त्यामध्ये ठेकेदार किमान 1 वर्ष ही योजना चालवेल, अशी अट घालावी, असे सुस्पष्ट नमूद असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु -07, दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेदर 7.3 ब नुसार संबधीत गांव किमान 60 टक्के गांव हगणदारीमुक्त असले पाहिजे व टप्प्या टप्प्याने 100 टक्के हागंदारी मुक्त झाले पाहिजे, असे हमीपत्र ग्रामसेभेच्या ठरावाव्दारे गांवाने सादर करावे आणि पुढे त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. तसेच याजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापूर्वी गांव 100 टक्के हगणदारी मुक्त झाले पाहिजे. शासन निर्णयातील सदरील अटीनुसार प्रदान करण्यात आलेले नाही.

5) मुंबई मुन्द्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34, 63 व महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग अशासकीय पत्र क्रमांक मुन्द्रांक 2009/2707/प्र.क्र.36/म-1, दिनांक 09/10/2009 नुसार 10.00 लाखांपर्यंत रुपये 100/- व त्यावरील प्रत्येकी लाखाला रुपये 100/- याप्रमाणे रक्कम रुपये 7,200/- ऐवजी रुपये 100/- चा करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 7,100/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे. रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दाखवावे.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीये/2009/प्रक्र 108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार प्राकलनाचे 1 टक्के उपकराची रक्कम रुपये 80,236/- कपात

केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दाखवावे.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक 1098/प्र.क्र.28/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 अन्वये सदर कामासाठी शासकीय विम्याची रक्कम प्रदान रकमेच्या 1 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 80,236/- कपात करणे आवश्यक होते. तरी सदरची रक्कम वसूल करुन कार्यवाही दाखवावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 अन्वये पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

पंचायतीस (समितीस) अग्रीमाच्या रक्कमा प्राप्त असून वेळोवेळी सामान्य पावती नमुना नंबर 7 घेण्यात आलेल्या नाही. पूर्तता दर्शवावी.

9) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 15/12/2006 नुसार कामावर वापरलेल्या (गौण खनिजांची) रॉयल्टीची परिगणना करुन वसूल करणे आवश्यक आहे.

**3.441 मौजे आमखेल, तालुका साक्री, जिल्हा धुळे नळ पाणीपुरवठा योजना कामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 35,99,851/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या उपांगाचे बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा खर्च रूपये 4,08,071/- ने जरी कमी येत असला तरी वरील कामात मोठया प्रमाणात बचत दर्शवलेली असल्यामुळे झालेले काम गुणवत्तापुर्वक झालेबाबतची खात्री होऊ शकलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 अन्वये कामावर वापरण्यासाठी खरेदी केलेल्या साहित्याची प्रयोगशाळेतून तपासणी करुन विहित गुणवत्तेची खात्री करुन वापर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) समितीने कामासाठी लागणारे साहित्य हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा जिल्हा परिषद मान्यताप्राप्त यादीतील उत्पादक पुरवठादाराकडून भारतीय मानक संस्थेच्या निर्ष्कषानुसार असलेल्या स्पेसिफीकेशननुसार उच्च प्रतीचे खरेदी करणे आवश्यक असतांना समितीने स्थानिक पुरवठाराकडून साहित्य खरेदी केलेले आहे.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु -07, दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये सुचीत केल्याप्रमाणे रुपये 50.00 लाखापर्यत किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी गामपंचायत / ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समित्या करतील व योजना पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्ती करतील. तसेच या योजनांची अंमलबजावणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने / ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद लेखा संहितेमध्ये विहीत केल्याप्रमाणे निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा. तसेच योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्विरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी ग्रामपंचायतीने / ग्राम पाणी पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने संबधीत ठेकेदाराशी करारनामा करताना त्यामध्ये ठेकेदार किमान 1 वर्ष ही योजना चालवेल, अशी अट घालावी, असे सुस्पष्ट नमूद असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु -07 दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेदर 7.3 ब नुसार संबधीत गांव किमान 60 टक्के गांव हगणदारीमुक्त असले पाहिजे व टप्प्या टप्प्याने 100 टक्के हागंदारी मुक्त झाले पाहिजे, असे हमीपत्र ग्रामसेभेच्या ठरावाव्दारे गांवाने सादर करावे आणि पुढे त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. तसेच योजनेकरीता अनुदानाचा दुरसरा हप्ता मिळण्यापूर्वी गांव 100 टक्के हगणदारी मुक्त झाले पाहिजे. शासन निर्णयातील सदरील अटीनुसार प्रदान करण्यात आलेले नाही.

6) मुंबई मुन्द्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34, 63 व महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अशासकीय पत्र क्रमांक मुन्द्रांक 2009/2707/प्र.क्र.36/म-1, दिनांक 09/10/2009 नुसार 10.00 लाखापर्यंत रुपये

100/- व त्यावरील प्रत्येकी लाखाला रुपये 100/- याप्रमाणे रक्कम रुपये 2,700/- ऐवजी रुपये 100/- चा करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 2,600/- शासनाचे नुकसान झालेले आहे. रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दाखवावे.

7) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीये/2009/प्र.क्र. 108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार प्राकलनाचे 1 टक्के उपकराची रक्कम रुपये 35,998/- कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दाखवावे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीण-2010/275/प्र.क्र.172/ पंरा-7, दिनांक 19/10/2011 नुसार ई-निवीदा कार्यप्रणाली अवलंबविण्याबाबत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकामे व साहित्य पुरवठयाची कामे e-Tendering प्रकीयेतून करण्यातबाबत सुचीत केले आहे. असे असतांना समितीने e-Tendering नुसार खरेदी प्रकीया राबविलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 अन्वये पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

पंचायतीस (समितीस) अग्रीमाच्या रकमा प्राप्त असून वेळोवेळी सामान्य पावती नमुना नंबर 7 घेण्यात आलेल्या नाही. पूर्तता दर्शवावी.

10) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 15/12/2006 नुसार कामावर वापरलेल्या (गौण खनिजांची) रॉयल्टीची परिगणना करुन वसूल करणे आवश्यक आहे.

**3.442 राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम योजनांतर्गत अपुर्ण कामाबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामिण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धुळे कडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे एकुण 88 ग्रामिण पाणीपुरवठाचे कामावर एकुण रक्कम रुपये 881.76 लक्ष खर्च केलेले आहे व सदर कामे सन 2016 अखेर अपुर्ण आहेत. त्यात बरीच कामे 8-9 वर्षापासून अपुर्ण आहेत व शिरपुर तालुक्यातील कामे सन 2007-2008 पासुन अपुर्ण आहेत.

उपरोक्त नमुद कामांच्या अपुर्णतेबाबत कारण मिमांसा नमुद केलेली नाही. याबाबत शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 नुसार जिल्हा परीषदेच्या कार्यकारी अभियंता यांनी दरवर्षी पुर्ण केलेल्या कामांची आणि अपुर्ण असलेल्या कामांची स्वतंत्र यादी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत मान्यतेसाठी परिशिष्ठ क्रमांक अ नुसार सादर करुन या यादीस मान्यता दिल्यानंतर ती प्रसारित करावयाची आहे. तसेच प्रत्येक वित्तीय वर्षात हाती घेतलेल्या कामांबाबत योग्य नियोजन व संनियंत्रण राहणेकरीता अपुर्ण कामांचा आढावा खाते प्रमुखांनी देऊन दरवर्षी अपुर्ण कामांसाठी अर्थसंकल्पात तरतुद करुन वार्षिक तरतुदीपेक्षा जादा निधी आवश्यक असल्यास आर्थिक तरतुदीच्या 70 टक्के निधी अपुर्ण कामे पुर्ण करण्याकरीता ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणात आढळुन आले नाही.

सदरची कामे विहीत कालावधीत पुर्ण न झाल्यामुळे कामांचा दर्जा योग्य राहणार नाही. तसेच संबंधित मक्तेदार दर भाव वाढीची मागणी करतात. त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रके तयार करावी लागतात. पर्यायाने कामांच्या किमतीत वाढ होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होते. त्याचबरोबर वेळेत कामे पुर्ण न झाल्याने त्याचा उपयोग पर्यायाने जनतेस होत नाही व दोन्ही स्तरावर शासन / जनता यांचे नुकसान होते. याबाबत योग्य नियोजन व अंमलबजावणी करुन अनुपालन सादर करावे.

**3.443 हातपंप सूटे भाग खरेदीतील अनियमितता व शिल्लकेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10 व 11) -** जिल्हा परिषद नंदुरबार यांचे कडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात हातपंपाचे सूटेभाग खरेदी करण्यासाठी 2 प्रमाणकान्वये रक्क्म रुपये 11,77,367/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हातपंपाच्या सुटे भागाचा साठा संपलेला असल्याने, सर्व गटविकास अधिकारी यांनी दिनांक 03/09/2015 ते दिनांक 09/09/2015 चे पत्रान्वये मागणी सादर केलेबाबत कार्यालयीन टिपणीत नमूद आहे. त्या अनुषंगाने उपअभियंता (यांत्रीकी) यांनी दिनांक 19/12/2015 चे टिपणीत नमूद केले आहे की, सदयस्थितीत आचार संहिता असल्याने, आचार संहिता संपल्यानंतर ई-निवीदा प्रक्रिया राबवावी, असे नमूद करुन त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिली आहे.

तथापि, त्यापुढे आचार संहिता कधी संपली किंवा आचार संहिता कालावधीतच पुरवठा आदेश दिला, याचा कोठेही उल्लेख न करता, दिनांक 31/12/2015 चे कार्यालयीन टिपणी नुसार हातपंपाच्या सुटे भागाच्या अंदाजीत रक्कमा या मागील वर्षी पुरवठा केलेल्या पुरवठादाराकडून दुरध्वनीवरुन घेण्यात आल्या आहेत. तथापि, ई-निविदा प्राप्त् झाल्यानंतर प्रत्यक्ष किमंती नुसार कार्यवाही करण्यात येईल, असे टिपणीत नमूद करुन मागील पुरवठादाराकडुनच दुरध्वनीद्वारे घेण्यात आलेल्या किमंतीच्या आधारे मुख्य कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे आदेश क्रमांक 431 दिनांक 14/01/2016 अन्वये 26 सुटे भाग खरेदीसाठी रक्कम रुपये 13,99,878/- ला प्रशासकिय मंजुरी प्रदान केली आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त असल्याबाबतचे पत्र अथवा त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार नस्ती सोबत आढळुन आला नाही. तसेच अंदाजीत सर्वांच्या मागणीचा विचार करून अंदाजपत्रक व अंदाजे दर याप्रमाणे रक्कम रुपये 14,76,105/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

2) प्रशासकिय आदेशातील अट क्रमांक 2 नुसार तांत्रीक मान्यतेच्या अधिन राहुन प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे, असे नमूद आहे. सबब तांत्रिक मान्यता अथवा त्याबाबतचा पत्र व्यवहार नस्तीत नाही. म्हणजेच तांत्रीक मान्यता नसतांना प्रशासकिय मान्यता (अट क्रमांक 2) लागु होत नाही, म्हणजेच प्रशासकिय व तांत्रिक मान्यता नसतांना वरीलप्रमाणे अनियमितपणे पुरवठा आदेश (आचार संहिता कालावधीत) देऊन गंभीर अनियमितता संबधितांनी केलेली आहे.

3) प्राप्त हातपंप सुटे भागाचे ज्या साठा नोंदवहीत नोंद घेण्यात आली, त्यात दिनांक नमूद नाही.

4) पुरवठादाराकडून रुपये 500/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेण्यात आलेला नाही.

5) साठा नोंदवहीत लेखापरीक्षण वर्ष अखेर व आज पावेतो मोठयाप्रमाणात हातपंप सुटे भाग जिल्हा परिषद स्तरावर शिल्लक दिसून येतात (उदा. साठा नोंदवहीतील पान क्रमांक 13,34,53,81 इत्यादी) असे असतांना साहित्य खरेदी ही निव्वळ अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून केल्याचे दिसून येते.

6) तथापि, साहित्याची निकड लक्षात घेता, पुरवठा आदेश देऊन साहित्य खरेदी करून घेण्यात आली आहे. खरेदी केलेल्या 26 सूटया भागापैकी वरीलप्रमाणे 10 सूटया भागाचे मोठया प्रमाणावर साहीत्य लेखापरीक्षण कालावधी अखेर पडून असल्याचे जिल्हा परिषद स्तरावरील साठा नोंदवही वरून दिसून येते. सबब गट स्तरावरून सदर साहीत्याची मागणी / उचल अद्यापही झालेली नाही. यावरून असे स्पष्ट दिसून येते की, कोणतेही पुर्व नियोजन / अंदाजाअभावी ढोबळ मानाने साहीत्याची मागणी गट स्तरावरून झालेली असून, जिल्हा परिषद स्तरावरून त्याबाबत कोणतीही शहानिशा न करता आचार संहीता असतांना देखील साहीत्याचा पुरवठा आदेश देऊन, साहीत्य खरेदी करून गंभीर वित्तीय अनियमितता केलेली आहे.

याबाबत चौकशी होऊन दोषी व्यक्तीविरूध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून, खरेदी प्रक्रियाबाबत व खरेदी साहीत्याच्या योग्य विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर करून, अनुपालन दर्शवावे.

**3.444 अपूर्ण कामांबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यांन अर्धसमास पत्र क्रमांक

1, दिनांक 18/11/2016 ते पत्र क्रमांक 4, दिनांक 23/11/2016 दरम्यान वेळोवेळी लेख्यांची तसेच विहित नमुन्यातील माहितीची मागणी केली असता, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक 1 अन्वये सन-2015-2016 या वर्षात प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक अनुदानाचे विवरणपत्र क्रमांक 1ते 14 अन्वये सादर केले असून, सन 2015-2016 अखेर लेखाशीर्षनिहाय अपूर्ण कामे दर्शविण्यात आलेली आहेत.

विविध योजनांतर्गत विभागाने पुरविलेल्या परिशिष्ट क्रमांक 1 प्रमाणे अपूर्ण कामांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडे दिनांक 31/03/2016 अखेर पर्यंत 387 कामे अपूर्ण राहिलेली असून, त्यामध्ये एकूण रक्कम रुपये 8,89,31,000/- एवढया मोठया प्रमाणावर रक्कम गुंतलेली आहे.

2) विभागाकडून लेखापरिक्षणाकडे प्राप्त झालेली माहिती / परिशिष्टानुसार सदरच्या कामांना सन 2011-2012 पासून तर काही कामांना सन 2012-2013 पासून प्रशासकिय आणि तांत्रिक मान्यंता प्राप्त झालेली आहे.

3) उपरोक्तप्रमाणे सदरची कामे अपूर्ण का राहीलेली आहेत? या बाबतची कारणे नमूद केलेली नाहीत, अथवा त्याबाबत खुलासादेखील केलेला नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 नुसार जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक वर्षी पुर्ण केलेल्या कामांची आणि अपूर्ण कामांची स्वतंत्र यादी जिल्हा परिषदेच्या वार्षीक सभेत मान्यतेसाठी परिशिष्ट अ नुसार सादर करुन या यादीस मान्यंता दिल्यानंतर ती प्रसारीत करावयाची आहे. तसेच प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये हाती घेतलेल्या कामांबाबत योग्य नियोजन व संनियंत्रण राहणेकरिता अपूर्ण कामांचा आढावा घेऊन तसे संबंधित खातेप्रमुखांना देऊन दरवर्षी अपूर्ण कामांसाठी अर्थसंकल्पांत तरतूद राहील, याची दक्षता घेऊन वार्षीक तरतुदीपेक्षा जादा निधी आवश्यक असल्यास तरतुदीपेक्षा 70 टक्के आर्थीक निधी अपूर्ण कामांसाठी ठेवावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार विभागाने दक्षता घेवून खबरदारी घ्यावी. वेळेत कामे पुर्ण झालेली नसल्याने त्याचा उपयोग ग्रामीण जनतेला झालेला नाही. तसेच अपूर्ण् कामांमध्ये शासनाचा मोठया प्रमाणावर निधी अडकून पडणार नाही व सदरच्या कामांचा लाभ ग्रामीण जनतेस सत्वर मिळेल. याबाबत दक्षता घेण्यांत येवून अपूर्ण कामे त्वरीत पुर्ण करण्यांत यावी.

### 3.445 हातपंप संच खरेदी करणेबाबत.

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील लेखापरिक्षण कामी वित्त विभागाकडील नमूना नंबर 14 च्या नोंदवहया तसेच बिले यांची सतत तोंडी व अर्धसमास पत्रान्वये मागणी करुन देखील, वित्त विभागाकडुन सदरची नोंदवही व विभागाकडील बिले/ प्रमाणके ग्रामपंचायत पाणी पुरवठा विभागाने लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहित. त्याअभावी हातपंप संच खरेदीवर लेखापरीक्षण वर्षात नेमका किती खर्च झाला? याची पडताळणी करता आली नाही. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी रक्कम रूपये 2,03,29,650/- हातपंप संच खरेदीस प्रशासकिय मान्यता प्रदान केल्याचे दिसून येते. तथापि, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरच्या खरेदी प्रक्रियेबाबतची नस्ती, मुळ बिले इत्यादी विभागाने सादर केलेली नाहीत .

प्रशासकीय मान्यता मिळालेल्या रक्कमेसंबधातील नस्ती, हातपंप संच वाटप नोंदवही, प्रमाणके इत्यादी बाबतचे कोणतेही लेखे लेखापरिक्षणास पहावयास मिळाले नाही. त्या अभावी झालेल्या खर्चाची खात्री करता आली नाही. ती पटवावी. तोपावेतो लेखापरीक्षण कालावधीत झालेला संपूर्ण खर्च लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

### 3.446 मौजे वाघझिरा, तालुका यावल येथील शासकीय आश्रमशाळेत पाणीपुरवठा योजना करणे.

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,21,503/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 161(1) नुसार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक हाते. तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69, मध्ये पुर्ण कामाच्या नोंदी घेणे आवश्यक असतांना तसे केलेले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार न महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक साहित्य/1099/59/35, दिनांक 31/01/2000 नुसार कामावर साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

5) बाब क्रमांक 3 मधील 6 filling in Plin murum चे 8.41 घनमीटर काम केलेले आहे. त्यास महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग अधिसुचना दिनांक 11/05/2015 नुसार गौण खनिज दर रक्कम रूपये 141.34/- प्रमाणे परिमाण 8.41 साठी रक्कम रूपये 1,189/- वसूल करून शासन सदरी भरणा करावे.

**3.447 निमखेडी खु. तालुका मुक्ताईनगर येथे तात्पुरती पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 397, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,84,159/- खर्च करण्यात आला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-1098/प्र.क्र.245/पा.पु.7, दिनांक 11/01/1999 मधील परिच्छेद क्रमांक 27 अन्वये नळ पाणीपुरवठयाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदारांना देणे आवश्यक असताना संबंधीत ग्रामपंचायतींना देण्यात आलेली आहेत. ग्रामपंचायतीकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 व कार्यारंभ आदेशातील नमूद अटी व शर्तीनुसार पाईपाची खरेदी ही महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि, संचिकेत पाईप खरेदीची बिले जोडण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पाईपची खरेदी महाराष्ट्र लघुउद्योग विकास मंडळाकडूनच केलेबाबत पडताळणी करता आली नाही.

3) सदरचे कामासाठी खरेदी करण्यात आलेले पीव्हीसी पाईप अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे योग्य दर्जाचे व मापदंडाप्रमाणे असल्याबाबतचा शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल संचिकेत आढळून आला नाही. त्यामुळे खरेदी करण्यात आलेले पाईप योग्य दर्जाचे असलेबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

4) पाणी पिण्यास योग्य असल्याचे जिल्हा प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र पडताळणीस मिळाले नाही.

**3.448 मौजे गुंडेगांव तालुका अहमदनगर येथे पुरक नळ पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 9, दिनांक 14/06/2015 अन्वये रक्कम रुपये 12,07,932/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजुरी देण्यापुर्वी तपशीलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांच तंत्र शाखेत परीनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामांचे बाब क्रमांक 4 प्रमाणे पीव्हीसी पाईप 3504 र. मी पुरविणेसाठी सन 2013-2014 जिल्हा दर सुचीप्रमाणे रुपये 146/- मंजूर दर असतांना प्राकलनात व मोजमाप पुस्त्केत रुपये 156/- प्रती र.मी दर नमुद

करुन देयक पारीत केलेले आहेत. सबब 10/- रुपये जादा दराने प्रदान केल्यामुळे एकूण 3504 र.मी पाईप पुरविण्यासाठी रुपये 35,040/- मक्तेदारांस जादा प्रदान केलेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसूल करण्यांत यावी.

3) प्राकलनातील बाब क्रमांक 1 वरती मंजूर तरतुदीप्रमाणे कामे केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153 (1) नुसार मान्यता प्राप्त निर्देशांनुसार काटेकोरपणे बांधकाम पार पाडणे आवश्यक आहे. तसेच कामांच्या निविदेतील अटी व शर्ती नियम 38(1) नुसार 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पेक्षा बाबनिहाय जादा काम करता येणार नाही, असे असतांना उपरोक्त बाबीवरील वाढीचे कारणे बचत व अधिक्य विवरणपत्रातील सवीस्तर पणे नमुद केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120(1) एखाद्या बाबीवरील बचतीची रक्कम अन्य बाबीवर खर्च करता येत नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियूम 122 नुसार लेखी परवानगी देण्याबरोबरच नियम 124 प्रमाणे कामांचे आदेश पुस्तक ठेवून कार्यकारी अभीयंता यांनी सुचविले असतील, असे तोंडी विचलण आदेश यांची नोंद घेवुन यथास्थिती संबंधीत उपअभियंता अथवा कार्यकारी अभियंता यांनी साक्षांकित करुन ते कामांचे आदेश पुस्तक अंतिम देयक चुकते करण्याकरीता पाठविणे आवश्यक आहे. तथापि, नियमांतील कोणतीही कार्यवाही न करता वरिलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतूदीचे उल्लघंन करुन कमी व जादा बाबीचे काम केल्यामुळे जादा कामांचे परीमाणसाठी रुपये 72,360/- एवढ्या रक्कमेचे अनावश्यक प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधीतांकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4) सदर कामांसाठी वापरलेले पीव्हीसी पाईप अन्य साहित्य त्रयस्थ पक्षाकडून तपासणी करुन चाचणी अहवाल ठेवलेला नाही.

### 3.449 ग्रामपंचायत डिकसळ नळ पाणीपुरवठा योजना विहिर दुरुस्ती व खोलीकरण करणे.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 49, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,25,596/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामांचे प्राक्कलना सोबत कामांबाबत सर्वसाधारण वर्णनामध्ये योजनाच्या कामा बाबत 7.5 एच पी जुना पंप ऐवजी 7.5 एच पी नवीन पंप बसविणे ही एकच बाब प्रस्तावित आहे. परंतू, त्या अनुषंगिक व्हर्टिकल ड्राप पाईप 50 एम एम डाय, तसेच टी पी एन व्हीच, स्ट्रार्टर, कट आऊट, एमेटर. व्होटामिटर इत्यादी साहित्य बदलविणे व अथवा कामे करणे इत्यादी बाबी प्रस्तावित केलेल्या नाहीत. तरी प्राकलनात सदरचे साहित्य बदलविणेच्या तरतूदी केलेल्या आहेत. ही बाब वास्तविकतेला धरून नाही. तरी प्राकलन सत्य परिस्थितीच्या आधारे करण्यात आलेले नाही. फक्त 7.5 एच पी पंप जुना पंप बदलिविण्याचे ग्रामपंचायतीने विभागास कळविलेले आहे. असे असतांना उपरोक्त अनुषंगिक सहा प्रकारचे साहित्य प्राकलनात दर्शवून खर्च करणे अनावश्यक आहे. तरी सदरच्या सहा प्रकारच्या साहित्यावर केलेला खर्च रक्कम रुपये 23,350/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) 7.5 एची नवीन पंप बसविल्यानंतर जुना 7.5 एच पंप ग्रामपंचायतीच्या जड संग्रह नोंदवहीत घेतला किंवा कसे, यांची कागद पत्रे तसेच अहवाल अभावी खात्री करता आली नाही. सबब जुन्या पंपाची व साहित्यांची पंचायतीने काय विल्हेवाट लावली? याबाबत खुलासा करण्यात यावा व जड नोंदवहीत नोंदी घेण्यात याव्यात.

3) सदर योजनेच्या कामांचे, काम करण्याचे पुर्वीचे, काम प्रगतीचे व काम पुर्णत्वाचे फोटो काढून नस्तीत ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) सदर कांमाचे बाब क्र 8 व 9 वरती 1.2.4. आर सी सी कॉंक्रीट चे काम केलेले आहे. कामावरील साहित्य वापराबाबतचा चाचणी अहवाल घेतलेला नाही. शासन निर्णय क्रमांक 1012/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या रेती, खडी, सिमेंट इ. साहित्याची साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल प्रयोगशाळेकडुन घेणे आवश्यक आहे. आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) नस्तीत जोडलेल्या पाणी उपसणे कांमाचे लॉक बुकांतील गोषांवारे वरती तांत्रिक अधिकांरी यांनी भेट देऊन कांमाची पाहणी करून लॉक बुक प्रमाणीत केलेले नाहीत व लॉक बुकावरती ग्रामसेवक, सरपंच व उपअभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

**3.450 मधलामळा पिंपरे खु. तालुका पुरंदर नळ पाणी पुरवठा दुरुस्तीबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर कामावर रक्कम रूपये 6,87,621/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंपिंग मशिनरी बाब क्रमांक 9 : providing and erecting cable etc. 3 core 4.00 sqm mm, 80 rmt 3 core 2.25 sqm प्राकलनात नमुद असताना प्रत्यक्ष 65 Rmt cable केबलचा वापर करुन प्रति मिटर रक्कम रुपये 156/- प्रमाणे रक्कम रुपये 10,140/- अदायगी केलेली आहे. वास्तविक पाहता कामाच्या सर्वसाधारणा माहिती अहवालानुसार सदर विहिरीचा व्यास 6.00 मिटर व खोली 8.50 मीटर (म्हणजेच 27.88 फुट) नमुद असताना 65 मिटर केबल वापरल्याने (27.88+12.12=40x156) रक्कम रुपये 6,240/- देय असताना रक्कम रुपये 3,900/- जादा अदाई झालेली आहे. जादा अदाई रक्कम रुपये 3,900/- वसूल करून शासन निधीत भरणा करण्यात यावा.

2) पंपिंग मशिनरी बाब क्रमांक 5 : providing and erecting GI pipe 80mm B class GI Pipe एकूण परिमाण 14 rmt करीता 662.70/- दराने एकूण रक्कम रुपये 9,277/- अदाई करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता कामाच्या सर्वसाधारण माहिती अहवालानुसार सदर विहिरीचा व्यास 6.00 मिटर व खोली 8.50 मीटर म्हणजेच 27.88 फुट नमुद असताना सदर पाईप 14 rmt वापरण्याने 5.5 rmt करीता रक्कम रुपये 3,644/- जादा अदाई झालेली आहे. जादा अदाई रक्कम रुपये 3,644/- वसूल करून शासन निधीत भरणा करण्यात यावा.

3) सदर कामामध्ये बाब क्रमांक 1 : Desmetaling dead pipe line (90 mm PVC 6KG) करीता 1090 rmt करीता रूपये 89.10/- या दराने रक्कम रुपये 97,119/- अदाई केलेली आहे. तशी नोंद मोजमाप पुस्तिका क्रमांक 2400 पान क्रमांक 51 ते 54 वर (1090 x.30 घेण्यात आलेली आहे.) पुन्हा बाब क्रमांक 2 मध्ये excavation for foundation/pipe trenches in hard rock by controlled blasting करीता 446.12cum खोदाई करून 586.30 प्रती cum ने रक्कम रुपये 2,61,601.19/- रुपये अदाई केली आहे. वास्तविक पाहता सरासरी .60 hard rock दर्शविल्याने dismetaling ची खोदाई सरासरी .30 काय आधारे दर्शविली याबाबत खुलासा करावा.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 प्रमाणे मोजमाप पुस्तीकेमध्ये मापे नोंद करुन त्याचा गोषवारा काढुन देयक तयार करुन देयक अदा केलेनंतर नियम 180 प्रमाणे लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता देयक आदा केलेनंतर लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणेत आलेली नाही. सदरची बाब नियमबाह्य असुन त्यामुळे दुबार देयक अदा होणेची शक्यता नाकारता येत नाही. आता देयक आदा केलेबाबत कर्ण रेषा ओढुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावे.

5) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 34 आर्टिकल 63 मधील दिनांक 20/04/2015 च्या सुधारणेनुसार कार्यकरार करताना दहा लक्ष पर्यंतच्या रक्कमाच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्ष रक्कमेपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रक्कमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारून त्यावर करारनामा करणे आवश्यक असताना सदर कामाचा कार्यकरार करताना रक्कम रुपये 100/- इतके शुल्क आकारल्याने करारनामा विधीग्राह्य ठरत नाही. सबब शासनाच्या रक्कम रुपये 400/- महसुलाचे नुकसान झालेले आहेत. आता रक्कम रूपये 400/- वसूल करून शासन निधीत भरणा करण्यात यावा.

**3.451 भिमाशंकर, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे जलशुद्धीकरण केंद्र संरक्षण भिंत व संकीर्ण कामे करणेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर कामावर रक्कम रूपये 12,96,611/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114,118,120 व 152(2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरु नये. तसेच एखादया बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता सदरचा खर्च रक्कम रूपये 1,25,728/- केला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 120 (2) नुसार प्राकलनात घेण्यात आलेली एखादी बाब काम करताना लेखी नसल्यास त्यावरील तरतुद इतर बाबींवर खर्च करू नये, असे असताना प्राक्कलनात असलेली तथापि, कार्यान्वयीत न झालेल्या बाबीवरील बचत इतरत्र खर्च करण्यात आली आहे. काही बाबींचा वापर न केल्याने सदर बाबींचा अंदाजपत्रकात समावेश काय आधारे करण्यात आला? याबाबत खुलासा करावा.

3) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकिर्ण अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जिप/बां./प्र.क्र.793, दिनांक 25/03/2011 नुसार कामाचा व कामगाराचा विमा काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक आहे. तथापि, काम सुरु करण्यापुर्वी विमा न उतरविल्यास पहील्या धावत्या देयकातुन 1 टक्के रक्कम रूपये 13,304/- वसुल करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 6,483/- वसुल केली आहे. आता कमी वसुली रक्कम रुपये 6,821/- संबंधीताकडुन वसुल करावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम नियम 180 व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परिशिष्ट-24 (नियम-13 ते 15) नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात दुसरी कर्ण रेषा मारुन पूर्तता केलेली नाही.

**3.452 मौजे खिरेश्वर, आश्रमशाळा तालुका जुन्नर नळ पाणी पुरवठा दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदर कामावर रक्कम रूपये 9,49,470/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठक्करबाप्पा अदिवासी उपयोजना या लेखाशिर्षाखाली सन 2009-2010 मध्ये जावक क्रमांक ठबया/1409/प्र.क्र.1 का 4(2)/1963 प्रकल्प अधिकारी ए अदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे दिनांक 03/06/2010 अन्वये रक्कम रूपये 1,05,90,047/- अनामत लेखाशिर्षामध्ये अनुदान प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नमुना नंबर 83 मध्ये अनामत परतावा म्हणून रक्कम खर्च दाखविली आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-9002/प्र.क्र./आर्थोपाय, दिनांक 20/06/2008 अन्वये दोन वर्षापेक्षा जादा कालावधीची रक्कम शासनाला परत करणेऐवजी कामावर खर्च केला आहे.

2) निविदा शर्त क्र.14 व 15 व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 52(2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरु नये. तसेच एखादया बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रुपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता रक्कम रूपये 72,562/- खर्च करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 तसेच निविदा शर्त क्रमांक 2 नुसार किमान 1 टक्के दंड जास्तीत जास्त 10 टक्के रक्कम आकारण्याची तरतुद आहे. ठेकेदाराचा अर्ज विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने किमान 1 टक्के रक्कम रुपये 94,947/- संबंधीताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणेत यावी. त्याचप्रमाणे सदर मुदतवाढीला जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148

(1) नुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक गौणखनिज 10/1009/प्र.क्र.309/ब, दिनांक 11/02/2010 (मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 अनुसुची 1 व 2) नुसार सदर कामामध्ये गौण खनिजाचा वापर करणेत आलेला असून गौण खनिजाची रक्कम कपात केल्याचे दिसून येत नाही. सदर रक्कम रूपये 2,774/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 व त्यातील दिनांक 17/06/2010 आदेशातील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1टक्के उपकराची रक्कम रूपये 9,495/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 6,467/- वसुल केली आहे. आता कमी वसुल रक्कम रूपये 3,028/- संबंधीताकडून वसुल करुन शासन निधीत भरणा करावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम नियम 180 व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परिशिष्ट-24 (नियम-13 ते 15) नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात दुसरी कर्ण रेषा मारुन पूर्तता केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-1087/सीआर-94/ इमारती-2, दिनांक 14/07/1989 अन्वये व निविदा बी-1 क्लॉज 20 मध्ये दोषदायित्वाचा कालावधी निश्चित करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. सदरबाबत नियमबाहयता झाली आहे.

**3.453 पुणे जिल्हयातील दौंड, इंदापूर, हवेली, शिरूर व खेड तालुक्यातील गावांना आर ओ संयंत्र पुरवठा करणे व बसविणे व आर ओ रूम बांधणे कामाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 52) -** सदर कामावर रक्कम रूपये 10,06,50,000/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, पुणे यांचे पुरवठा आदेश जावक क्रमांक वशी/लेखा-10/02/2014, दिनांक 11/05/2014 अन्वये मे. वेदांत इक्विप सेल्स and सर्विस प्रा. लि. खंडाळा जिल्हा सातारा यांना आर ओ संयंत्र खरेदी व बसविणेची या आदेशातील 5 तालुक्यातील रक्कम रुपये 6,36,14,816/- इतक्या मूल्याची 87 कामे अपूर्ण असताना आदेश क्रमांक ग्रापापु/वशी लेखा 10/321/2014, दिनांक 01/09/2014 अन्वये 34 गावांना रक्कम रुपये 2,22,10,638/- मूल्याची संयंत्र बसविणे कामाचे पुन्हा त्यानांच पुनर्प्रत्ययी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. सदर अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) 34 कामांचे आर ओ संयंत्र पुरवठा करून कार्यान्वयित करून देणे कामाचे पुनर्प्रत्यायी पुरवठा आदेश जावक क्रमांक वशी/लेखा-10/321/2014, दिनांक 01/09/2014 अन्वये देण्यात आलेले असून त्याच 34 कामांचे आर ओ शेड बांधने कामी आदेश जावक क्रमांक ग्रापापु/लेखा-10/330/2014, दिनांक 04/09/2014 अन्वये संबंधीत ग्रामपंचायतींना आदेशीत करून अनुदान उशिरा वितरण केल्याने आर ओ शेड बांधणे काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही तथा त्यास प्राधान्य क्रम न दिल्याने त्याचे कोणतेही नियोजन नसताना पुनर्प्रत्यायी पुरवठा आदेश आर ओ शेड बांधण्याचे आदेशांनुसार 3 दिवस अगोदरच संबंधीत संस्थेला दिल्याने वित्तीय औचीत्यातील तत्वांचा भंग संबंधीतांनी केलेला आहे.

3) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद पुणे पुनर्प्रत्ययी पुरवठा आदेश क्रमांक ग्रापापु/वशी लेखा 10/321/2014, दिनांक 01/09/2014 अन्वये 34 गावांना रक्कम रुपये 2,22,10,638/- मूल्याची संयंत्र बसविणे कामाकरीता बँक गॅरंटी न घेतल्याने नियमबाह्यता झालेली आहे.

4) महाराष्ट्र शासन, उर्जा व उद्योग विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/1088/2512/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट सात मधील मार्गदर्शक तत्व क्रमांक 4 नुसार ज्या वस्तूची खरेदी पुनर्प्रत्ययी आदेशान्वये करावयाची आहे, त्या वस्तूचे बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसतील वा कमी राहणार

नसतील किंवा ह्या किमती स्थिर राहणार आहेत वा प्रमानिकृत आहेत, याची शाहनिशा करण्यात यावी व असे खरेदी समिती समोर कागदोपत्री सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न केलेने नियमबाह्यता झालेली आहे.

5) आर ओ संयंत्र पुरवठा करण्याची 87 कामांपैकी 49 कामे व पुनर्प्रत्यायी पुरवठा आदेशातील 34 कामापैकी 30 कामे काम पूर्ण करावयाच्या विहित मुदतीपेक्षा 6 महिने ते 1 वर्षे 3 महिने उशिराने पूर्ण झालेल्या तथा अद्‌याप पूर्ण न झालेल्या कामांच्या रक्कमेवर निविदेतील अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार उशिरा पूर्ण केलेल्या कामाच्या किमतीच्या 5 टक्के दंड रक्कम रुपये 9,03,936/- वसूल करून जिल्हा निधीत भरणा करावा.

6) उपसंचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक प्रविनि-2310/सा.बा.वि/ विमावसूली/अभि-3, दिनांक 08/09/2010 अन्वये 1 टक्के कामगार विमा कामाचे मुल्यानुसार देयकातून कपात करून विमा संचालनालय भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, सन 2015-2016 ची आर ओ संयंत्र पुरवठा करून बसविणे कामाची देयके तपासणी केली असता प्राप्त देयकातून विमा रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा केलेला आहे व विमा पत्रही नस्ती सोबत आहे. परंतु, उशिरा पूर्ण झालेल्या कामांच्या मुदतवाढ कालावधीकरीताचे विमा प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे उर्वरित काम पूर्ण करताना संबंधीत कामगारांना विमा कवच मिळाले नाही.

7) प्रशासकीय मान्यता आदेश व कार्यारंभ आदेशान्वये आर ओ संयंत्र संबंधीत ग्रामपंचायतीस हस्तांतर केलेबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसून आले नाही.

8) आर ओ शेड बांधणे या 87 कामांपैकी 49 कामे व नंतरच्या 34 कामापैकी 30 कामे काम पूर्ण करावयाच्या विहित मुदतीपेक्षा 6 महिने ते 1 वर्षे 3 महिने उशिराने पूर्ण झालेल्या तथा अद्‌याप पूर्ण न झालेल्या कामांच्या आर ओ शेड पूर्ण केल्याबाबत विनादंडाने कार्यवाही करून देयके नियमबाह्यपणे मंजुरी दिल्याने नियमबाह्यता झालेली आहे. आता एकूण 79 कामांचे मुदतवाढ कालावधीतील रक्कम रुपये 1,37,09,180/- करिता 1 टक्के दंड रक्कम रुपये रक्कम रुपये 1,37,092/- संबंधीताकडून वसूल करून जिल्हा निधीत भरणा करावा.

9) 49 कामे मुळ मुदतीपेक्षा 1 वर्ष 8 महिने उशिरा व 30 कामे 2 वर्षे 3 महिने उशिरा पूर्ण केल्याने तालुका दौंड, इंदापूर, हवेली, शिरूर व खेड तालुक्यातील दुषित पाण्याने बाधीत गावांतील नागरिकांना तेवढा काळ म्हणजेच 2 वर्षे 3 महिने सदर योजनेपासून वंचित राहावे लागले आहे.

10) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग अधिसुचना क्रमांक 67, दिनांक 15/05/2015 अन्वये गौणखनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची प्रति घन मिटर रक्कम भरणा करण्यात आलेली नाही. सबब पूर्ण झालेल्या कामांबाबत गौणखनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची वसूल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

11) उपसंचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक प्रविनि 2310/विमावसूली/वि.बा.सा./अभि-3, दिनांक 08/09/2011 अन्वये 10 टक्के कामगार विमा कामाचे मुल्यानुसार देयकातून कपात करून विमा संचालनालय भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, सन 2015-2016 ची आर ओ शेड बांधणे कामाची देयके तपासणी केली असता प्राप्त देयकातून विमा रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा केलेला आहे व विमा पत्रही नस्तीसोबत आहे. परंतु, उशिरा पूर्ण झालेल्या कामांच्या मुदतवाढ कालावधीकरीताचे विमा प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे उर्वरित काम पूर्ण करताना संबंधीत कामगारांना विमा कवच मिळाले नाही.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 97 नुसार सदर कामाची नोंद घेतलेली स्थावर मालमत्ता नोंदवही रजिस्टर नमूना क्रमांक 39 लेखापरीक्षणास सादर करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता 2011 मधील नियम नमुना क्रमांक 25 मध्ये नोंद घेतल्याबाबत कागदोपत्री खात्री केलेचे दिसून येत नाही.

13) शिवचैतन्य कॉलनी, मांजरी बुद्रुक, वाक वस्ती, साळुंखे वस्ती, मांजरी खुर्द, तालुका हवेली, ता. चीम्बळी बर्गे वस्ती तालुका खेड खालील कामे रद्द केलेबाबत खुलासा करावा.

**3.454 नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना, शासन निर्णय दिनांक 18/11/2011 नुसार प्रती कुटुंब खाजगी नळ जोडणी अनुदान रुपये 4,000/- व वैयक्तिक शौचालय प्रति कुटुंब अनुदान रुपये 11,000/- (95 टक्के शासन अनुदान व लाभार्थी हिस्सा 5 टक्के) या प्रमाणे सदर योजना राबविली जात आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधी 1111/प्र.क्र.156/पापु 07, दिनांक 18/11/2011 नुसार खाजगी नळ जोडणी प्रती कुटुंब अनुदान रक्कम रुपये 4,000/- व वैयक्तिक शौचालय प्रती कुटुंब अनुदान रक्कम रुपये 11,000/- लाभार्थींस देय आहे. शासनाकडून अनुदान प्राप्त करणेपूर्वी सदर योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी संख्या तालुकानिहाय निश्चित न करता अनुदान रक्कम रुपये 5,11,87,241/- प्राप्त करण्यात आले आहे, असे दिसून येते. आवश्यकतेपेक्षा शासनाकडून जादा अनुदान प्राप्त करुन लाभार्थींस अनुदान वाटपाविना रक्कम रुपये 1,36,82,298/- निधी शिल्लक राहिला आहे. त्यामुळे प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने खर्च न झालेने योजनेचा उद्देश सफल झालेला नाही, असे दिसून येते.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक 10.02/प्र.क्र.128 आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली निश्चित केलेली आहे. आर्थिक वर्षात प्राप्त झालेले अनुदान पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात येईल असे नमूद आहे. तथापि, शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही न केल्याने सन 2012-2013 ते 2015-2016 अखेर रक्कम रुपये 1,36,82,298/- एवढे अनुदान शिल्लक राहिले असून याबाबत शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) लाभार्थींना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे याकरीता तालुका व गाव पातळीवर स्वच्छतेविषयी जनजागृती करणे आवश्यक होते जेणेकरुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना सदर योजनेअंतर्गत लाभार्थींना लाभ घेता आला असता. तसेच सध्या राहिलेला अखर्चित निधी रक्कम रुपये 1,36,82,298/- मधून लाभ मिळाला असता परंतु सदर योजनेतून 1244 लाभार्थी वंचित राहिले असलेने योजनेचा उद्देश सफल झाला आहे, असे म्हणता येणार नाही.

4) पंचायत समिती जावली, पाटण यांनी प्राप्त अनुदानापेक्षा जादा रूपये 4,55,508/- इतका जादा खर्च केलेला आहे. अनुदानापेक्षा जादा खर्च कोणत्या योजनेतून केला याचा बोध होत नाही.

5) शासन आदेश दिनांक 18/11/2011 नुसार काम पुर्ण झालेवर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांना पाठविणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

6) सन 2015-2016 च्या वार्षिक लेख्यांमध्ये विशेष घटक योजना या लेखाशिर्षाखाली सन 2014-2015 चा अखर्चित निधी रक्कम रुपये 37,892/- दर्शविला आहे. मात्र सादर केलेल्या माहितीच्या आधारे सन 2014-2015 चा अखर्चित निधी रुपये 1,57,82,047/- दाखविण्यात आला आहे. परंतू, सन 2015-2016 च्या अंदाजपत्रकात खर्चासाठी तरतूद केलेली नाही. मात्र खर्च रक्कम रुपये 20,99,749/- केलेचे दिसून येते. त्यामुळे आकडेवाडी वास्तववादी दिसून येत नाही.

**3.455 निर्लेखित वाहने व त्यांच्या लिलावाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत यांत्रिकी विभागाकडे विविध विभाग तसेच पंचायत समिती यांचेकडून निर्लेखित केलेली वाहने जमा केली जातात. यांत्रिकी विभागाने लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 18/04/2015 रोजी जाहिरातीद्वारे बोली प्रक्रिया राबवून लिलाव घेतलेले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने सादर केलेल्या यादीनुसार 30 वाहने रुपये 16,76,500/- रक्कमेस लिलावामध्ये घेतलेली असून त्यांची रक्कम जिल्हा निधी - 1 या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात आलेली आहे. तथापि, यापैकी शासन अनुदानातून घेतलेल्या वाहनांची रक्कम शासन सदरी जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) यांत्रिकी विभागाने सादर केलेल्या यादीनुसार एकूण 4 वाहनांची बोली अमान्य झाली. 26 वाहने लिलावात विक्री झाली. तथापि, विभागाकडे एकूण किती वाहने जमा झाली? त्यापैकी यापूर्वी किती वाहनांची विक्री झाली? तसेच लिलावानंतर किती वाहने शिल्लक आहेत? तसेच सदर वाहने कोणकोणत्या दिनांकास जमा करण्यात आली? याबाबतची कोणतीही नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लिलावाशिवाय परस्पर वाहनांची विल्हेवाट लावली जाण्याची किंवा लिलावामध्ये सर्व वाहने न घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सक्षम अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करणे आवश्यक आहे.

3) वाहने लिलावामध्ये विकल्यानंतर तात्काळ वाहने संबंधीत खरेदीदारांच्या नावे करुन मगच ती ताब्यात देणे आवश्यक असतांना लिलावामध्ये विकलेली वाहने संबंधीतांनी नावावर केलेबाबतची कोणतीही कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे अद्यापपर्यंत वाहने जिल्हा परिषदेच्या मालकीची असून भविष्यात वाहनांचा अपघात अगर बेकायदेशीर कामांसाठी वापर केला गेल्यास त्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर येणार आहे. याबाबत सन 2009-10 मध्ये प्रमाणक क्रमांक 52, रुपये 2,63,627/-, दिनांक 11/03/2010 ने वाहन क्रमांक एम.एच.11-4023 चे लिलावाद्वारे विक्री होऊनही केवळ वाहन संबंधीतांच्या नावे वर्ग न केल्याने जिल्हा परिषदेस न्यायालयीन निर्णयाद्वारे नुकसान भरपाई रूपये 2,63,627/- द्यावी लागली होती. तरीही याबाबत संबंधीत विभागाने कोणताही धडा न घेता कार्यपध्दतीत सुधारणा केलेचे लेखापरीक्षणास दिसून येत नाही.

### 3.456 मौजे राजवडी येथे पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे (12,000 लिटर क्षमता) व पाईपलाईन करणे (252 मीटर), तालुका माण.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 86,274/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचा आदेश दिनांक 17/01/2013 चा असून मक्तेदाराचे जोतिर्लिंग मजूर सहकारी संस्था लि., तालुका माण यांना सचिव, अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी सदर कामाचा आदेश दिला आहे. कामाची मुदत चार महिने म्हणजेच दिनांक 16/05/2013 रोजी पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु मजूर संस्थेने दिनांक 05/01/2014 रोजीच्या अर्जान्वये मुदत वाढीसाठी अर्ज करुन मुदतवाढीसाठी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत राजवडी ग्रामसभेने दिनांक 31/08/2015 अखेर मुदतवाढ दिली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 नुसार मक्तेदाराने काम संपणेपूर्वी मुदतवाढीसाठी 15 दिवस अगोदर विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक असता प्रस्तुत प्रकरणी विना दंड मुदतवाढ देणे नियमबाह्य आहे.

2) कामगार उपकर रक्कम रुपये 863/- दुसरे अंतिम बिलातून वसूल केलेली नाही. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार/7अ, दिनांक 17/06/2010 नुसार कामगार उपकर वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) महसुल व वन विभागाची अधिसुचना दिनांक 11/05/2015 नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याची गौणखनिज स्वामित्व धनाची वसुली बिलातून करण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी 12,000 लिटर क्षमतेची बैठी टाकी बांधण्यात आली आहे. सदर टाकी बांधकामासाठी लागणारे साहित्य वाळू, खडी व डबर यांचे स्वामित्वधन बिलातून वसूल करुन शासनास भरणा केलेले नाही. परिगणना करुन वसुली होणे आवश्यक आहे.

4) बांधलेली 12,000 लिटर क्षमतेची बैठी टाकी ज्या जागेत बांधली त्या जागेचा 8 अ चा उतारा नस्तीसोबत जोडला नाही. त्यामुळे जागेचा मालकी हक्क ग्रामपंचायत राजवडीचा असलेबाबत सिध्द होत नाही.

**3.457 मौजे किल्ले मच्छिंद्रगड नळ पाणीपुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** किल्ले मच्छिंद्रगड नळ पाणीपुरवठा करणे या कामावर रक्कम रुपये 5,10,272/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामचा तांत्रिक मान्यता आदेश हा दिनांक 10/01/2014 रोजी देण्यात आलेला होता. सदर आदेशातील अट क्रमांक 2 नुसार जिल्हा परिषद लेखा संहितेनुसार निविदा प्रक्रिया राबविणेत यावी अशी अट घालणेत आलेली आहे. किल्ले मच्छिंद्र गड ग्रामपंचायतीने सदर कामासाठी निविदा प्रक्रिया ही दिनांक 12/12/2013 ते दिनांक 24/12/2013 दरम्यान राबविलेली आहे. तांत्रिक आदेश 10/01/2014 रोजी दिलेला असताना निविदा प्रक्रिया डिसेंबर महिन्यात केल्याने नियमबाह्यता झालेली आहे.

2) सदर कामाच्या देयकातून कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल करणेत आलेली नाही. तरी कामगार कल्याण उपकराची रक्कम रुपये 4,681/- वसूल करून शासन खाती भरणा करणेत यावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 114,118,120 व 152 (3) व बी 1 टेंडर फॉर्म मधील कलम 38 (1) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना खालीलप्रमाणे जादा काम करण्यात आले आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरु नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता रक्कम रूपये 1,36,576/- खर्च केला आहे.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-1087/सीआर-94/इमारती-2, दिनांक 14/07/1989 अन्वये व निविदा बी-1 क्लॉज 20 मध्ये दोषदायित्वाचा कालावधी निश्चित करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) सदर कामामध्ये 80 mm ची gi pipe व 90 mm चे pvc पाईप वापरण्यात आलेली आहे. सदर बाबीसाठी 0.70 रुंदी मध्ये खुदाई करणे आवश्यक असतानाही 0.75 mm मध्ये खुदाई करणेत आलेली आहे. सदर जादा खुदाई मुळे जादा रक्कम रूपये 27,608/- अदा करणेत आलेली आहे. सदर रक्कम वसूल करणेत यावी.

6) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104(अ)/पापु 07, दिनांक 17/03/2010 नुसार सन 2015-2016 च्या आराखड्यास शासनाची मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी मंजुरी मिळाली असलेबाबतचे आदेश अर्धसमास पत्र क्रमांक 12, दिनांक 14/09/2017 अन्वये मागणी करूनही लेखापरीक्षनास उपलब्ध केलेले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/प्र.क्र.104/(पापु)/07, दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 8 (1) नुसार प्रत्येक स्टेजसाठी कार्यारंभ आदेश स्वतंत्रपणे देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/प्र.क्र.104/(पापु)/07, दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक क्रमांक 11 नुसार योजना पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने एक वर्ष योजना चालविणे आवश्यक आहे व योजना एक वर्ष चालाविल्याबाबत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ठेकेदारास 10 टक्के रक्कम देय आहे. सदर योजनेत अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.458 मौजे डोंगरवाडी, तालुका वाळवा नळ पाणी पुरवठा योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** मौजे डोंगरवाडी, तालुका वाळवा नळ पाणी पुरवठा योजनेबाबत पहिला हप्ता रूपये 4,85,170/- व प्रमाणक क्रमांक 735, दिनांक 31/03/2016 रूपये 6,48,760/- अंतिम हप्ता वित्त प्रेषण देण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे दर घेणे आवश्यक असताना मोजमाप पुस्तकात अंदाजपत्रकापेक्षा नमूद दरापेक्षा जादा दर घेऊन पुरवठा दारास जादा रक्कम अदा करणेत आलेला आहे. सदर दराबाबत मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच मोजमाप पुस्तकातील छायांकित प्रतनुसार अभियंता यांनी

दिनांक 18/08/2008 नुसार रूपये 5,41,831.70/- व दिनांक 01/11/2010 रुपये 10,98,930.73/- चे नोंदी केल्याचे नमूद आहे. सदर काम हे दिनांक 15/11/2010 ला पूर्ण झाले असता जादा दर प्रदान करणे आवश्यक नसताना रक्कम रूपये 83,155/- जादा प्रदान करणेत आलेला आहे.

2) dewatering साठी 23.10 bhp मोटार वापरून रुपये 2,400/- दराने रुपये 35,440/- प्रदान करणेत आलेले आहेत. परंतु, सदरबाबतचे लॉग बुक नस्तीस आढळून आलेले नाही.

3) नळ पाणी पुरवठा योजना मुल्यांकन रूपये 10,98,931/- बांधकामातुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार देयकातुन आयकर रक्कम रुपये निरंक भरणा केल्याचे सनदी लेखापाल अहवालावरून दिसते. वास्तविक देयकातून रक्कम रुपये 21,978/- आयकर वसूल करणे आवश्यक आहे.

4) मुल्यांकन रूपये 10,98,931/- च्या 1 टक्के कामगार विमा व 1 टक्के कामगार उपकर कपात करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 नुसार असाधारण क्रमांक 22, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिसूचना क्रमांक विसआ (मुख्य)1/मूवक/2005/97, दिनांक 04/04/2012 अन्वये सुधारणा करण्यात येऊन नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून दिनांक 01/04/2012 पासून 4 टक्के ऐवजी 5 टक्के कपात करण्यात यावा व इतर नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के कपात करणे आवश्यक आहे. रक्कम रुपये निरंक भरणा केल्याचे सनदी लेखापाल अहवालावरून दिसते. रक्कम रूपये 54,947/- कमी जमा केल्याचे दिसुन आले.

6) जाहीरात प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही.

7) सुरक्षा ठेव रक्कम रूपये 1,88,638/- ठेवणे आवश्यक असताना रूपये 37,300/- ठेवण्यात आली आहे.

8) अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार 7 टक्के आकस्मिक खर्च व प्रशासकीय खर्च म्हणून रूपये 76,927/- प्रदान करण्यात आले आहे. परंतु, सनदी लेखापालाच्या अहवालानुसार रुपये 47,591/- खर्च झालेला आहे. जादा अनुदान रक्कम रुपये 29,336/- वसूल होणे आवश्यक आहे.

10) बांधकामांकरिता सिमेंट, खडी, मुरूम, रेती, गिट्टी ई. गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना दिनांक 11/02/2010 नुसार रूपये 70.67 प्रती घन मीटर प्रमाणे रॉयल्टी शासनास भरणे आवश्यक आहे.

**3.459 चांदोली धनगरवाडा, तालुका शाहुवाडी येथे नळ पाणीपुरवठा करणे कामाच्या अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 25,26,431/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक (raising main) बाब क्रमांक 6 व 7 प्रमाणे कामावर 50 MM GI पाईप, 63 MM 10 kg व 6 kg HDPE पाईप पुरवठा करून बस्ती करण्याची तरतूद केली असून त्याचे परिमाण 2440 रनिंग मीटर इतके आहे व त्याप्रमाणे मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. पुरवठा पाईप बस्ती करणे करिता 1963 रनिंग मीटर लांबीने खुदाई केल्याची नोंद मोजमाप नोंदवही पृष्ठ क्रमांक 36 ते 38 वर घेण्यात आली आहे. तर मोजमाप नोंदवही पृष्ठ क्रमांक 39 वर पुरवठा पाईप 2440 रनिंग मीटर मधून 1963 रनिंग मीटर पाईप बस्ती केल्याची मापे नमूद केली आहेत त्यामुळे 63 MM 6 kg HDPE शिल्लक पाईप 477 रनिंग मीटर शिल्लक राहिली असून शिल्लक पाईप विभागाच्या ताब्यात दिलेली नाही. त्यामुळे मक्तेदारास रक्कम जादा अदा झाली आहे. सबब जादा अदा रक्कम रूपये 47,700/- संबधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

2) कामाचे अंदाजपत्रक (raising main) बाब क्रमांक 7 प्रमाणे कामावर पुरवठा 6 kg HDPE पाईप बसवणे जिल्हा दरसूची पान क्रमांक 117 आयटम क्रमांक 3 प्रमाणे मूळ दर 22 इतका असून 12 (10+1+1) टक्के अधिक्य विचारात घेता तो रूपये 25/- पर रनिंग मीटर होतो. तथापि चुकीचा दर घेऊन दर पृथ्थकरण करून तो प्रति रनिंग मीटर 41.44 असा निश्चित केल्याने प्रति रनिंग मीटर 16.44 इतका जादा दर निश्चित केल्याने सदर कामाचे एकूण परिमाण 323 रनिंग मीटर करिता 323 x 16.44 = रुपये 5,310/- इतकी रक्कम मक्तेदारास जादा अदा झाली आहे ती वसूल होणे आवश्यक आहे.

3) रायझिंग मेन पाईप अंदाजपत्रक बाब क्रमांक 6 प्रमाणे पाईप पुरवठा करण्याची तरतूद केली असताना त्यापेक्षा जादा परिमाण पुरवठा करून काम केले आहे.

4) कामावर 63 MM 10 kg व 6 kg पाईप दिनांक 26/03/2016 रोजी पुरवठा केल्याची मोजमाप नोंदवही पृष्ठ क्रमांक 39 वर नोंद घेण्यात आली असून अभियांत्रिकी इंजिनिअरिंग संस्था गारगोटी यांचा पाईप दर्जा तांत्रिक तपासणी अहवाल दिनांक 22/03/2016 रोजीचा आहे. सबब कामावर पुरवठा करण्यापूर्वीच त्याची तांत्रिक तपासणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते.

5) योजनेचा प्रकल्प अहवाल प्रमाणे पंपिंग हेड 162 इतके असून याकरिता 3.67 BHP क्षमतेची विद्युत मोटारची आवश्यकता असल्याचे नमूद केले असून याकरिता 5 BHP क्षमतेची मोटर पुरेशी असताना प्रत्यक्षात 7.5 BHP क्षमतेची विद्युत मोटर पुरवठा केल्याचे दिसून येते. त्यामुळे गरजेपेक्षा जादा किमतीची मोटर खरेदी करून यावर जादा रक्कम खर्च केली असल्याचे स्पष्ट होते.

6) योजनेची विहीर मौजे चांदोली येथील भूमापन क्रमांक 43 मधील 17.2 आर क्षेत्रामध्ये खुदाई केली असून सदर क्षेत्र आनंद भिवा पाटील यांनी ग्रामपंचायतीस बक्षीस दिले आहे. तथापि, ग्रामपंचायतीचे नाव महसूल अभिलेख अधिकारपत्री जमिनीचा 7/12 उतारा पाहता दाखल केलेले नाही.

7) सदर नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करताना चांदोली धनगरवाडयाची 2014 ची लोकसंख्या 400 इतकी घेण्यात आली असून याबाबत सांखिकी अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

8) शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5, दिनांक 30/06/2000 अन्वये विहीर बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सिमेंटची चाचणी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक एसटीआर/1097/ प्र.क्र.106/सांबा, दिनांक 09/02/1998 नुसार काम सुरु होण्यापूर्वी कामावर वापरण्यात येणा-या वाळू, व खडी यांची चाचणी शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून करुन घेवून अहवाल प्राप्त करणे आवश्यक होते. अशी कार्यवाही केली नाही.

9) कामाचे उप अंदाजपत्रक बाब क्रमांक 4 प्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना सुस्थितीत चालू असल्याबाबत एक महिना चाचणी देण्याची आहे. तथापि याबाबचा अहवाल सादर केलेला नाही.

**3.460 मौजे सांगरूळ, तालुका करवीर येथे 24 x 7 पाणीपुरवठा योजनेवर वाटर मीटर बसवणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 82,00,700/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सांगरूळ गावात राष्ट्रीय पेयजल योजनेतून झालेल्या योजनेतून लोकांना नळ पाणीपुरवठा जोडणी करिता पाणी मीटर व नळ जोडणी करिता जिल्हा नियोजन समितीकडून दिनांक 11/02/2014 च्या प्रशासकीय मंजुरी आदेशान्वये योजना खर्च 85.25 लाख इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी मिळाली आहे. प्रशासकीय मंजुरी आदेश प्रमाणे खर्च रक्कमेच्या 50 टक्के रक्कम शासनाने व 50 टक्के रक्कम ग्रामपंचायतीने करणेची आहे. कामावर वर नमूद केले प्रमाणे रक्कम रूपये 82,00,700/- इतका खर्च पडला असून शासन हिस्सा व ग्रामपंचायत हिस्सा रक्कम प्रत्येकी रक्कम रूपये 41,00,700/- इतका खर्च करणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हा नियोजन समितीकडून शासन हिस्याची रक्कम रूपये 42,00,000/- प्राप्त झाली आहे. सबब 42,00,000 - 41,00,700 = रुपये 99,300/- इतकी रक्कम शासनास परत करणे आवश्यक आहे.

2) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार भागीदार संस्था असल्यास 2 टक्के प्रमाणे आयकर कपात करणे आवश्यक असताना मे.नाना कंन्स्ट्रक्शन सांगरूळ (भागीदारी संस्था) यांना अदा रक्कम रूपये 82,00,700/- रक्कमेतून दोन टक्के आयकर टीडीएस कपात करणे आवश्यक असताना एक टक्के आयकर रक्कम कपात केली आहे. सबब आयकर टीडी.एस एक टक्का कमी कपात रक्कम रूपये 82,007/- संबधीत मक्तेदारकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) वास्तविक वितरण नलिका ते कनेक्शन जोडणीधारकाचे घर यातील जोडणीचे अंतर कमी जादा असल्याने प्रत्येक नळ कनेक्शन करिता करावी लागणारी खुदाई व जोडणी करिता वापरलेले साहित्य याची कनेक्शननिहाय

मोजमापे मोजमाप नोंदवहीत नमूद करून त्याच्या मुल्यांकना आधारे मक्तेदारास रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. याकरिता दरपृथ्थकरण करून प्रति युनिट रक्कम रूपये 5,609/- (DSR 2013-14) विचारात घेण्यात आली आहे.

4) कामाचे अंदाजपत्रक प्रमाणे 1,520 वाटर मीटर पुरवठा करणे व बसवण्याची तरतूद केली असताना प्रत्यक्षात 1,600 वाटर मीटर बसवल्याच्या नोंदी मोजमाप नोंदवहीत नमूद केल्या आहेत. सबब 80 इतके जादा मीटर बसवले आहेत. याकरिता वाढीव कनेक्शनधारकांचा तपशील ग्रामपंचायतीने उपलब्ध केलेला नाही. यावर 80 x 5,609 = 4,48,720/- इतका खर्च केलेला आहे. सबब निविदा अट क्रमांक 38 प्रमाणे सदर खर्च रूपये 5,000/- पेक्षा अधिक असल्याने त्यास सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली नाही.

5) कामाचे अंदाजपत्रक बाब क्रमांक 11 प्रमाणे कामावर 1520 इतके EEC मार्क वाटर मीटर पुरवठा करणेची तरतूद केली असून त्याचा प्रति नग रुपये 1,900/- अशी चालू बाजारभाव प्रमाणे किंमत विचारात घेतली आहे. परंतु सदर वाटर मीटरची चालू बाजारातील रक्कम रूपये 1,900/- किंमत असल्याबाबत कंपनी अथवा डीलरकडील दर घेऊन कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे प्रति नग वाटर मीटरची घेतलेली किंमत योग्य असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

6) प्रशासकीय मंजुरी आदेश प्रमाणे एकूण खर्चाच्या 50 टक्के रक्कम ग्रामपंचायतीने खर्च करणेची आहे. याकरिता 42 लाख इतका खर्च ग्रामपंचायतीला करावा लागणार असल्याने इतकी रक्कम खर्च करण्यास ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबत ग्रामपंचायत ग्रामनिधीचा बँक शिल्लक उतारा जोडलेला नाही अथवा याबाबतची वित्तीय तपसणी करण्यात आलेली नाही.

7) प्रत्येक नळ कनेक्शनधारकास वाटर मीटर दिल्याची नोंद वाटर मीटर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही उपलब्ध झाली नाही.

**3.461 मौ तुरंबे, तालुका राधानगरी येथे सिध्दी विनायक मंदीर नळ पाणी पुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,65,123/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकिय बाब क्र.5 Providing & fixing in position tor steel bar reinforcement of various diameters for RCC piles etc साठी Rate Anaylasis करताना MJP DSR 2013-14 प्रमाणे दर घेवून त्यावर Helly Area चा (डोंगरी भाग) 10 टक्के व लेबर सेस 1 टक्के विमा 1 टक्के या प्रमाणे एकूण 12 टक्के दर वाढीव घेण्यात आलेला आहे. परुंतू MJP DSR 2013-14 मधील MJP च्या Schedul of rates (D S R ) for the year 2013-14 चे General Notes च्या मुद्दा क्र.8 प्रमाणे Hilly Area ची टक्केवारी अनुज्ञेय असलेल्या बाबी दिलेल्या आहेत आणि मुद्दा क्र.9 प्रामणे Supplied Item साठी उदा.Steel pipes Valves Specials etc complete साठी अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे उपरोक्त कामाचा बाब क्र.5 साठी 10 टक्के Hilly Area चे दर जादा आकारणी केलेली आहे ती अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे अतिप्रदान रक्कम रूपये 14,102/- संबधीताकडून वसुलात आणून शासन खाती भरणा करणेत यावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 153 (1) व बी-1 टेंडर फॉर्म मधील कलम 38 (1) तरतुदी नुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यतचे जादा काम करण्याची तरतुद असताना जादा काम करणेत आले आहे.

वरील कामाच्या आवश्यकते बाबत अंदाजपत्रकात मोघम तरतूद केल्याचे दिसून येते लेखा संहिता नियम 114,118,120 व 152 मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही जादा परिमाणासाठी करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे जादा परिमाणावर झालेला खर्च रक्कम रुपये 1,28,316/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

**3.462 एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम कामे निवडीबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषदअंतर्गत एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सन 2015-16 मध्ये विकास कामे केलेली आहेत. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रमांची अंमलबजावनी मध्ये सदर कामांचा समावेश होत नसताना कामे करून त्यावर रक्कम रूपये 8,12,128/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

कृषी विभागाचे वसुंधरा पाणलोट विकास पुणे-1 चे आयुक्त कृषी तथा मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक एपाविय/एपाव्यका/कृषी/इपीए/754/2012, दिनांक 01/06/2012 प्रमाणे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रमांची अंमलबजावणी दरपत्रकाबाबतचे पत्र देण्यात आले आहे. त्यानुसार वरील प्रमाणे करण्यात आलेली विकास कामे निकषामध्ये बसू शकत नाहीत. तसेच एकात्मिक पाटलोट विकास व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम (EPA) राबविणे बाबातच्या सुचना व या संदर्भीत केलेला शासनाचे ज्ञापन पत्र क्रमांक ए.पा.व्य.2015 प्र.क्र.03/जल-8/ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई-32 दिनांक 14/01/2015 पर्यंत या निधितून गावातील पिण्याच्या पाण्यचे स्त्रोत दुरुस्ती व बळकटीकरणे कामे " घेणे बाबत सुचित करण्यात आलेला आहे. त्यामुळे वरील प्रमाणे नपापु योजना व पाणी वितरण व्यवस्थेसाठी लागणाऱ्या बाबीवर झालेला खर्च नियमबाहय ठरतो.

तसेच जलयुक्त शिवार कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणा-या कामासाठी महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक जलसं-2014/प्र.क्र.-203/जल-7, दिनां 05/12/2014 नुसार देखील नपापु दुरुस्ती व विस्तारीत कामे घेता येणार नाही. असे असताना वरील कामांवर वापरणेत आलेली तरतुद / खर्च हा नियमबाहय ठरतो.

**3.463 देखभाल दुरुस्ती अंतर्गत मौज वाकी (शि) येथील वितरण व्यवस्था दुरुस्त करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,89,874/- खर्च करण्यात आला आहे. कागदपत्रे मोजमाप नोंदवहया इत्यादी तपासणी करुन खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.52/पा.पु-07, दिनांक 17/10/2014 मधील परिशिष्ट-1 मध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनाच्या देखभाल दुरुस्ती अंतर्गत करावयाच्या कामाच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनामध्ये नवीन वितरण व्यवस्था करणे यांचा समावेश नाही.

2) अंदाजपत्रकानुसार सदर कामावर 8 STAGE चा पंप बसवणे आवश्यक होते. तथापि, देयकासोबत जोडलेल्या फोटोनुसार पुरवठादाराने सदर कामासाठी 3 STSGE चा पंप पुरवला आहे. तसेच ठेकेदारास अंदाजपत्रकीय दराने 8 STAGE च्या पंपाचे देयक अदा केले आहे. तरी दोन्ही पंपाच्या दरातील तफावत (रूपये 41,946 - रूपये 40,898 = रूपये 1,048/-) अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

3) सदर कामावरील विदयुत पंप हा नेहमी नादुरुस्त होत असल्याने बदलण्यात आला आहे. त्यामुळे जुना विदयुत पंप विक्री करुन आलेली रक्कम जिल्हा परिषद सेस मध्ये जमा करणे आवश्यक आहे.

4) कामावर बाब क्रमांक 5 व 6 नुसार 2 Sluice Valve बसवल्याचे नमूद केले आहे. तथापि, कामाच्या वर Sluice Valve ची जागा दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबीवर केलेला खर्च रूपये 12,784/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**3.464 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत मौजे रोपळे (क), तालुका माढा नळ पाणी पुरवठा योजना.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 88,59,607/- खर्च करण्यात आला आहे. कागदपत्रे मोजमाप नोंदवहया इत्यादी तपासणी करुन खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही 1098/प्र.क्र.2889/शासन इ.मा., दिनांक 19/08/1998 अन्वये व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक विनि 2300/सह विमा/साबावी/संकीर्ण, दिनांक 24/04/2001 नुसार कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेच्या 1 टक्के विमा रक्कम वसुल करुन संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झालेली नाही. तरी सदर कामाची निविदा रक्कम रुपये 1,26,32,675/- चे 1 टक्के विमा रक्कम रुपये 1,26,326/- वसूल करुन विमा संचालनालयास भरणा केल्याची पूर्तता आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक BCA/12007/प्रक्र788/ कामगार-7, दिनांक 21/04/2008 अन्वये दिनांक 01/01/2008 पासून पूर्वलक्षी प्रभावाने मक्तेदार यांचेकडून एकूण मुल्याच्या 1 टक्के उपकर वसूल करुन बांधकाम कामगार कल्याण यांच्याकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त नमूद कामावरील एकूण खर्च रक्कम रूपये 88,59,607/- मधून 1 टक्के इतकी रक्कम रूपये 88,596/- वसूल करुन भरणा करणे आवश्यक आहे.

3) कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 1,38,52,340/- इतकी आहे. मुंबई स्टॅम्प ॲक्ट 1958 सेक्शन 1 (63) नुसार रुपये 100/- प्रमाणे रूपये 12,900/- चे स्टॅम्प घेणे आवश्यक आहे. तरी रूपये 12,900/- वसुलात आणावे.

4) ग्रामसभेचा प्रशासकीय मंजूरी ठराव व दिनांक गाव कृती आराखड्याची प्रत तसेच भुजल अधिनियमाची अंमलबजावणी करणेचा ठराव नस्ती सोबत नाही.

5) सदर कामाचे अंदाजपत्रक पाहता कामावर कामाचे ठिकाणी बोर्ड लावण्याची तरतूद करणे आवश्यक असताना तशी तरतूद केलेली नाही.

6) सदर कामाची मुदत 18 महिने इतकी असल्याने सदरचे काम दिनांक 12/06/2013 ते दिनांक 12/12/2014 पर्यत पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु, सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण झाले नाही. याबाबत मुदतवाढ प्रस्तावास दिनांक 04/01/2017 अन्वये मुदतवाढ दिलेली आहे. तसेच ठेकेदारास दंड करण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 168 नुसार कामाचे मोजमापे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी कामाची 5 टक्के तपासणी करुन मोजमाप नोंदवही मध्ये दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.465 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत केम, तालुका करमाळा येथील नळ पाणीपुरवठा योजना.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,19,06,604/- खर्च करण्यात आला आहे. कागदपत्रे मोजमाप नोंदवह्या इत्यादी तपासणी करुन खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही 1098/प्र.क्र.2889/शासन इ.मा., दिनांक 19/08/1998 अन्वये व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक विनि 2300/सह विमा/साबावी/संकीर्ण, दिनांक 24/04/2001 नुसार कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेच्या 1 टक्के विमा रक्कम रूपये 4,65,754/- वसुल करुन संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2) ग्रामसभेचा प्रशासकीय मंजूरी ठराव व दिनांक, गाव कृती आराखडयाची प्रत तसेच भुजल अधिनियमाची अंमलबजावणी करणेचा ठराव नस्तीसोबत नाही.

3) सदर कामाचे अंदाजपत्रक पाहता कामावर कामाचे ठिकाणी बोर्ड लावण्याची तरतूद करणे आवश्यक असताना तशी तरतूद केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 168 नुसार कामाचे मोजमापे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी कामाची 5 टक्के तपासणी करुन मोजमाप नोंदवहीमध्ये दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.466 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे लोटेवाडी, तालुका सांगोला येथील नळपाणी पुरवठा योजना.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या नस्तीस कामाचे रेखाचित्रांच्या प्रती जोडलेल्या आहे. परंतु, त्यात परस्पर विसंगती आहेत. तरी मंजुर रेखाचित्र उपलब्ध करुन काम संकल्पीत छायाचित्राप्रमाणे झाल्याचे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

3) कामाची निविदा रक्कम रूपये 41,52,444/- इतकी आहे. मुंबई स्टँप ॲक्ट 1958 सेक्शन शेडयुल 1(63) नुसार रूपये 3,600/- चे स्टँप पेपर ठेकेदाराकडून घेतलेबाबत करारनामा नस्तीस उपलब्ध झाला नाही.

4) सदर कामाचे 5 वे धावते देयक नस्तीस जोडलेले आहे. परंतु, सदर देयकातून केलेल्या कपाती, मंजूर एकूण रक्कम, निव्वळ रक्कम, इत्यादीबाबत देयकावर प्रदानार्थ आदेश नमूद नसल्याने सदर देयकाद्वारे अदा रक्कम समजून येत नाही. त्यामुळे उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग सांगोला यांनी फॉर्म क्रमांक 65 अन्वये दिलेल्या काम पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार मुल्यांकित केलेली रक्कम रूपये 46,00,918/- (5 टक्के + 2 टक्के) रूपये 48,37,574/- योग्य असलेबाबत सदर देयकातील अदाईचा तपशील सादर झाला नाही. त्यामुळे मुल्यांकनानुसार गुंतलेली रक्कम घेतली आहे.

5) सदर कामाचे रक्कम रूपये 46,00,918/- नुसार 1 टक्का उपकर रूपये 46,009/- वसूल करणे आवश्यक असताना रूपये 3,771/- इतका उपकर वसूल केलेला आहे. तरी कमी वसूल केलेला उपकर रक्कम रूपये 42,238/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावा.

6) नस्तीतील पृष्ठ क्रमांक 749 वरील सामाजिक लेखापरीक्षण समितीच्या अहवालानूसार सदर कामासाठी पहिला, दुसरा, तिसरा हप्ता 13,33,432 X 3 = रूपये 40,00,296/- + लोकवर्गणी रूपये 2,50,000/- = रूपये 42,50,296/- इतकी जमा असून खर्च रक्कम रूपये 45,53,329/- इतका दर्शविला आहे. तरी जमा रक्कमे व्यतिरिक्त खर्च झालेल्या रक्कम रूपये 3,03,033/- बाबतचा तपशिल लेखापरीक्षणास सादर झाला नाही.

7) सदर कामाची मोजमाप पुस्तके 2253, 1870 व 6153 लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने केलेल्या कामाची परिमाणे, दर, दर्जा, तसेच कमी जादा खर्च योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) सदर कामाचे अंदाजपत्रकात sump व pumping machinery साठी तरतूद दर्शविली आहे. परंतु, प्रत्यक्षात सदर काम केलेले नाही. तरी न करावयाच्या कामासाठी नाहक तरतूद दर्शवून अंदाजपत्रक वाढीव रक्कमेचे करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

9) सदर कामातील rising main व distribution system साठी pvc pipe पुरवठा करुन वापर केलेला आहे. दरात केलेल्या फरकानुसार व जादा पुरवठ्यापोटी रक्कम रूपये 24,991.85/- वसूल करावी.

**3.467 नियमबाहय रोजंदरी कर्मचारी यांना नियममित करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,94,402/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक काव्य**.**आ/4305/प्र.क्र.745/आस्था 10, दिनांक 06/01/2007 नुसार जिल्हा परीषदेतील कोणत्याही विभागातील रोजंदारी **/** कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मान्यता देण्यास विभागीय आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले असल्याने अशी प्रकरणे विभागीय आयुक्त स्तरावरुन निकाली काढणे आवश्यक आहे असे स्पष्ट आदेश असतांनाही जिल्हा परीषदेने अशा प्रकारची कोणतीही मंजुरी न घेतल्याने सदर नियुक्त्या हया नियमबाहय ठरतात.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक काव्य. आ/2007/प्र.क्र.67/आस्था 10, दिनांक 20/03/2007 नुसार रोजंदारी कर्मचारी यांना नियमित करण्याचे आधिकार हे प्रादेशीक प्रमुख म्हणजे विभागीय आयूक्त यांना असतांना त्यांची पुर्व परवानगी न घेता नियमबाहयपणे उपअभियंता यांनी टिपणी परस्पर सादर करुन

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिशाभुल करुन रोंजदारी कर्मचारी यांना नियमित करुन घेवून जिल्हा परीषदेचे मोठया प्रमाणात नुकसान केल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक आहे**.**

3) महाराष्ट्र शासन**,** ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक न्यायाप्र**.**1001/प्र.क्र.202/आस्था 11, दिनांक 22/03/2002 नुसार कोणत्याही न्यायालयीन प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेच्या वकीलांकडे आवश्यक शपथपत्र (मुद्देसुद व सविस्तर**)** तातडीने दाखल करणे जरुरीचे आहे**.** ज्या प्रकरणी शासनाच्या कोणत्याही धोरणास **/** निर्णयास आव्हानीत केले नसेल अशा जिल्हा परीषदेने संबधीत कर्मचाऱ्याच्या सेवा विषयक बाबीच्या संदर्भात प्रचलीत नियम व आदेश इत्यादि उल्लेखासह सुस्पष्टपणे बाजु न्यायालयापुढे मांडावी असे आदेश असतांना जिल्हा परीषदेने अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिसुन आल्याने जिल्हा परीषदेवर नाहक भुर्दंड पडला असल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

## 3.468 नविन विंधन विहीर / कुपनलीका खोदकाम करुन त्यावर हातपंप बसविणेयाठी उशिराने काम करुन सुध्दा दंडाची कपात न करणे बाबत

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,52,956/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपुर क्षेत्र नागपुर यांचे पत्र क्रमांक स्था.स्व.संस्था/MVAT/TDS कपात/ब-150, दिनांक 31/01/2014 नुसार देयकातुन 5 टक्के विक्रीकर (VAT) वसुल करणे आवश्यक असतांना मे अमन बोअर वेल अकोला यांचे नस्तीमध्ये विक्रीकर पंजीकरण प्रमाणपत्र नसल्याने त्याचे देयकातुन फक्त 2 टक्के विक्रीकर कपात केल्याने 3 टक्के विक्रीकराचे रुपये 10,588/- इतक्या रक्कमेचे शासन महसुलाचे नुकसान झाल्याने याची संबधीताकडून वसुली करुन शासन खाती जमा दर्शवावी.

2) मौजे दाभिया, तालुका चिखलदरा येथील बोअर केल्याबाबत ग्रामसेवक / सरपंच यांचे प्रमाणपत्रावर स्वाक्षरी नसतांनाही प्रदान कश्याचे आधारे करण्यात आले.

3) मौजे मारी झडप मोजमाप तपशिल नोंदवही वरुन अयशस्वी बोअर हा जुने हातपंपाजवळ गावठाण परीसरामध्ये घेण्यात आला, परंतु सरपंच दाखल्यानुसार बोअर हा रामजी बेठेकर यांचे शेताजवळ घेण्यात आला अशी विसंगती बाबत खुलासा करावा.

4) मौजे चिंचखेडा तालुका चिखलदरा मोजमाप तपशिल नोंदवही वरुन बोअर हा पाणी पुरवठा विहीरी जवळ घेण्यात आला, परंतु सरपंच दाखल्यानुसार बोअर हा गोपाल कील्लेदार यांचे शेताजवळ घेण्यात आला अशी विसंगती बाबत खुलासा करावा.

5) कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. 16 व कामाचे आदेशातील अट क्र. 7 नुसार 10 दिवसामध्ये बोअरवर हातपंप बसविणे आवश्यक राहील अन्यथा प्रती दिन रुपये 100/- प्रमाणे विलंब आकार आकारण्यात येईल अशी अट असतांनाही 6 बोअर वर 10 दिवसामध्ये हातपंप न बसविता उशिराने हातपंप बसविला असतांनाही विलंब आकाराची आकारणी करण्यात आली नाही. विंलब आकाराची रक्कम रुपये 34,100/- ची वसुली करुन जिल्हा परिषद निधी मध्ये जमा करावी.

## 3.469 मौजे राणीगाव व टेभुरसोडा, तालुका धारणी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळांना पाणी पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,75,125/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मौजे राणीगाव येथील पाणी पुरवठा योजना या कामाची ई निविदा प्रसिदधीबाबत दै. लोकमत समाचार, दै देशोन्नती, दै इनसाईड, साप्ता पांचजन्य मध्ये दिनांक 23/11/2012 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी पात्र दोन निविदापैकी नौशाद अहमद यांना काम प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर नस्तीमधे नौशाद अहमद यांचे व्यतिरीक्त इतर निविदाधारकांचे लिफाफे व इतर

आवश्यक अभिलेखे आढळून आले नाहीत. त्यामुळे प्राप्त सर्व निविदा व सोबतचे अभिलेख्यांची पडताळणी करता आली नाही.

2) नस्तीमधे नमूद वर्तमान पत्र आढळून आले नाही. त्यामुळे जाहीरातबाबत पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1098/प्र.क्र. 245/पापु-07, दिनांक 11/01/1999 चे परिशिष्ट 17 नुसार कार्यकारी अभीयंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा स्तरावर जिल्हयातील पुर्ण झालेल्या स्थानिक नळ योजनांसाठी पुर्व इतिहास नोंदवहया ठेवावयाचा नमुना भाग (I)(II) मधे विहीत नमुना प्रसिदध करुन त्याला अनुसरुन नोंद वहया ठेवणे बंधनकारक असतांना जिल्हा परिषदेने सदरच्या नोंदवहया ठेवल्या नाहीत. त्यामुळे सदर आदिवासी आश्रम शाळेकरीता सुरवातीला पाणी पुरवठा योजना कधी मंजूर झाली होती. त्याची अंदाजीत किंमत किती, योजना कोणत्या वर्षाची होती, अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदी आवश्यकतेनुसार व शाळेच्या मागणीप्रमाणे आहे काय याबाबत कोणतीही खात्री विभागाने नोंदवहया ठेवल्या नसल्यामुळे करता आली नाही.

4) वरील काम हे विहीत मुदतीत पुर्ण करण्यात आलेले नाही. तरी कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही. खुलासा करावा. नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करुन रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य लेखाशिर्षात जमा करुन दर्शवावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखा संहीता 1968 चे नियम 166 नुसार मोजमाप पुस्तीकेवर कामाची मोजणी परिमाणे नोंदवितांना दिनांक नमूद करणे व मोजमापपुस्तीकेवर मोजमाप करणा-या अधीका-याने दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावरील दिनांकवरील काम पुर्णत्वाचे दिनांकाबाबत पडताळणी करता आली नाही.

**3.470 पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती विरगव्हाण (भिवापूर) कामामधील गंभीर अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर कामाची नस्तीची मोजमाप पुस्तिकेसोबत पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे आदेश कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक 2309, दिनांक 29/07/2015 नुसार देण्यात आले, परंतु कंत्राटदारासोबत केलेला करारनाम्याचे मुंद्राक पेपर (स्टॅम्प) खरेदी ही दिनांक 01/08/2015 रोजीची असल्याने करारनामा केलेला नसतांनाही नियमबाहयपणे कामाचे आदेश देवून कंत्राटदारासोबत संगणमत करुन करारनामा केल्याचा आभास निर्माण केला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 व 120 नुसार ज्या बाबीची अंदाजपत्रकामध्ये तरतुद नाही, अशी बाब करण्यापुर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेवूनच त्या बाबीचे काम करण्यात यावे. परंतु, provision for m.s. staircase for pump house या बाबीची ब 1 शेडयुलमध्ये तरतुद नसतांनाही कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग यांची पुर्व परवानगी न घेता कामाचे मोजमाप 0.1243 MT दर रूपये 57,877/- प्रमाणे रूपये 7,194/- इतक्या रक्कमेचे मुल्यांक्न केल्याने सदरचा खर्च पुर्व परवानगीशिवाय करण्यात आला असल्याने रूपये 7,194/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

3) अंकगणितीय चुकीने जादा प्रदान झाले आहे. खोदकाम या बाबीचे मोजमाप 33.91 cum दर रूपये 684.80/- प्रमाणे गुणाकार रूपये 23,221/- इतका येत असतांना सदर बाबीचे मुल्यांकन रूपये 23,501/- इतके घेतल्याने रूपये 280/- चे जादा प्रदान झाल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

4) वरील कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रूपये 5,10,250/- असुन हे काम कंत्राटदाराने 2.00 टक्के कमी दराने निविदा भरून केवळ रूपये 1,13,460/- इतक्या कमी किंमतीमध्ये कसे केले? त्यामुळे कामाचे दर्जाबाबत लेखा परीक्षणास खात्री करता येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 87 नुसार कामाची तांत्रिक पडताळणी अहवाल देयकासोबत नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जा बाबत लेखा परीक्षणाची खात्री करता आली नाही.

6) कामाचे मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 ब नुसार कामाची उप अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन 100 टक्के अंतीम कामाची नोंद करणे व नियम 168 क नुसार कार्यकारी अभियंत्यानी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना तश्या पाहणी / तपासणी केल्याचे दिसुन आले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 (2) नुसार देयकातुन 3 टक्के सुरक्षा ठेव कपात केली नाही.

8) कामाच्या अंदाजीत रक्क्मेच्या 5 टक्के लोकवर्गणी जमा केलेली आहे. लोकवर्गणी जमा केल्याची यादी नस्तीत आढळुन आली नाही व वसुलीच्या नमुना नंबर 7 च्या पावत्या आढळत नाही. त्यामुळे लोकांकडुन वर्गणी जमा केल्याची खात्री पटत नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 अन्वये संबधीत अभियंत्यानी कामाचे मोजमाप घेते वेळी मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत मोजमापे घेण्याबाबत निर्देश असतांना तशी मोजमापे घेतल्याचे दिसुन आले नाही.

10) सदर योजना ग्रामपंचायतीचे ताब्यात असतांना दुरूस्तीची आवश्यकतेबाबत नस्तीमध्ये कोणतेही अभिलेखे नसल्याने दुरुस्तीचे आवश्यकते बाबत खुलासा करावा. तसेच ग्रामपंचायतीकडून काम योग्य झाले किंवा कसे याबाबत अहवाल सुध्दा घेतले नाहीत. पाणी पुरवठा सुरळीत सुरू केल्याबाबत चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

**3.471 नविन विंधन विहीर / कुपनलीका खोदकामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 41 व 42) -** प्रमाणक क्रमांक 271 दिनांक 30/03/2016 रूपये 5,91,993/- व रुपये 5,57,619/- असे एकूण रक्कम रूपये 11,49,612/- चे प्रदान सनी बोअरवेल, धामणगाव रेल्वे व अमन रॉकड्रील अकोला, यांना करण्यात आले. सदर देयक व अनुषंगिक अभिलेख्याची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामणापुर मोजमाप तपशिल नोंदवहीवरुन बोअर हा बंडुभाउ कीनाने यांचे घराजवळ घेण्यात आला परंतु, सरपंच दाखल्यानुसार बोअर हा दामजी कातलाम यांचे घराजवळ घेण्यात आला अशी विसंगती बाबत खुलासा करावा. तसेच दाखल्यामध्ये सरपंच यांचे स्वाक्षरीत तफावत आढळून आली त्यामुळे दाखला हा संशयास्पद वाटतो या बाबत चौकशी होणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 41)

2) मौजे तरोडा तालुका धामणगाव दाखला यामध्ये सरपंच यांचे स्वाक्षरीत तफावत आढळून आली. त्यामुळे दाखला हा संशयास्पद वाटतो याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 41)

3) सर्व बोअर चे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नस्ती मध्ये आढळून आले नसल्याने बोअर चे काम केले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही. (परिच्छेद क्रमांक 41)

4) कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.16 व कामाचे आदेशातील अट क्र.7 नुसार 10 दिवसामध्ये बोअरवर हातपंप बसविणे आवश्यक राहीत अन्यथा प्रती दिन रुपये 100/- प्रमाणे विलंब आकार आकारण्यात येईल अशी अट असतांनाही हातपंप बसविला असतांनाही विलंब आकाराची आकारणी करण्यात आली नाही. एकूण 9 गावांमधील हातपंप उशिराने बसविल्याने झालेल्या विलंबाबत एकूण दंडात्मक रक्कम रूपये 1,15,800/- वसूल करणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 41 व 42)

5) कालापाणी, तालुका चिखलदरा मोजमाप तपशिल नोंदवहीवरुन बोअर हा बस स्टॉप परिसरात घेण्यात आला. परंतु, सरपंच दाखल्यानुसार बोअर हा गावठाण परिसर घेण्यात आला विसंगती बाबत खुलासा करावा. (परिच्छेद क्रमांक 42)

**3.472 ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकामधील कुटूंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तीक शौचालय सुविधा अनुदानातील खर्चात झालेल्या अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 52) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,41,77,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.यो.1111/ प्र.क्र.156/पा.पु.07, दिनांक 18/11/2011 अन्वये परिच्छेद क्रमांक 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्यास शासनाने मान्यता देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिकुटूंब खाजगी नळ जोडणी रूपये 4,000/- तर वैयक्तीक शौचालय प्रतिकुटूंब रूपये 11,000/- याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. 5 टक्के लोकसहभाग अनुज्ञेय राहील 3 टक्के रोख व 2 टक्के साधन सामुग्री किंवा श्रमदानाव्दारे अदा करता येइल. लोकसहभागाची 50 टक्के रक्कमा जमा झाल्यानंतर 50 टक्के अनूदान ग्रामपंचायतीस वितरीत करता येइल परंतू त्याला अनुसरून लोकसहभागाच्या 50 टक्के रक्कमा जमा न होता व बॅकेत रक्कमा जमा झाल्या बाबत कोणतेही अनुज्ञेय दस्तऐवज उपलब्ध झाले नाही.

2) शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाजगी नळ जोडणी देण्यासाठी जलमापक यंत्र बसविणे सक्तीचे राहील. करिता लाभार्थीनिहाय जलमापक यंत्र ग्रामपंचायतने बसवून घ्यावयाचे असतांनी तश्या प्रकारची कार्यवाही ग्रामपंचायतने केली नाही.

3) शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 7 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पूरवठा व स्वच्छता योजना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तीक शौचालय यांच्या उपलब्धतेची पात्र लाभार्थी निवड करण्यापुर्वी लाभार्थी अनुसूचित जातीचा असल्याबाबत खात्री करावयाची असल्याणे जातीचा दाखला आवश्यक आहे ग्रामपंचातने तशा प्रकारे जातीचे दाखले प्रथमता संकलीत करून प्रस्तावासोबत एकाही पंचायत समितीने जोडले नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या अभिलेख्याअभावी तपासणी  करता आली नाही.

4) शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पूरवठा व स्वच्छता योजना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तीक शौचालय यांच्या उपलब्धते सबंधी अंदाजपत्रक व आराखडे यांना तांत्रिक मंजूरी कार्यकारी अभिंयता ग्रामीण पाणी पूरवठा विभाग यांनी देण्यासंबधी शासनाचे आदेश आहेत. त्यानूसार तांत्रिक मंजूरी देवून कामाचे मुल्यांकने मोजमापे ग्रामीण पाणी पूरवठा विभागाच्या तांत्रिक विभागाने नोदविले नाहीत.

5) शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 12 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पूरवठा व स्वच्छता योजना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तीक शौचालय यांच्या उपलब्धते सबंधी 50 टक्के रक्कम ग्रामपंचायतचे खात्यावर जमा झाल्यानंतर कामे पूर्ण झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामपंचायतीला दयावयाचे आहे. त्यानंतर उर्वरीत 50 टक्के रक्कम अनुज्ञेय आहे. असे असतांनी जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीस 100 टक्के रक्कमा अग्रिम स्वरूपात अदा केल्याने नियमांचा भंग झाला आहे.

6) शासन अनुदानित रक्कमा खर्च दाखविल्यानंतर योग्य फलश्रृती झाल्याबाबत जिल्हा परिषेदेकडे कोणतेही वैध दस्तऐवज उपलब्ध नाहीत.

**3.473 राष्टीय ग्रामीण पेयजल योजनेवर केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत रक्कम रूपये 79,56,24,000/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हयात एन आर डि डब्ल्यु पी योजनें अंतर्गत 196 गावांना पाणिपुरवठा योजनासाठी मार्च 2016 अखेर रुपये 7956.24 लाख इतका निधी झालेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर अनुदान ज्या कामासाठी वाटप केले त्याच कामासाठी खर्च झाल्याबाबत खात्री पटत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापोधो-1108/प्र.क्र./32/पापु.07, दिनांक 18/03/2008 नुसार भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने गावातील जलस्त्रोताची जागा निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु, तसा अहवाल उपलब्ध न झाल्यामुळे जलस्त्रोताची जागा निश्चित न करताच योजना कशा राबाविण्यात आल्या? याबाबत खुलासा करावा.

3) पुर्ण झालेल्या योजना समितीने ग्रामपंचायतीला हस्तांतरीत केल्या असल्याबाबतचा खुलासा करावा.

4) जिल्हा परीषदेने फक्त अनुदान योजना राबाविणा-या समितीला अनुदान वाटप केले. परंतु, योजनेबाबत जिल्हा परीषदेने तांत्रिक मार्गदर्शन केल्याबाबत अभिलेखे नाही. त्यामुळे तांत्रिक मार्गदर्शनाशिवाय कामे कशी केली जातात? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापोधो-1111/ प्र.क्र.134/ पापु.07, दिनांक 20/02/2015 नुसार सनदी लेखापाल कडून लेखापरीक्षण करणे आवश्यक होते. परंतु, तसा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे योजनेवर झालेला खर्च नियमानुसार झाला किंवा कसे? याबाबत खात्री पटत नाही.

6) पंचायत समिती, बाळापूर मधील कान्हेरी गवळी, पंचायत समिती, पातुर मधील चतारी, पिंपळखुटा, सस्ती, हिंगणा, दिग्रस या पाच गावातील योजनेवर अफरातफर करण्यात आली असुन सदर बाब कोर्टात असल्याचे नमुद आहे. परंतु, अफरातफर करण्यास जबाबदार असलेल्या कर्मचा-यावर या कारणास्तव विभागीय चौकशी सुरु आहे किंवा कसे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7) ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापोधो-1111/प्र.क्र./134/पापु.07, दिनांक 20/02/2015 नुसार राष्टीय ग्रामीण पेयजल कार्यकमावर झालेल्या खर्चाची खात्री करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता ग्रामीणपुरवठा विभाग यांची असून झालेला खर्च त्याच योजनेकरीता झाल्याची खात्री पटत नाही. याबाबत खात्री पटवावी.

अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 20/06/2017 नुसार खुलासा मागितला होता. खुलासा व खर्चाची अभिलेखे उपलब्ध करून दिली नाही.

उपरोक्त संपुर्ण योजनेवर झालेल्या खर्चाचे तपशीलवार तपासणी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर खर्च नियमानुसार झाल्याबाबत खात्री पटणे शक्य होईल

**3.474 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत 18 कामावर रक्कम रूपये 2,61,90,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना काम पुर्ण झाल्याबाबत रक्कमा अदा करण्यात आल्या आहेत. मात्र त्याबाबत संबंधीतांकडून सदर रक्कमेच्या अनुषंगाने उपयोगीता प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सदर रक्कमेचा योग्य विनीयोग झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2)उपरोक्त प्रमाणे नमूद केलेले कामात योजनेची अंमलबजावणी करताना 50 टक्के राज्य शासन तर 50 टक्के केद्रशासन अशा प्रकारे रककम खर्च करावयाचा होते. परंतु, सदरचे काम चार ते पांच वर्षापासून चालू असल्यामूळे नमूद केल्याप्रमाणे रककम खर्च केल्याची खात्री अभिलेख्याअभावी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148 (1) कामाच्या अटी व शर्ती बाबत परिपुर्ण करारनामा केलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1001/प्र.क्रा.40/जल-03, दिनाक 19/10/2001 अन्वये संबधित काम करणारी संस्था /मक्तेदारावर 01 वर्ष देखभालीची हमी देण्यात यावी. तसेच 10 टक्के निधी 01 वर्षासाठी देण्यात येवू नये. तो राखून ठेवावा, असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, अधिसुचना क्रमांक गौणखनीज /10/1009/प्र.क्र.309/ख (1) दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 200/- प्रति ब्रास प्रमाणे रक्कम कामावर वापरण्यात येणा-या गिटटी, रेती, मुरुम यावर आकारणी करुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पंरा-8, दिनांक 15/11/2011 ला अनुसरून पाणी पूरवठा योजनेचे काम योग्य दर्जाचे उच्चप्रतीचे केल्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयकडून लोखंड, सिमेंट याची तपासणी केल्याबाबत तसेच पाईप लाईनचे काम झाल्यानंतर ते काम गुणवत्तापुर्ण झाले आहे. याबाबत वापरलेल्या पाईपसंबधी क्षेत्रिय जलदाब चाचणीचे अहवाल लेखापरीक्षेत उपलब्ध् झाले नाहीत तथा सक्षम प्राधिकरणाने सदरची चाचणी किती तारखेला कोणाच्या समक्ष घेतली? त्यावेळेस कोणते जबाबदार अधिकारी पदाधिकारी हजर होते? याबाबत कोणतेही दस्तऐवज नस्तीत आढळत नाहीत. नुतनीकरण योजनेअंर्तगत झालेले बांधकामे योग्य दर्जाची व आवश्यक त्या गुणवत्तेची झाल्याची उपलब्ध केलेले लेखेवरून खात्री होत नाही. यासंबधी शासकीय अनुदानीत रक्कमा निष्फळ खर्ची पडल्या नसल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रमांक ग्रापापु-1098245प्रक्र //पापु-07 दिनांक 11/01/1999 नुसार कार्यकारी अभियंता यांनी ग्रामीण पाणीपुरवठा चे परिशिष्ट नुसार जिल्हा स्तरावर जिल्हयातील पुर्ण झालेल्या स्थानिक नळ योजनांसाठी पुर्व इतिहास नोंदवहया ठेवावयाचा नमुना (भाग i ii) मध्ये विहित नमुना प्रसिध्द करुन त्याला अनुसरुन सुरवातीला पाणी पुरवठा योजना कधी मंजूर झाली होती? त्याची अंदाजीत किंमत किती ? योजना कोणत्या वर्षाची होती,? अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदी आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे आहे काय?ही खात्री विभागाने नोंदवहया ठेवल्या नसल्यामुळेयाबाबत कोणती करता आली नाही.

8) अंतिम हप्तेची रककमेचे शोधन करतेवेळी प्रस्तावासोबत आगोदर दिलेले तिसरे हप्तेचे रककमेचे सनदी लेखापरीक्षण अहवाल असणे आवश्यक होते. परंतू, त्याप्रमाणे अहवाल नसताना अंतीम हप्तेची रककम शोधन केली आहे.

9) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्र ग्रापाधो1-114प्र/.क्र.61 07पापु/दिनांक 15/06/2015 नुसार राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या/वस्त्यांना पूरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेचा दर्जा सुधारावा याकरिता प्रत्येक वर्षी नवीन योजना राबविण्यासाठी तसेच जुन्या योजनांची क्षमता वाढविण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णयाप्रमाणे जिल्हयातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकरी अधिकारी असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.याबाबत खुलासा करण्यात यावा.

**3.475 जिल्हा आदिवासी उपयोजना अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 40,75,097/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसुचना क्रमांक गौण खनीज /10/1009/प्र.क्र.309/ख(1), दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 200/- प्रति ब्रास प्रमाणे रक्कम कामावर वापरण्यात येणा-या गिटटी, रेती, मुरुम यावर आकारणी करुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. पुर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पंरा-8, दिनांक 15/11/2011 ला अनूसरून पाणी पूरवठा योजनेचे काम योग्य दर्जाचे उच्चप्रतीचे केल्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय कडून लोखंड, सिमेंट याची तपासणी केल्याबाबत तसेच पाईप लाईनचे काम झाल्यानंतर ते काम गुणवत्तापुर्ण झाले आहे. याबाबत वापरलेल्या पाईप संबंधी क्षेत्रिय जलदाब चाचणीचे अहवाल लेखापरीक्षेत उपलब्ध् झाले नाहीत तथा सक्षम प्राधिकरणाने सदरची चाचणी किती तारखेला

कोणाच्या समक्ष घेतली? त्यावेळेस कोणते जबाबदार अधिकारी पदाधिकारी हजर होते? याबाबत कोणतेही दस्तऐवज नस्तीत आढळत नाहीत. नुतनीकरण योजनेअंर्तगत झालेले बांधकामे योग्य दर्जाची व आवश्यक त्या गुणवत्तेची झाल्याची उपलब्ध केलेले लेखेवरून खात्री होत नाही. यासंबधी शासकीय अनुदानीत रक्कमा निष्फळ खर्ची पडल्या नसल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक ग्रापपु-1098/ प्र.क्र.245/पापु-07, दिनांक 11/01/1999 चे परिशिष्ट 17 नुसार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांनी जिल्ह्यातील पुर्ण झालेल्या स्थानिक नळ योजनांसाठी पुर्व इतिहास नोंदवह्या नमुना क्रमांक भा(I)(II) मध्ये विहित नमुना प्रसिद्ध करून त्याला अनुसरून नोंदवह्या ठेवणे बंधनकारक असताना जिल्हा परिषदेने सदरच्या नोंदवह्या ठेवल्या नाहीत. त्यामुळे सदर गावाकरीता सुरवातीला पाणी पुरवठा योजना कधी मंजूर झाली होती? त्याची अंदाजीत किंमत किती व योजना कोणत्या वर्षाची होती? अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदी आवश्यकतेनुसार व गावच्या मागणीप्रमाणे आहे काय? याबाबत कोणतीही खात्री विभागाने नोंदवह्या ठेवल्या नसल्यामुळे करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, परिपत्रक क्रमाक पंरास/1001/प्र.क्रा.40/जल-03, दिनांक 19/10/2001 अन्वये संबधित काम करणारी संस्था /मक्तेदारावर 01 वर्ष देखभालीची हमी देण्यात यावी. तसेच 10 टक्के निधी 01 वर्षासाठी देण्यात येवू नये. तो राखून ठेवावा. असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिती 1968 चे नियम 180 नुसार देयकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकावर लाल शाईने कर्ण रेषा ओढणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे कामाच्या प्रगतीबाबत पडताळणी करता आली नाही. खुलासा करावा.

7) मूल्यांकनानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला ग्रामीण पाणी पुरपठा विभागाने रक्कम प्रदान केली आहे. सदर समितीने संबंधित कंत्राटदारास प्रदान केलेल्या रक्कमांतुन 1 टक्के उपकर व 1 टक्के विमा कपात आयकर, मुल्यवर्धीतकर, कामगार कल्याण उपकर सुरक्षा ठेव, चाचणीठेव, कपात केल्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेण्यात आलेली आहे. परंतु, कपातीची कोणतीही रक्कम शासनखाती भरणा करण्यात आलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक ग्रापाधो1-114प्र/.क्र.61 07-पापु/ दिनांक 01/06/2015 नुसार राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या/वस्त्यांना पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेचा दर्जा सुधारावा, या करिता प्रत्येक वर्षी नवीन योजना राबविण्यासाठी तसेच जुन्या योजनांची क्षमता वाढविण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकरी अधिकारी असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**3.476 नैसर्गीक आपत्ती पाणी टंचाई अंतर्गत नविन विंधन विहीरी खोदणे व हातपंप उभारणी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 25,79,410/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक टंचाई/1082/प्र.क्र.85/43, दिनांक 08/04/1994 तसेच टंचाई/3099/प्र.क्र.12/पा.पू.14, दिनांक 03/02/1999 अन्वये कृती आराखडयामध्ये समाविष्ट नसलेले योजनाच्या कामाला पुरक कृती आराखडयात समाविष्ट करण्याचे अटीवर जिल्हाधिकारी वाशिम यानी प्रशासकीय मंजूरी दिली होती. परंतू, सदरचे नमूद केलेलें काम पुरक कृती आराखडयात समाविष्ट करण्यात आले किंवा कसे, या बाबत खूलासा करावा.

2) सदरचे कामापैकी भोकरखेड, कवठा खुर्द जोडगव्हाण,मालेगाव,सालंबी येथे खोदण्यात आलेल्या विंधन विहिरी अयशस्वी झाल्या आहेत. कोलंबी व गोंडेगाव येथे विंधन विहीर स्थळाबाबत वादामुळे खोदकाम होऊ शकले नाही. म्हणजे 54 कामापैकी 47 विंधन विहिरी यशस्वी झाल्या असताना 54 हातपंपसंच खरेदी केल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय झाला आहे. 7 हातपंपसंच खरेदीची रक्कम संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.

3) सदरची कामे पुर्ण झाल्यानंतर पाणीशास्त्रज्ञ यांचे पाणी तपासणीबाबतचे अहवाल देयकासोबत जोडण्यात आलेले नाहीत. खुलासा करावा.

4) काम सूरू असताना काम सूरु असलेले ठिकाणी व ग्राम पंचायतीचे नोटीस बोर्डवर कामावर केलेला खर्च दर आठवडयात लिहीणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक ग्राम पंचायत सभेत त्याबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. तसेच ईतर पारदर्शक मार्गाने या कामावर केलेला खर्च ग्रामस्थांना माहीती करून देणे करीता उप विभागाने तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/1099/सी.आर-54/08, दिनांक 20/05/2000 अन्वये केलेले कामाचे ठिकाणी लोखंडीचे फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक होते. परंतू, सदरचे फलक लावले नाही.

5) विधंनविहीरचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मालमत्ता नोदंवहीवर नोंदी घेतल्याबाबतची पडताळणी नोंदवहीअभावी करता आली नाही

**3.477 पाणी टंचाई अंतर्गत मौजे कामरगाव, ता.कारंजा येथील नळ पाणी पुरवठा योजना दुरूस्ती खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,01,867/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकामधील बाब क्रमांक 2 मध्ये जी.आय.पाईप 18 मीटरची तरतूद करण्यात आली व त्याप्रमाणे मोजमाप पूस्तीका क्रमांक 07 मध्ये मोजमापे नोंदविण्यात आली. परंतू, सदर नस्तीची पडताळणी केली असता स्थळदर्शक नकाशा सादर करण्यात आला आहे. स्थळदर्शक नकाशाची पडताळणी केली असता जी.आय.पाईपाची आवश्यकता शेतामधील पाईप लाईन टाकण्यासाठी 6 मीटर पाईप टाकणे आवश्यक होते. परंतू, आवश्कता नसतांना जी.आय.पाईप 150एम.एम18 मीटर पाईप टाकण्यात आले. त्यामूळे 12 मीटरचे रूपये 1,322/- प्रमाणे रुपये 15,864/- चे जादा प्रदान केले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल करून शासनखाती भरणा करण्यात यावी.

2) सदर कामामध्ये जूने पाईप बदलणे, इत्यादी कामे करण्यात आली. पाणी पूरवठा व स्वच्छता विभाग शासन परीपत्रक क्रमांक 1598/प्र.क्र.25/5/पू 14 दिनांक 01/06/1999 मधील सूचना क्रमांक 2 नुसार अस्तित्वात असलेल्या निरपयोगी साहीत्याची विल्हेवाट लावून त्यातून मिळणारी रक्कम जिल्हानिधी मध्ये जमा करणे आवश्यक आहे. परंतू, त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. खूलासा करावा

3) सदर कामासाठी वाफरण्यात आलेल्या 7.5 हॉर्स पावरच्या विदयूत पंप पॅनल बोर्डाचे कंपनीचे वारंटी कार्ड व बिजके इत्यादी कोणतेही अभिलेखे उपल्बध झालेले नाहीत. पिव्हीसी पाईप खरेदी केले असून महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 86 व सार्वजनिक बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक जी आर -34 /सा-4/5999 दिनांक 08/01/2007 नुसार कामावर साहीत्् वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त् करणे आवश्यक असतांना कामावर साहीत्् वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतले नाही. त्यामुळे कामावर वापरलेल्या साहीत्याची गुणवत्तेबाबत खात्री करता आली नाही. तरी याबाबत खूलासा करावा.

4) महाराष्ट्र शासन पाणी पूरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रंमाक टंचाई 1006/प्र.क्र.34/ पापू-14, दिनांक 13/09/2006 नूसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारण्यासाठी घेण्यात येणा-या तात्पूरत्या पूरक नळ योजना या उपाय योजनेसाठी 5 टक्के लोक वर्गणीची आलेली असून तसा अहवाल ग्रामपंचायतीने करून 5 टक्के लोकवर्गणीच्या रक्कमेतून सदर कामाचा खर्च करणे आवश्यक आहे.परंतू ग्रामीण पूरवठा विभागाने लोकवर्गणी प्रत्यक्ष् संबधीत गावातील नागरीकाकडून गोळा न करता नियमबाहयपणे कंत्राटदाराच्या देयकातून रक्कम रूपये 4,782/- कपात केल्याचे दिसून येते. तरी नियमबाहयेतेबाबत खूलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रमांक ग्रापाधो1-114प्र/.क्र.61 07 -पापु/ दिनांक 15/06/2015 नुसार राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या/वस्त्यांना पूरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेचा दर्जा सुधारावा, याकरिता प्रत्येक वर्षी नवीन योजना राबविण्यासाठी तसेच जुन्या योजनांची क्षमता वाढविण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णयाप्रमाणे जिल्हयातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकरी अधिकारी असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**3.478 मौ हिवरी, तालुका यवतमाळ येथील आश्रम शाळेच्या नळयोजनेच्या कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रूपये 29,03,339/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 नुसार मुद्दतवाढीचा अर्ज पंधरा दिवसापुर्वी प्राप्त होणे आवश्यक असतांना विहीत कालावधीत मुद्दतवाढीचा अर्ज प्राप्त झालेला नसतांना मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी पत्र क्रमांक 321/18/5/2013 अन्वये 04/07/2013 ते 31/03/2015 पर्यंत विनादंड मुद्दतवाढ देण्यात आली.

2) प्राचार्य / मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा हिवरी, तालुका, जिल्हा यवतमाळ यांनी पाणी पुरवठा सुरु न झाल्याचे पत्र पाणी पुरवठा विभागाला दिनांक 30/12/2015 ला दिल्याचे निदर्शनास येते. यावरून कागदोपत्री दिनांक 31/03/2015 ला पुर्ण दाखविल्याचे स्पष्ट होते.

3) मुद्दतवाढीच्या अर्जावर खोडतोड केलेली आहे. यावरून मक्तेदाराच्या सोयीनुसार कागदपत्रे तयार करून घेतल्याचे आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 155(2) नुसार व निविदेतील अट क्र. 38(2) नुसार बाब निहाय कामाच्या 125 टक्के पेक्षा जादा कामाला अधिक्षक अभियंता यांची मंजुरी घेणे आवश्यक असतांना मंजुरी न घेता कामावर खर्च केल्याचे निदर्शनास येते.

5) महाराष्ट्र शासन, राजपत्र महसुल व वन विभाग अधिसुचना क्रमांक गौखनि/1009/प्र.क्र.309, दिनांक 11/02/2010 अन्वये रेती संदर्भात रॉयल्टीच्या रक्कमा कपात करणे आवश्यक असतांना, रॉयल्टीच्या रक्कमा कपात करण्यात आल्या नाही. व परवाना पावत्या सुध्दा घेतल्या नाही.

6) विहिरीतील पाण्याचा उपसा करण्याकरिता रुपये 90,000/- खर्च केल्याचे निदर्शनास येते. परंतू लॉगबुक न ठेवल्यामुळे किती तास किती दिवस किती हौस पावरच्या मोटर पाण्याचा उपसा केला याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

7) पुरविण्यात आलेल्या 90 एमएम 6 केजी/सीएम 960 मीटर मधून 936 मीटर पाईपचा वापर करण्यात आले, त्यामुळे ग्रामपंचायतला 24 मीटर पाईपचे जादा प्रदान झालेले आहे. तरी याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करण्यात यावी.

8) कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष कामाची पहाणी केल्याबाबत दिनांकीत स्वाक्षरी न केल्यामुळे फक्त कागदोपत्री तपासणी केल्याचे स्पष्ट हाते.

9) नळ योजना व्यवस्थित चालू असल्याबाबत प्राचार्य / मुख्याध्याक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा हिवरी, तालुका जिल्हा यवतमाळ यांच्याकडून प्रमाणपत्र घेतले नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 अन्वये कामावर साहित्य वापरल्याबाबत त्रसस्थ संस्थेकडून गुणवत्ता चाचणी अहवाल घेतला नाही.

11) मक्तेदाराकडे भाग भांडवल यांत्रिक सामुग्री मनुष्यबळ व तांत्रिक कर्मचारी असल्याबाबत लेखी स्वरूपात माहिती व आकडेवारी घेतील नाही.

**3.479 मौ कुंभारकिन्ही, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ येथील तात्पुर्ती नळयोजना दुरुस्ती मधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 20,48,997/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळकडून मोजमाप पुस्तिका दिनांक 10/02/2016 ला प्राप्त झाली. यावरुन झालेल्या कामानुसार टप्प्या-टप्प्याने कामाचे मोजमाप घेणे आवश्यक असतांना कामाचे मोजमाप दिनांक 15/03/2016 ला घेऊन त्याच तारखेला पुर्ण दाखविले.

2) पाणी उपसा करण्याकरिता पुढील प्रमाणे खर्च करण्यात आला. परंतु सदरहू पाण्याचा उपसा किती दिवस करण्यात आला किती हौस पावर मशीनने किती तास केला याबाबत लॉगबुक न ठेवल्यामुळे पाणी उपसा केलेल्या कामावरील खर्च लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 155(2) नुसार व निविदेतील अट क्र.38(2) नुसार बाब निहाय कामाच्या 125 टक्के पेक्षा जादा कामाला अधिक्षक अभियंता यांची मंजुरी घेणे आवश्यक असतांना मंजुरी न घेता कामावर रक्कम रूपये 1,26,996/- खर्च केल्याचे निदर्शनास येते.

4) 110 मीटर व्यासाच्या पाईप 1656 खरेदी करण्यात आले. परंतु 1648 पाईप चा वापर करण्यात आले. त्यामुळे 8 पाईपचे रक्कम जादा प्रदान झाले. तरी याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करण्यात यावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 नुसार कामावर साहित्य प्राप्त झाल्यावर वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेकडून चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

6) विहित कालावधीत काम पुर्ण न केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असतांना दंडात्मक कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र शासन, राजपत्र महसुल व वन विभाग अधिसुचना क्रमांक गौखनि/1009/प्र.क्र.309, दिनांक 11/02/2010 अन्वये ठेकेदाराच्या देयकातून रॉयल्टीच्या रक्कमा कपात करणे आवश्यक असतांना, रॉयल्टीच्या रक्कमा कपात करण्यात आल्या नाही. व परवाना पावत्या सुध्दा घेतल्या नाही. तरी याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करणे क्रमप्राप्त ठरते.

**3.480 उपविभाग दारव्हा अतंर्गत मौ.लिंगा बोरगाव, तालुका नेर येथील तात्पुरती नळ योजना खर्चातील अनियमीतता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदरबाबत रक्कम रूपये 15,73,796/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त बांधकामा संदर्भात निविदेतील कलम 38(2) नुसार 125 टक्के पेक्षा जास्त परिमाणांसाठी अथवा रुपये 5,000/- खर्चाचे मर्यादेपेक्षा जास्त होणा-या खर्चाच्या कामासाठी सक्षम अधिका-याची सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 अन्वये प्रथम 10 लाखाकरिता 100/- रुपये व पुढील प्रत्येक लाखावर 100/- रुपये प्रमाणे रुपये 800/- रुपयाचे मुद्रांक शुल्कावर करारनामा करने आवश्यक असतांना रुपये 100/- चे स्टॅम्पवर करारनामा केलेला आहे. त्यामुळे उर्वरित 700/- रुपयाचे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कामाचा विमा व सदर कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा “शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई” यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे 1 टक्के रुपये रुपये

15,738/- कपात न करता रुपये 7,869/- रुपये कपात करण्यात आली. उर्वरित कमी कपात रक्कम रुपये 7,869/- संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्यात यावी.

4) निविदा प्रसिध्दी कामाची मुदत 12 महीने व कामाच्या आदेशात 6 महीने नमुद करण्यात आलेली आहे. याबाबत सप्रमाण खुलासा करण्यात यावा.

5) सदर कामाची निविदा ई-टेडरींगव्दारे करण्यात आली परंतु करारनामा बी-1 बुकलेट भरलेले नाही. तसेच सदर कामाची ई निवीदा दाखल केलेल्या कंत्राटदारानी निविदेसोबत साईटवर अपलोड केलेल्या दस्तंऐवजाची माहिती लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. फक्त यशस्वी कंत्राटदाराची कागदपत्रे अपलोड करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामाकरीता निविदा दाखल केलेले कंत्राटदार पात्र आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

6) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159, दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादी चा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु काम पुर्ण झालेनंतर अहवाल घेणेत आलेला आहे.

7) मोजमाप पुस्तिकेत बाब क्र.3 मध्ये डीवॉटरिंग डीझेल इंजिन करिता शेडयुल बी मधील तरतुदीप्रमाणे रुपये 1,07,820/- प्रदान केलेले आहे. परंतु डीझेल इंजिन वापराबाबतचे लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे सदर खर्चाबाबत सत्यता पडताळता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये उत्खन्नंद्वारे काढलेली खडी, मुरुम व रेती यावर रुपये 200/- प्रती ब्रास प्रमाणे गौणखनिज कर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रॉयल्टीची वसुली केलेली नाही. तसेच रॉयल्टी पावती लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे शासन महसूलाचे नुकसान झाल्याचे दिसते याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

9) प्रशासकिय मंजुरी जिल्हाधिकारी यवतमाळ /जिनिस/जिवायो/का-1/136/13-14, दिनांक 24/03/2015 चे अट क्रमांक 6) कामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढुन वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रही ठेवावे व अट क्र. 22) कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत करणे आवश्यक असतांना अटीप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.481 उपविभाग दारव्हा अतंर्गत मौ. दर्यापुर येथील तात्पुरती नळ योजना खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदरबाबत रक्कम रूपये 17,90,793/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य सुक्ष्मजंतु शास्त्रज्ञ, जिल्हा सार्वजनिक स्वास्थ लेबॉरेटरी, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक 161, दिनांक 03/11/2015 अन्वये पाण्यातील नायट्रेट चे प्रमाण परमीसीबल लिमीटपेक्षा जास्त आहे. सदर योजना ज्या जलस्त्रोतांचे पाणी पिणेयोग्य नाही, असा अहवाल मुख्य सुक्ष्मजंतु शास्त्रज्ञ यवतमाळ यांनी दिलेला आहे. त्यास्थळी राबविल्यामुळे योजनेचे उद्दीष्ट सफल न झालेबाबत लेखापरिक्षणाचे मत आहे. तसेच सदर मुख्य सुक्ष्मजंतु शास्त्रज्ञ यवतमाळ यांचा अहवाल तांत्रिक मंजुरी 12/169, दिनांक 20/03/2015 व कामाचा आदेश 4287/15, दिनांक 28/09/2015 पुर्वी घेणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) उपरोक्त बांधकामा संदर्भात निविदेतील कलम 38(2) नुसार 125 टक्के पेक्षा जास्त परीमाणांसाठी अथवा रुपये 5,000/- खर्चाचे मर्यादेपेक्षा जास्त होणा-या खर्चाच्या कामासाठी सक्षम अधीका-याची सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. सबब रक्कम रुपये 94,962/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 अन्वये प्रथम रुपये 10 लाखाकरिता 100/- रुपये व पुढील प्रत्येक लाखावर 100/- रुपये प्रमाणे 1,000/- रुपयाचे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना 100/- चे स्टॅम्पवर करारनामा केलेला आहे. त्यामुळे उर्वरित 900/- रुपयाचे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कामाचा विमा व सदर कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा "शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे 1 टक्के रुपये 17,908/- कपात न करता रुपये 8,954/- कपात करण्यात आली. उर्वरित कमी कपात रक्कम रुपये 8,954/- संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन वसुल करण्यात यावी.

5) ई-निविदा प्रसिध्दीत कामाची मुदत 12 महीने व कामाच्या आदेशात 6 महीने नमुद करण्यात आलेली आहे. याबाबत सप्रमाण खुलासा करण्यात यावा.

6) सदर कामाची निविदा इ-टेडरींगव्दारे करण्यात आले परंतु करारनामा बी-1 बुकलेट भरलेले नाही तसेच सदर कामाची ई निवीदा दाखल केलेल्या कंत्राटदारानी निविदेसोबत साईटवर अपलोड केलेल्या दस्तंऐवजाची माहिती लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही फक्त यशस्वी कंत्राटदाराची कागदपत्रे अपलोड करण्यात आलेले आहे. त्यामूळे सदर कामाकरीता निविदा दाखल केलेले कंत्राटदार पात्र आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

7) अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159 दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादी चा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल घेणेत आलेला नाही.

8) मोजमाप पुस्तिकेत बाब क्र.3 मध्ये डीवॉटरिंग डीझेल इंजिन करिता शेडयुल बी मधील तरतुदीप्रमाणे 1,19,800/- रुपये प्रदान केलेले आहे. परंतु डीझेल इंजिन वापराबाबतचे लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे सदर खर्चाबाबत सत्यता पडताळता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये उत्खननंनाद्वारे काढलेली खडी, मुरुम व रेती यावर रुपये 200/- प्रती ब्रास प्रमाणे गौणखनिज कर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रॉयल्टीची वसुली केलेली नाही. तसेच रॉयल्टी पावती लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे शासन महसूलाचे नुकसान झाल्याचे दिसते याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.482 उपविभाग राळेगाव अंतर्गत ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना मौजा पोटगव्हाण, तालुका कळंब येथील पाणी पुरवठा खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** सदरबाबत रक्कम रूपये 7,38,099/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2010/275/ प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये बांधकामे ई-निवीदा प्रक्रीया अन्वये करणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक 5028/दिनांक 26/8/14 चे अट क्र. 5) अन्वये काम सन 2014-15 मध्ये पुर्ण करणे आवश्यक आहे व अट क्र.11) अन्वये 4 x 3 " आकाराचे लोखंडी फलक लावणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करने आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159, दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट व pvc पाईपचा इत्यादी चा वापर करण्यापूर्वी शासकीय

प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु चाचणी अहवाल दिनांक 29/03/2016 रोजीचा आहे व काम पुर्ण दिनांक 14/03/2016 ला झाले आहे.

5) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये उत्खन्नाद्वारे काढलेली खडी, मुरुम व रेती यावर रुपये 200/- ती ब्रास प्रमाणे गौणखनिज कर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रॉयल्टीची वसुली केलेली नाही. तसेच रॉयल्टी पावती लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे शासन महसूलाचे नुकसान झाल्याचे दिसते याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.483 उपविभाग यवतमाळ अंतर्गत मौ.पहुर न. तालुका आर्णी येथील विहीर बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 35) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,97,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शेडयुल बी प्रमाणे बोरचे कामामध्ये बाब क्रमांक 5 सबमर्सीबल पंप फेज 5 hp 1 नग दर रुपये 30,806/- नमुद असतांना प्रत्यक्ष देयकात / मोजमाप पुस्तिकेप्रमाणे बाब 5 सबमर्सीबल पंप फेज 3 hp 1 नग दर रुपये 28,074/- घेतल्याचे आढळते. प्रत्यक्ष तरतुद 5 hp सबमर्सीबल पंपाची केलेली असतांना 3 hp सबमर्सीबल पंप लावल्याने अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम न केल्याबाबत कार्योत्तर मंजुरी घेवुन दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/275/ प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये बांधकामे ई-निवीदा प्रक्रीया अन्वये करणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

3) उपरोक्त बांधकामा संदर्भात निविदेतील कलम 38(2) नुसार 125 टक्के पेक्षा जास्त परीमाणांसाठी अथवा रुपये 5,000/- खर्चाचे मर्यादेपेक्षा जास्त होणा-या खर्चाच्या कामासाठी सक्षम अधिका-याची सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. सबब रक्कम रुपये 8,089/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपी ए 2008/ प्र.क्र.428/वित्त-9, दिनांक 30/12/2008 नुसार निविदा बुकलेट विक्री न केल्यामुळे निविदा संचाची किंमत 200/- रुपयाचे जिल्हा परिषद सेस चे नुकसान झालेले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 148 अन्वये कामास मुदत वाढवुन देणे आवश्यक असेल तर अशी वाढ कार्यकारी अभियंता यवतमाळ यांचेकडुन मंजुर करुन घेतली पाहीजे आणी ती सुरुवातीची कालमर्यादा किंवा वाढवुन दिलेली कालमर्यादा संपण्यापुर्वी मंजुर करुन घेणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखा संहिता 1968 चे नियम 190 अन्वये नमुना 65 मध्ये काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. परंतु काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे काम कधी पुर्ण झाले याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) शेडयुल बी वर दर मंजुरीबाबत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, यवतमाळ यांची स्वाक्षरी आढळली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159, दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादी चा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु काम पुर्ण दिनांक 16/06/2015 व चाचणी अहवाल पत्र क्रमांक 1707/3691/20/8/15 अन्वये प्राप्त आहे.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.472 /वित्त 9, दिनांक 09/02/2009 ला अनूसरून रूपये 20,000/- पेक्षा जास्त किमंतीचे कामावर बोर्ड लावणे बंधनकारक असतांनी कामावर बोर्ड लावल्याचे छायाचित्रासह दस्तंऐवज लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही.

10) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये उत्खन्नांद्वारे काढलेली खडी, मुरुम व रेती यावर रुपये 200/- प्रती ब्रास प्रमाणे गौणखनिज कर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रॉयल्टीची वसुली केलेली नाही. तसेच रॉयल्टी पावती लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे शासन महसूलाचे नुकसान झाल्याचे दिसते याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.484 जलशुध्दीकरण यंत्र खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 88,20,000/- खर्च करण्यात आला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे**.**

1) सयंत्र पुरवठा केल्याबाबत पुरवठा विवरणे (D.M.) नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत. त्यामुळे शर्ती व अटीमधील अट क्रमांक 17 नुसार विहित कालावधीत पुरवठा न झाल्यास प्रति दिन रुपये 5/- दंडाच्या तरतुदीबाबत खात्री करता आली नाही.

2) निविदेतील अट क्रमांक 7 नुसार पुरवठयानंतर 80 टक्के व समाधानकारक चाचणी दिल्यानंतर 20 टक्के प्रदान करावयाचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) निविदेतील शर्ती व अटी अट क्रमांक 8 नुसार संयत्र चालविण्यासाठी एक महिन्याचे प्रशिक्षण संबंधीत योजनेच्या कामगाराला देण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकाची राहील. तथापि, प्रशिक्षणाबाबत अभिलेखे नस्तीला आढळून आले नाहीत.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 20/03/2012 अन्वये कार्यकारी अभियंता यांना रुपये 50,00,000/- पर्यंत तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार आहे. परंतु उपरोक्त खरेदीकरीता तुकडे करुन तांत्रिक मंजूरी दिल्याचे दिसून येते.

5) शासन निर्णय क्रमांक झेडीपीए-2013/प्रं.क्रं.27/वित्त-9, दिनांक 12/05/2016 ग्रामविकास व पंचायतराज विभाग नुसार अनोंदणीकृत कंत्राटदारकडून मुल्यवर्धीत कराची 5 टक्के दराने आकारणी करावयाची आहे. परंतु सदरील देयकातून 4 टक्के दराने आकारणी केल्यामुळे 1 टक्के शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. तरी पुरवठाधारकाकडून रुपये 88,200/- वसूल करुन योग्य शासनशिर्षात जमा करण्यात यावे.

6) निविदेतील शर्ती व अटी अट क्रमांक 10 नुसार सूरक्षा ठेव 3 टक्के वसूल करण्यात येईल. परंतु प्रत्यक्षात देयकातून 2 टक्के सुरक्षा ठेवीची वसूली केलेली आहे.

7) पुरवठा झालेल्या सयंत्राचे साठा नोंदीबाबत दस्तऐवज नस्तीला आढळून आले नाही.

8) ग्रामपंचायत बचेरा येथील सयंत्राची प्रतिष्ठापना दिनांक 06/04/2016 ते 11/04/2016 ला झालेली असतांना कामपूर्णत्व प्रमाणपत्रात दिनांक 19/03/2016 दिनांक नमुद आहे. त्यामुळे सन 2016-17 मध्ये काम पूर्ण झालेल्या कामाचे प्रदान सन 2015-16 मध्ये करण्यात आल्याचे दिसून येते.

**3.485 मौजा-घरतवाडा नळयोजना दुरुस्तीचे कामामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,09,844/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 31/05/2014 ला काम पूर्ण होणे आवश्यक असतांना काम 1 वर्ष उशीराने झाले आहे. त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी नाही. व कामाचे मुदतवाढीबाबत कोणतेही दस्तऐवज नस्तीला आढळून आला नाही.

2) देयकातून अधिकार शुल्काची कपात करण्यात आलेली नाही. मुळ अंदाजपत्रक तपासणीसाठी सादर न केल्यामुळे स्वामित्व धन रकमेबाबत गणना करता आली नाही.

3) मोजमाप पुस्तकावर दिनांकीत स्वाक्षरी नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार व महाराष्ट्र बांधकाम नियमावली 1984 परिशिष्ट 24 (13 व 15) रक्कम प्रदान करतेवेळी मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्ण रेषा ओढणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेंखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार कामाची नोंद नमुना 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

6) वरील काम दिनांक 31/05/2014 ला पूर्ण होणे आवश्यक असतांना काम 1 वर्ष उशीराने पूर्ण केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असतांना ती पूर्ण करण्यात आलेली नाही. त्यामुळे उशिराने कामाबाबत संबंधीताकडून 10 टक्के दराने रुपये 98,551/- दंडाची वसूली करुन रक्कम योग्य शिर्षात जमा करण्यात यावी.

### 3.486 ग्रामपंचायत महालगांव येथील पाणी पुरवठा योजना अंतर्गत रिप्लेसमेंट ऑफ राईसींग मेनचे कामातील अनियमितता.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,96,675/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुळ अंदाजपत्रक लेखातपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 110 नुसार आकस्मिक खर्चाची 5 टक्के तरतुद करणेबाबत निर्देश असतांना फक्त 1 टक्का तरतुद केल्याचे दिसून येते.

3) कार्यादेशानुसार दिनांक 08/10/2015 पूर्वी काम पूर्ण करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात दिनांक 31/12/2015 रोजी (एकूण 83 दिवस उशिराने) काम पूर्ण करण्यात आल्यामुळे दंडाची संबंधीताकडून वसूल करुन योग्य शिर्षात जमा करण्यात यावी.

4) देयकातून अधिकार शुल्काची कपात करण्यात आलेली नाही. मुळ अंदाजपत्रक तपासणीसाठी सादर न केल्यामुळे अधिकार शुल्काच्या रक्कमेबाबत गणना करता आली नाही.

5) मोजमाप पुस्तकावर दिनांकित स्वाक्षरी नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार व महाराष्ट्र बांधकाम नियमावली 1984 परिशिष्ट 24 (13 व 15) रक्कम प्रदान करतेवेळी मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्ण रेषा ओढणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार कामाची नोंद नमुना 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

### 3.487 जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत भुमिगत बंधारा बांधकाम खर्चातील अनियमितता.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 22,37,346/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्रक203/जल-7, दिनांक 05/12/2014 यातील मार्गदर्शक सुचना प्रमाणे जलयुक्त शिवार अभियान राबविणे आहे. असे असताना त्यातील मार्गर्शक सुचना क्रमांक (7) अभियानाचा कावालधी (13) अभियानाचा आराखडा तयार करणे (22) अभियानची फलनिष्पती (24) कार्यक्रमाचे मुल्यमापन व परिशिष्ट 'क' यातील सुचनेप्रमाणे जलयुक्त शिवार अभियान राबविली नाही व सुचनेचे पालन झाले नाही.

2) सदर अभियान अंतर्गत 4 गावामधील 4 कामाचे B1 करारनामा किंमत व करारनामा एकच केलेला आहे.

करारनामातील अटी व शर्ती यातील अट क्रमांक 6 मध्ये खुल्या कंत्राटदाराला तीन पेक्षा जास्त कामे घेता येणार नाही. असे असताना 3 पेक्षा जादा काम दिल्याने करारनामातील शर्ती व अटीचे पालन झाले नाही.

3) निविदेतील कलम 38(2) नुसार 125 टक्के जास्त परिमानासाठी अथवा रूपये 5,000/- (जे जास्त असेल ते) पेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाच्या कामासाठी सुधारीत मंजुरी घेण्यात आली नाही.

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2004/प्रक85/रस्ते-1, दिनांक 11/06/2004 प्रमाणे अंदाजपत्रक काळजी पुर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. एखाद्या बाबीच्या निविदेतील परिमानात 25 टक्के वाढ होणे अटळ असल्यास त्याचा सविस्तर प्रस्ताव कारणासह कार्यकारी अभियंता यांना उपअभियंता यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे रक्कम रूपये 11,54,078/- वसुल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120 व 153(2) प्रमाणे मंजुर प्राक्कलनातील बाब क्रमांक 3,5,6,7,10 वर बचत करून बचतीची रक्कम नियमबाह्यरित्या इतर बाबीवर खर्च केलेला आहे. त्यामुळे कामाच्या दर्जाविषयी साशंकता वाटते.

4) चाचणी अहवाल - महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता, नागपुर यांचे पत्र क्रमांक 5187, दिनांक 08/07/1997 नुसार सदर साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतुन चाचणी करून अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तेव्हा कार्यारंभ आदेशात शासकीय पॉलीटेक्नीक आर्वी कडून चाचणी अहवाल प्राप्त करण्याबाबत आदेशात नमुद नसताना, चाचणी अहवाल प्राप्त केलेला आहे.

कार्यारंभ आदेश दिनांक 05/06/2015 ला दिलेत. काम पुर्ण दिनांक 21/06/2015 ला झाले. मात्र चाचणी अहवाल दिनांक 20/08/2015 ला प्राप्त झाले. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक सिमेंट/099/प्रक56, दिनांक 30/06/2010 अन्वये साहित्य वापरण्यापुर्वी त्याचे चाचणी आहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना ते काम पुर्णत्वानंतर प्राप्त झालेले आहे.

5) विमा संचालनालय पत्र क्रमांक 1891/सी.डी.आर/जि.प.संकीर्ण, दिनांक 30/07/2002 अन्वये ठेकेदारांनी कंत्राट कामाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही नसल्याने देयकातुन कपात केलेली विमा हप्त्याची रक्कम रुपये 22,373/- विमा संचालनालयकडे भरणा करून चलनासह पुर्तता दर्शवावी.

6) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.123/परा-7, दिनांक 26/01/2009 अन्वये 1 टक्के कामगार कल्याण उपकराची रक्कम रूपये 22,373/- देयकातुन कपात रक्कमेचे कामगार कल्याण मंडळाकडे जमा करून चलनासह पुर्तता दाखवावी.

**3.488 पाणी टंचाई कार्यक्रम खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद, वर्धा मध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,12,936/- जिल्हा निधीच्या रोख पुस्तकात खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार प्राप्तीकर कायदा 1961 कलम 194 नुसार कंत्राटदाराच्या देयकातून कामाच्या मुल्यांकनावर 2 टक्के आयकर व 15 टक्के सरचार्ज कपात करणे आवश्यक आहे. पण कपात करण्यात आलेली नाही. 2 टक्के आयकर व 15 टक्के सरचार्ज ची एकूण रक्कम रूपये 11,798/- वसुलपात्र आहे.

2) महाराष्ट्र शासन, विक्रीकर विभाग, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक Vat/adm/1010IC/adm/Trade CIR of 2010, दिनांक 17/03/2010 अन्वये कामाच्या मुल्यांकनाच्या 5 टक्के मुल्यवर्धीत कर (व्हॅट) कपात करणे आवश्यक आहे. परंतु कपात करण्यात आलेली नाही. 5 टक्के मुल्यवर्धीत कराची एकूण रक्कम रूपये 25,647/- वसुलपात्र आहे.

3) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक 2305, दिनांक 04/03/2005 अन्वये कामाच्या अंदाजपत्रक किंमतीच्या 1 टक्के रक्कम कपात करणे आवश्यक आहे. पण कपात करण्यात आलेली नाही. 1 टक्के विम्याची रक्कम रूपये 5,729/- वसुलपात्र आहे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए 2007/प्र.क्र.788/ कामगार 7(अ), दिनांक 26/10/2009 नुसार कामगार कल्याण उपकर निधी 1 टक्के कपात करणे आवश्यक असतांना कपात करण्यात आलेली नाही. 1 टक्के कामगार कल्याण निधीची एकूण रक्कम रूपये 5,129/- वसुलपात्र आहे.

5) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पापु 14, दिनांक 03/02/1999 नुसार कामासाठी सहाय्यक भूवैज्ञानिक यांचेकडून प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना नस्तीत तसे प्रमाणपत्र आढळले नाही. तर उपअभियंता यांचे निरिक्षण अहवाल देखील नस्तीला आढळून आले नाही.

**3.489 कांदेगाव नळ पाणी पुरवठा योजनाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 15, दिनांक 05/08/2015 अन्वये रक्कम रुपये 6,59,236/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकानुसार कामाचे मुल्य रुपये 19,54,208/- असतांना मोजमाप मुल्यांकनात काम रुपये 20,17,354/- चे केले आहे. म्हणजेच रुपये 63,146/- चे जादा काम केले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 124 नुसार कमी जादा कामासाठी कार्यादेश पुस्तक ठेवुन त्यास सक्षम अधिका-यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे परवानगी न घेताच संबंधीत कंत्राटदाराने स्वमर्जिने जादा काम करुन व कंत्राटदाराला विभागाने जादाचे नियमबाह्य प्रदान केले आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120 व 156 नुसार एका कामावरील झालेली बचत दुस-या कामावर खर्च करता येत नसतांना तुलनात्मक विवरणपत्रानुसार मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 2, 3 व 4 वर रुपये 5,235/- जादा खर्च केला आहे. जादा खर्च लेखामान्य नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपी 2009/प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये रुपये 10 लाख पर्यंत रुपये 100/- व त्यावरील प्रत्येक एका लाखला रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. सदर बांधकामात अंदाजपत्रक रुपये 21,28,631/- चे असल्याने एकुण रुपये 1,300/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याने रुपये 1,200/- शासन महसुलाची हानी झाली आहे. याबाबत जबाबदारी निश्चित व्हावी.

4) रुपये 500/- ची लोकवगर्णीची पावती नस्तीत आहे, 10 टक्के लोकवगर्णीची रक्कम रुपये 2,13,660/- कंत्राटदारास कोणत्या लेखाशिर्षाअंतर्गत प्रदान करण्यात आली याबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

**3.490 पाचोडा (ठा), तळेगाव, सोरटा, माळेगाव ठेका येथील नाला खोलीकरण व रुंदीकरण.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 763, दिनांक 28/08/2015 अन्वये रक्कम रुपये 7,72,924/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 01 मधील 0 ते 1.50 मीटर 1701.25 क्यु मी. प्रती क्यु मी. रुपये 128/- प्रमाणे एकुण रुपये 2,17,760/- काम करावयाचे असतांना ते 5482.20 क्यु.मी. एकुण रुपये 4,83,962/- जादा काम करण्यात आले आहे, तसेच उपरोक्त बाब क्रमांक 01 मधील काम 1.50 ते 3 मीटर कामाची अंदाजत्रकात तरतुद नसतांना 1278.75 क्यु.मी. प्रमाणे एकुण रुपये 1,91,045/- चे काम करण्यात आले आहे, तसेच बाब क्रमांक 07 Provoding and laying अंदाजपत्रकातील तरतुद 8.83 क्यु.मी. प्रती क्यु.मी. रुपये 808/- प्रमाणे रुपये 7,136/- ची तरतुद असतांना काम 10.60 क्यु.मी. करण्यात आल्याने रुपये 1,429/- चे जादा काम करण्यात आले आहे. निविदा बी-1 मधील क्लॉज क्रमांक 38 नुसार रुपये 5,000/- पर्यंत काम कमी / जादा करता येते परंतु निविदेतील क्लॉज क्रमांक 42 नुसार तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 124 नुसार जादा कामासाठी कार्यादेश पुस्तक ठेवून कमी / जादा कामासाठी सक्षम अधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक

असतांना अशाप्रकारे परवानगी न घेताच कंत्राटदाराने केलेल्या जादा कामाची रुपये 6,76,436/- कंत्राटदारास जादा प्रदान केले आहे. सदर खर्च लेखामान्य नाही.

2) कार्यादेश क्रमांक 5 दिनांक 16/08/2015 नमुद असुन काम पुर्णत्वाचा प्रमाणपत्रावर काम पुर्ण दिनांक 26/06/2015 असे दर्शवीण्यात आले असुन कामाचा आदेश देण्यापूर्वीच काम झाल्याचे दिसुन येते.

3) कार्यकारी अभियंता यांनी बी-1 करारनाम्यावर प्रत्येक पानावर स्वाक्षरी केली नसल्याने करारनामा विधीग्राहय नाही.

**3.491 अल्लीपूर येथील पाणीपुरवठा योजनेची पवनी विहिरीपासून उर्ध्वनलीका बदलविणेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 06, दिनांक 23/07/2015 अन्वये रक्कम रुपये 16,46,099/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 1- Excavation pipe अंदाजपत्रकानुसार 810.00 क्यु.मी. करावयाचे असतांना मोजमान पुस्तिकेत काम 1347.14 क्यु मी करण्यात आल्याने रुपये 68,830/- चे जादा काम करण्यात आले आहे. तसेच बाब क्रमांक 4 Providing rigid unplastic pipe अंदाजपत्रकात तरतुद 100 आरएमटी करण्यात आल्याने रुपये 14,700/- चे जादा काम करण्यात आले आहे. निविदा बी-1 मधील क्लॉज क्रमांक 38 नुसार रुपये 5,000/- पर्यंत काम कमी / जादा करता येते. परंतु निविदेतील क्लॉज क्रमांक 42 नुसार जादा कामसाठी सक्षम अधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक असतांना अशाप्रकारे परवानगी न घेताच कंत्राटदाराने केलेल्या जादा कामाची रुपये 83,530/- कंत्राटदारास जादा प्रदान केले आहे.

2) मुंबई विक्रीकर आयुक्त यांच्या दिनांक 01/04/2005 च्या अधिसुचनेनुसार तसेच महा. व्हॅल्यु ॲडेड कायदा 2002 मधील तरतुदी नुसार मुल्यवर्धित कर रुपये 32,920/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकराची रक्कम रुपये 16,460/- वसुल करणे अनिवार्य आहे.

4) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी ठेकेदाराने कामाचा व कामवरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. परंतु रुपये 16,460/- वसुल होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 151 व बांधकाम लेखा संहिता नियम क्रमांक 107 नुसार प्रथम प्रशासकीय मान्यता घेवून नंतर तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना सदर कामात याविरुध्द कार्यवाही केलेली आहे.

**3.492 मोरगाव (राजे) येथील नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 8, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 6,50,706/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 65.89 bhp.hr नुसार 600 तासाचे रुपये 39,534/- खर्च नोंदवला आहे. उपसा नोंदीचे लॉगबूक सादर केलेले नाही.

2) कामाच्या ठिकाणी नवीन 5 एचपी मोटर पंप बसविण्यात आले आहे. मोटर पंपाचे वारंटी कार्ड तपासले असता, मोटर पंपाचा पुरवठा दिनांक (Dispatch Date) 21/12/2015 नमूद आहे. जर मोटर पंप दिनांक 21/12/2015 ला पुरवठा झाली, तर काम दिनांक 21/12/2015 ला कसे पूर्ण होणे शक्य आहे. तरी मोटर पंप खरेदी नुसार सदर काम दिनांक 21/12/2015 नंतर पूर्ण झाले आहे. तरी काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) कामाकरिता 75 एम.एम.चे 660 आरएमटी पी.व्ही.सी.पाईप वापर करण्यात आला आहे. तरी देयकासोबत / नस्तीत वापरण्यात आलेल्या पी.व्ही.सी.पाईपचा निरिक्षण अहवाल जोडण्यात आलेले नाही.

4) उपविभागीय अभियंता, भंडारा उपविभाग यांना दिनांक 07/02/2014 रोजी योजनेची प्रत्यक्ष पाहणी करून त्यानुसार योजना सुरु करण्याकरिता कोणते काम घेणे आवश्यक आहे, याबाबत शेरा नमूद केला आहे, यात विहिरीबाहेर ऑटर बोअर घेण्यात यावे असे नमूद केलेले नाही. परंतु प्राक्कलन तयार करतांना ऑटर बोअरची बाब घेण्यात आलेली आहे.निरिक्षण अहवालानुसार ऑटर बोअरची आवश्यकता नसतांना करण्यात आलेल्या कामावर खालील प्रमाणे खर्च रक्कम रुपये 36,622/- मान्य करता येत नाही.

बाब क्र.40 vertical bore खर्च 17,460/-

बाब क्र.41 पी.व्ही.सी.केसिंग पाईप खर्च 19,162/-

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो 114/प्र.क्र.52/पा.पु-07, दिनांक 17/10/2014 नुसार सदर काम पूर्ण झाल्यानंतर योजना ग्रामपंचायत / ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समिती/शिखर समिती यांना हस्तांतरित करणे आवश्यक असतांना विभागाने सदर योजना दुरुस्तीनंतर हस्तांतरित केलेली नाही.

6) कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 147 लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे झालेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**3.493 जलशुद्धीकरण केंद्र बेला येथील 15 एचपी मोटर पंप बदलविणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 27/07/2015 अन्वये रक्कम रुपये 1,94,810/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मधील परिशिष्ट क (3) नुसार जिल्हा स्तरावर घ्यावयाच्या कामाच्या यादीत प्रा.नळ योजना पाणी पुरवठा विशेष दुरुस्तीचे काम नमूद नाही. त्यामुळे शहापूर येथील योजनेवर 13 वित्त आयोग निधीतून करण्यात आलेले काम नियमबाह्य असून झालेला खर्च रक्कम रुपये 1,94,810/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

2) कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तपासली असता,कामात 2 सबमर्शीबल पंप बदलण्यात आले आहे.

शहापूर येथील नळ योजनेवर पूर्वी असलेले जुन्या सबमर्शीबल पंपाची निर्लेखन मूल्य कामाच्या अंदाजपत्रकातून/झालेल्या मुल्यांकनातून कमी करणे आवश्यक होते. परंतु विभागाने कंत्राटदाराला मुल्यांकनाची पूर्ण रक्कम अदा केलेली आहे. तरी 2 नग जुन्या सबमर्शीबल पंपाची निर्लेखन मूल्य कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

3) कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 2484 लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे झालेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**3.494 सुरेवाडा-खुर्शिपार प्रा.नळपाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 41, दिनांक 21/02/2015 अन्वये रक्कम रुपये 11,32,713/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मधील परिशिष्ट क (3) नुसार जिल्हा स्तरावर घ्यावयाच्या कामाच्या यादीत प्रा.नळ योजना पाणी पुरवठा विशेष दुरुस्तीचे काम नमूद नाही. त्यामुळे सुरेवाडा-खुर्शिपार येथील योजनेवर 13 वित्त आयोग निधीतून करण्यात आलेले काम नियमबाह्य असून झालेला खर्च रक्कम रुपये 11,32,713/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

2) कामाचा आदेश दिनांक 10/07/2014 ला देण्यात आला, काम पूर्ण करण्याची मुदत 6 महिने आहे. काम दिनांक 08/02/2015 ला झाले. तरी काम विहित मुदतीत पूर्ण झालेले नाही. काम उशिराने पूर्ण झाल्यामुळे विभागाने कंत्राटदाराकडून कोणतीही दंडाची कार्यवाही केलेली नाही. तरी बी 1 करारनाम्यातील अटी नुसार काम उशिराने पूर्ण झालेल्या कालावधीवर दंड वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 209/प्र.क्र.514/वित्त-09, दिनांक 20/11/2009 अन्वये मुद्रांक शुल्काची आकारणी रुपये 300/- करणे आवश्यक असतांना, विभागाने रक्कम रुपये 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेले आहे. तरी कमी भरणा मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 200/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

4) कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तपासली असता, कामात 10 सबमर्शीबल पंप बदलण्यात आले आहे.

सुरेवाडा-खुर्शिपार येथील नळ योजनेवर पूर्वी असलेले जुन्या सबमर्शीबल पंपाची निर्लेखन मूल्य कामाच्या अंदाजपत्रकातून/झालेल्या मुल्यांकनातून कमी करणे आवश्यक होते.परंतु विभागाने कंत्राटदाराला मुल्यांकनाची पूर्ण रक्कम अदा केलेली आहे.तरी 10 नग जुन्या सबमर्शीबल पंपाची निर्लेखन मूल्य कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो 114/प्र.क्र.52/ पा.पु.07, दिनांक 17/10/2014 नुसार सदर काम पूर्ण झाल्यानंतर योजना ग्रामपंचायत / ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समिती / शिखर समिती यांना हस्तांतरित करणे आवश्यक असतांना विभागाने सदर योजना दुरुस्तीनंतर हस्तांतरित केलेली नाही.

**3.495 पालापेढरी पाणीपुरवठा योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत 5 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 42,74,464/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीढ 2009/प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये सदर बांधकामाचे अंदाजपत्रक रुपये 45,05,450/- चे असल्याने एकुण रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याने रुपये 3,600/- चे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 व बांधकाम लेखासंहिता नियम 107 नुसार प्रथम प्रशासकीय मान्यता घेवुन त्यांनंतर तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामात याविरुध्द कार्यवाही केल्याने नियमबाहयता आहे.

3) महाराष्ट्र शासन, सुप्रभा 1315/प्र.क्र.15/पापु 13 पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई दिनांक 04/02/2015 विद्युत जोडणीसाठी रुपये 5,10,580/- खर्च करण्यास मान्यता दिली आहे. शासनाने खर्च करण्यात मान्यता देणे म्हणजे मोघम खर्च नोंदविणे असा होत नाही. सदर विदयुत जोडनीचे अंदाजपत्रक तयार न करता व त्यांस सक्षम अधिका-यांची मान्यता न घेता मोजमाप पुस्तीकेत सरसकट रुपये 5,10,580/- नळ जोडणी म्हणुन नमुद करुन रक्कम प्रदान केली आहे. सदर खर्च लेखामान्य करता येत नाही.

4) तुलनात्मक तक्त्यानुसार रुपये 36,74,181/- (शासकिय अनुदान 90 टक्के) असतांना प्रत्यक्ष काम रुपये 37,34,235/- करण्यात आले आहे. म्हणजेच रुपये 60,054/- चे काम जादा करण्यात आले आहे. निविदा बि-1 क्लॉज 38 व त्याअनुषंगाने क्लॉज 42 नुसार जादा कामास सक्षम अधिका-यांची मान्यता घेण्यात आली नसल्याने तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 124 नुसार कार्यादेश पुस्तक ठेवुन सक्षम अधिका-यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना अशी मान्यता घेतली नसल्याने सदर खर्च मान्य करता येणार नाही.

**3.496 शहापूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,85,814/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शेडूल बी नुसार कामाची किंमत रुपये 14,42,431/- असतांना प्रत्यक्ष काम रुपये 14,85,814/- केले आहे. म्हणजेच रुपये 43,383/- चे जादा काम केले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 124 नुसार कमी / जादा कामासाठी कार्यादेश पुसतक ठेवुन त्यास सक्षम अधिका-यांची लिखीत पनवानगी घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे परवानगी न घेताच संबंधित कंत्राटदाराने स्वमर्जिने जादा काम करुन व विभागाने त्यांचे भुगतान केले आहे. त्यामुळे सदर रक्कम मान्य करता येणार नाही.

2) अर्धसमास पत्र क्रमांक 4, दिनांक 26/05/2017 नुसार सदर बांधकामाची मोजमाप पुस्तीका क्रमांक 263 मागणी केली असता लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

3) वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक आयकर 9006/प्र.क्र.105/कोशा, दिनांक 22/02/2008 व आयकर कायदा 1961 चे कलम 194 (सी) नसार देयकातून 2 टक्के आयकर रुपये 4,720/- कपात केले नसल्याने कंत्रटदारास जादा प्रदान झाले आहे.

4) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324, दिनांक 03/03/2006 नुसार मुल्यवधीत कर 5 टक्के रुपये 74,290/- कपात केला नसल्याने कंत्राटदारास जादा प्रदान झाले आहे.

**3.497 हात पंपाचे सुटे भाग खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2015-2016 मध्ये देखभाल दुरुस्ती या शीर्षाअंतर्गत हात पंपाचे सुटे भाग करीता करीता मे.क्वालीटी पंम्प प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून करारनामा क्रमांक 2 कालावधी (दिनांक 06/05/2015 ते दिनांक 31/03/2016) या कलावधीमध्ये पुरवठा आदेश क्रमांक जिपगो/उप अभियंता(यांत्रिकी)847, दिनांक 11/06/2015 नूसार पुरवठाधारक यांचे इन्वाईस बिल क्रमांक 75, दिनांक 14/07/2015 अन्वये साहित्याचा पुरवठा केलेला असून त्यांना वरील देयकाद्वारे रक्कमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इन्वाईस बिल तथा साहीत्याचे डिलीवरी चालान मध्ये स्टॅन्ड असेम्बली 150 नग प्रती नग दर 1,238/- प्रमाणे असून पुरवठा आदेशा मध्ये दर रुपये 1,248/- दर्शविण्यात आलेले आहे. म्हणजे दोन्ही दरात रूपये 10/- चा तफावत आहे. तसेच वॉटर टॅक् असेम्बली 150 नग चे इन्वाईस मध्ये दर रुपये 549/- प्रती नग व मात्र करारनामा सेडूल मध्ये रुपये 620/- चे दर्शविण्यात आले आहे. तरी दर तफावत याबाबत खातरजमा होणे आवश्यक आहे.

2) खरेदी करण्यात आलेल्या साहीत्याची स्पेशीफीकेशन प्रमाणे तपासणी केल्याचे आढळून येत नाही.

3) साहित्याचे शर्ती व अटीचे अट क्रमांक 9 अन्वये आयकराची कपात ही प्रचलीत दराने करावयाची आहे. मात्र ती करण्यात आलेली नाही. तेव्हा एकूण खरेदी मुल्य 2 टक्के प्रमाणे रूपये 18,782/- ची कपात करुन योग्य त्या शीर्षामध्ये जमा होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग एक-मध्ये उप-विभाग विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मूंबई यांचेकडील दिनांक 04/04/2012 च्या अधीसुचनानुसार एकूण मुल्याच्या 5 टक्के 46,954/- मुल्यवर्धीत करानुसार कपात करणे आवश्यक आहे. मात्र ती कपात करण्यात आलेली नाही तरी ती वसूल करुन शासन शीर्षामध्ये जमा करण्यात यावी.

**3.498 सुरक्षा ठेव रक्कमेचे अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणामध्ये वरील देयकाची तपासणी केली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामिण पाणी पुरवठा विभागामार्फत सुरक्षा ठेव परत करण्याबाबतचे देयक रूपये 1,237/- चे तयार करण्यात आले असतांना त्यामधील रक्कमेत खाडाखोड करून रूपये 11,237/- चे करण्यात आले व कंत्राटदार मे.एस.व्ही.रिवायडींग वर्क्स, भंडारा यांना प्रदान करण्यात आले. त्यामूळे कत्रांटदारास रूपये 10,000/- ने जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चीत होणे आवश्यक आहे.

2) सुरक्षा ठेव परत करण्याबाबतचे देयकामध्ये मागील कपाती संबंधीचे तपशील तपासले असता त्या मध्ये दर्शविण्यात आलेली मोजमाप पुस्तीका क्रमांक सुध्दा खाडाखोड करून बदल करण्यात आले आहे.

3) सुरक्षा ठेव कपात करण्यात आलेल्या देयकाची तपासणी केली असता प्रमाणक 214, दिनांक 18/03/2015 द्वारे देयकातून 1,237/- सुरक्षा ठेव म्हणून कपात करण्यात आली व त्याबाबतची नोंद नमूना 71 चे पान क्रमांक 71 मध्ये नोंद सुध्दा घेण्यात आली आहे. मात्र परत करण्यात आलेल्या रक्कमेची नोंद नमूना 71 मध्ये घेण्यात आलेली नाही.

### 3.499 विंधन विहिर घेवुन हातसपंप बसविणेबाबत शिल्लक कामे

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 06, दिनांक 15/10/2015 अन्वये रक्कम रुपये 3,49,582/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पार्ट ब मधील बाब क्रमांक 7 करीता गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. सदर गौण खनिज खरेदीबाबत व त्यावरील गौण खनिज शुल्काची कपात करण्यात आलेली नाही.

2) घोनाड ग्रामपंचायतीच्या बसस्टॅन्डवर बोअरवेल खोदाई करण्यात आलेली आहे. सदर बोअरवेलकरीता अंदाजपत्रकात हातपम्पाचा ओटा बांधण्याकरीता तरतुद केलेली आहे. असे असतांना फक्त बोअरवेल खुदाई व कसिंग पाईप टाकण्यापर्यंतचेच देयक मंजुर मंजुर करण्यात आलेले आहे. हातपंप ओटा बांधण्याची आवश्यकता होती किंवा कसे याबाबत खात्री पटवुन दाखववी अन्यथा अंदाजत्रकानुसार काम न झाल्याने अपुर्ण कामाचे देयकाची रक्कम मान्य करता येत नाही.

3) सदर ग्रामपंचायतीची मागणी होती किंवा कसे सदर ग्रामपंचायत क्षेत्रात मंजुर हातपंप किती होते. त्यापैकी हातपंप बसविण्याचे काम पुर्ण झाले किंवा कसे याबाबत खात्री ग्रामपंचायतीच्या नोंदविलेल्या नोंदवहीच्या आधारे व सक्षम अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रासह खात्री पटवुन दाखववी.

4) विभागाकडे असलेल्या भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा कनिष्ठ अभियंता यांचेकडुन अंदाजपत्रक करून घेण्यात येवुन त्यास कार्यकारी अभियंता यांनी मंजुरी सुध्दा दिलेली आहे. काम पुर्ण झाल्यानंतर भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचेकडुन सदर हातपंपास पाणी लागल्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु तसे प्रमाणपत्र उपरोक्त ग्रामपंचायतीला दिलेल्या कोणत्याही हातपंपाबाबत पाण्याचा स्त्रोत पातळीबाबत व पाणी उपलब्धतेबाबत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

5) सदर कामाकरीता जिल्हाधिकारी यांचेकडुन दिनांक 24/03/2015 ला प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर आदेशात उपरोक्त कामाबाबत नावे सुध्दा नमुद करण्यात आलेली आहेत. परंतु सदर गावाचे कामाकरीता तरतुद निरंक दाखविण्यात आलेली आहे. परंतु तांत्रिक मंजुरीच्या आधारावर यांत्रिकी विभागाने दिनांक 11/06/2015 व 13/06/2015 सदर कामाचे मुल्यांकन करुन कामे पुर्ण केल्याचे दिसते.

### 3.500 मौजा गाडेगांव, ता.गाठेगांव तालुका कोरपना पाणी पुरवठा विशेष दुरूस्ती.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 30) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 69, दिनांक 31/03/2016 रुपये 6,09,068/- रक्कम रुपये 5,66,435/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कंत्राटदाराकडून रुपये 100/- चे स्टॅम्पपेपरवर केल्याचे दिसते सदर स्टॅम्पपेपर दिनांक 11/03/2016 ची खरेदी दर्शविण्यात आलेली आहे. मात्र सदर खरेदी कोणाचे नावे करण्यात आली याबाबत स्टॅम्पव्हेन्डर यांनी नाव नमुद केल्याचे दिसत नाही. करारपत्रावर संबंधीत कत्राटदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

2) निविदा प्रक्रियेच्या नस्तीची तपासणी केली असता सदर कंत्राटदाराची निविदा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची शिफारसी नंतर मंजुर करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे. त्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी अवलोकनार्थ वित्त विभागाकडे नस्ती पाठविण्यात आलेली आहे. पुष्ठ क्रमांक 6 वर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. परंतु सदर पुष्ठावर दिनांक 29/03/2016 दिनांक दर्शविण्यात आलेली आहे. म्हणजेच सदर दिनांकापर्यंत कामाचे आदेशच देण्यात आलेले नव्हते. सदर दिनांकाला म्हणजेच दिनांक 29/03/2016 ला आदेश जावक नोंदवहीची तपासणी केली असता दिनांक 29/03/2016 लाच कामाचे आदेश दिलेले आहे. असे असतांना व त्याच दिवसापासून काम सुरु झाले असे गृहीत धरल्यास बाब क्रमांक 2 पाणी उपसा दिनांक 29 ते 31 पर्यंत लॉगबूकानुसार 1x5.00 Hpx19.30=96.5 Bhp hrs होतात. व दर रुपये 59.90 प्रमाणे रुपये 5,780/- अंदाजपत्रकीय कमी दराने रुपये 5,679/- करावयास पाहीजे. परंतु मुल्यांकन रुपये 38,935/- कमी दर रुपये 38,254/- अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे बाब क्रमांक 2 आदेशीत दिनांकापूर्वी जादा दिलेली रक्कम रुपये 32,575/- लेखापरीक्षणांस मान्य करता येत नाही.

**3.501 मौजा कोडशी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दुरूस्तीचे काम.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 08, दिनांक 08/10/2015 अन्वये रक्कम रुपये 4,15,094/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या नस्तीची तपासणी केली असता कामाचे आदेश दिनांक 19/12/2013 ला दिले असतांना काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर दिनांक 18/12/2013 उल्लेख असल्याने सदर काम आदेश दिनांकापूर्वीच कसे काय करण्यात आले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर जावक क्रमांक नमुद करीत नसल्याने सदर काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आपले सोईने तारखा नमुद करून सदर प्रमाणपत्राकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

2) बाब क्रमांक 4 करीता पि.व्हिसी. बेन्ड व सॉकेट वाहतुक खर्चाची प्राक्कलनात रुपये 1,260/- ची तरतुद केलेली आहे. सदर बेन्ड व सॉकेटचे मुल्यांकन सुध्दा दर्शवलिले आहे. परंतु मोजमाप मुल्यांकन रुपये 3,002/- नमुद करण्यात आलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकीय किंमत रुपये 1,260/- असतांना जादा मुल्यांकन कसे नमुद करण्यात आले. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. जादा मुल्यांकन लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) कंत्राटदाराने रुपये 100/- चे स्टॅम्पपेपरवर दिनांक 30/12/2013 केलेला आहे. आदेश देण्यापूर्वी करारनामा कां करण्यात आलेला नाही.

4) बाब क्रमांक 13 नुसार सबमर्सिबल पंप प्रादेशिक पाणी पुरवठा नळयोजनेकरीता नविन वापरण्यात आलेले आहे. सदर पंप योग्य दर्जा व गुणवत्तेचे आहे. किंवा कसे याबाबतचे हमी प्रमाणपत्र संबंधीत कंत्राटदाराकडुन घेण्यात आलेले नाही. सदर पंप कोणत्या कंपनीचे घ्यावयाचे याबाबत सुध्दा अंदाजपत्रकात नमुद नाही.

5) बाब क्रमांक 15 करीता चेम्बर बनविण्यात आलेले आहे. सदर एकुण 2 चेम्बरकरीता रुपये 17,796/- ची तरतुद केलेली आहे. सदर चेम्बर बाब क्रमांक 9 शी संबंधीत असल्याने सदर बाबीचे मुल्यांकन सुध्दा केलेले आहे. असे असतांना सदर ज्या ठिकाणी व्हॉल्व बसविले त्या जागेवर चेम्बर बनविण्याची आवश्यकता होती किंवा कसे व्हॉल्व बसविल्यानंतर सदर व्हॉलचे संरक्षणाकरीता चैम्बर तयार करणे अती आवश्यक होते. परंतु बाब क्रमांक 15 पुर्णत: बचत दर्शविली आहे. सदर अनियमिततेबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

6) सदर कत्राटदाराचे आयकर प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

7) सदर कंत्राटदाराचे वॅट प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

8) रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपर करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

**3.502 मौजा जिमलगट्टा, तालूका अहेरी येथील शासकिय आश्रमशाळेत पाणी पूरवठा योजनेचे बांधकाम करणेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** उपविभाग अहेरी अंतर्गत मौजा जिमलगट्टा, तालूका अहेरी, जिल्हा गडचिरोली येथील आश्रमशाळा येथे पाणी पूरवठा योजनेचे बांधकाम करणेकरीता रक्कम रुपये 15,11,050/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा रूपये 21,99,482/- किमतीची असल्यामूळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 मधील कोष्टकानूसार जिल्हा स्तरावरीलही दैनिक व साप्ताहिकात जाहिरात दिलेली नाही. सदर कामाचे ई-निविदा सूचना प्रकाशित झालेबाबतचे वृत्तपत्राचे कात्रण सदर नस्तीत दिसून आले नाही.

2) निविदा दिनांक 30/10/2014 ला उघडलेली असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 मधील परीच्छेद क्रमांक 217 नूसार निविदा उघडले पासून 30 दिवसाचे आत दिनांक 29/11/2014 किंवा त्यापुर्वी कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असतांना दिनांक 12/12/2014 रोजी 13 दिवसाचे विलंबाने कार्यारंभ आदेश दिल्याचे दिसून आले.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक जिपग/बावि/सलेअ/1815/2014, दिनांक 28/04/2014 मधील अटी व शर्ती क्रमांक 2 नियंत्रणाबाहेरील तांत्रिक अडचणी, नैसर्गीक आपत्ती व असामाजीक तत्वामूळे काम बंद असलेबबतची परिस्थिती उद्भवल्याचे अभिलेखे प्रस्तावासोबत जोडलेले नसूनही सदर आदेशानूसार विलंबाबाबत प्रतिदिन रूपये 100/- ते रूपये 400/- दंडात्मक कारवाही केलेली नाही. तसेच करारनामातील क्लॉज नूसार विलंबाबाबत 01 ते 10 टक्के दंडात्मक कारवाहीची अट असतांना पत्र क्रमांक 606, दिनांक 31/03/2016 नूसार 293 दिवसांची अत्यल्प 5 टक्के दंड आकारून मूदतवाढ दिल्याचे दिसून येते.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 चे परीच्छेद क्रमांक 251 नुसार रितसर हस्तांतरीत न केलेल्या कोणत्याही जमिनिवर काम सूरू करू नये असे नमूद असतांना मौजा जिमलगट्टा येथील आश्रमशाळा येथे पाणी पूरवठा योजनेचे केलेले बांधकामाचे जागेबाबत 7/12, मिळकतपत्रिका, वा महसूल विभागाचे मंजूरीबाबतचे कागदपत्र नस्तीसोबत दिसून आले नाही. त्यामूळे खाजगी मालकीचे जागेवर बांधकाम केले किंवा कसे ? याबाबत तसेच सदर जागेचे मालकीहक्काबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

5) बाब क्रमांक 8 भिंत बांधकामावर 1.18 घमी (1.1 घमी - 0.08 घमी) जादा नमूद केल्याने रूपये 4,955/- कंत्राटदारास जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

6) बाब क्रमांक 1 करीता soft soil मध्ये 1.74 घमी आणि बाब क्रमांक 2 करीता hard soil मध्ये 1.74 घमी असे एकूण 3.48 घ.मी. खोदकाम केले असून बाब क्रमांक 9 नूसार rifiling the treanches available excavated stuff…etc नूसार 3.48 घ.मी. जादा काम केल्याचे दिसून येते त्यामूळे खोदमाक करणे व बुजविणे याकामाचे वरील तक्त्यानूसार रूपये 815/- जादा प्रदान झाले आहे.

7) सदर कामावर मोजमाप पूस्तकानूसार 63.9 घ.मी. गौण खनिज वापरल्याचे दिसून येत असून महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा), नियम 2015 आणि महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, अधिसुचना दिनांक 11/05/2015 प्रमाणे गौण खनिजाचे दर प्रति ब्रास रूपये 400/- प्रमाणे रूपये 9,033/- (9.63 घमी @ रूपये 141.36) कपात करणे आवश्यक असतांना रुपये 4,516/- कपात केले असून रूपये 4,517/- कमी कपात केलेले आहेत.

8) महाराष्ट्र शासन, पाणी पूरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1098/प्र.क्र.245/पा.पु. 07, दिनांक 11/01/1999 मधील परीच्छेद क्रमांक 40 नूसार सिमेंट, सलाख, रेती, गिट्टी इत्यादी योग्य व दर्जेदार असलेबाबत स्थानिक अभियांत्रिकी महाविदयालय / तंत्रनिकेतन / प्रयोगशाळा यांचेकडून तपासणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक असतांना जिल्हयाबाहेरील बजाज चंद्रपूर पॉलिटेक्नीक, चंद्रपूर यांचे तपासणी अहवाल जाव क्रमांक 23, दिनांक 16/05/2015 नूसार केल्याचे दिसून येते.

9) कंत्राटदाराने शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नूसार कंत्राटी कामाचा आणि कार्यारंभ आदेशातील अटीनूसार कामगारांचा विमा काढल्याबबतचे अभिलेखे दिसून आले नाही.

10) प्राक्कलन नस्तीसोबत जोडलेले नाही.

**3.503 मौजा नगरम, तालूका सिरोंचा पाणी पूरवठा योजना अंतर्गत अतिरीक्त पाईप लाईन व इतर किरकोळ कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** उपविभाग अहेरी अंतर्गत मौजा नगरम, तालूका सिरोंचा, जिल्हा गडचिरोली येथील अतिरीक्त पाईप लाईन व इतर किरकोळ कामे करणेसाठी रक्कम रुपये 3,08,536/- रकमेचे प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषदा व पंचायत समिती (पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या अभिकरणामार्फत बांधकामे व विकास योजना पार पाडणे व त्यांचे परीरक्षण) नियम, 1964 चे भाग एक 3 (3) (एक) नूसार सदर काम ग्रामपंचायतीकडे सोपविल्यामूळे सर्वसाधारण तांत्रिक ज्ञानापेक्षा अधिक तांत्रिक ज्ञान आवश्यक नसल्याबाबतचे अमलबजावणी यंत्रणेचे प्रमाणपत्र दिसून आले नाही.

2) कंत्राटदार ग्रामपंचायत विक्रीकर विभागात नोंदणीकृत नसल्यामूळे महाराष्ट्र शासन, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राजपत्र असाधारण भाग 1, दिनांक 04/04/2012 अन्वये अशा कत्राटदारांचे देयकातून 5 टक्के मूल्यवर्धीत कर रूपये 15,427/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये 6,171/- कपात केल्यामूळे रूपये 9,256/- शासन महसूलाची हानी झालेली आहे.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक जिपग/बावि/ सलेअ/1815/2014, दिनांक 28/04/2014 मधील अटी व शर्ती क्रमांक 2 नियंत्रणाबाहेरील तांत्रिक अडचणी, नैसर्गीक आपत्ती व असामाजीक तत्वामूळे काम बंद असलेबबतची परीस्थिती उद्भवल्याचे अभिलेखे प्रस्तावासोबत जोडलेले नसूनही सदर आदेशानूसार विलंबाबाबत प्रतिदिन रूपये 50/- ते रूपये 200/- दंडात्मक कारवाही केलेली नाही. तसेच करारनामातील क्लॉज 2 नूसार विलंबाबाबत 10 टक्के पर्यंत दंडात्मक कारवाहीची अट असतांना पत्र क्रमांक 352, दिनांक 03/03/2016 नूसार 276 दिवसांची 4 टक्के दंड आकारून मूदतवाढ दिल्याचे दिसून येते.

4) कंत्राटदाराने शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नूसार कंत्राटी कामाचा आणि कार्यारंभ आदेशातील अटीनूसार कामगारांचा विमा काढल्याबबतचे अभिलेखे दिसून आले नाही.

5) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नूसार तपशिलवार मोजणी असलेले मोजमाप पुस्तकाचे पृष्ठ लाल शाईने कर्णरेषा काढून खोडलेले नाही.

6) सदर कामाचे करारनामा ब-1/63/2014-15 असून मोजमाप पूस्तक आणि मूदतवाढ टिपणीला करारनामा ब-1/228/2014-15 नमूद आहे. करीता याबाबत खात्री करावी.

**3.504 मौजा नरसिंहपल्ली, तालूका सिरोंचा येथील पाणी पूरवठा योजनेचे दूरूस्ती कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** उपविभाग अहेरी अंतर्गत मौजा नरसिंहपल्ली, तालूका सिरोंचा, जिल्हा गडचिरोली येथील पाणी पूरवठा योजनेचे रायझींग मेन, पंपींग मशिनरी, वितरण व्यवस्था व इतर किरकोळ कामे करणेकरिता रक्कम रुपये 8,46,936/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या अभिकरणामार्फत बांधकामे व विकास योजना पार पाडणे व त्यांचे परीरक्षण) नियम, 1964 चे भाग एक 3 (3) (एक) नूसार सदर काम ग्रामपंचायतीकडे सोपविल्यामूळे सर्वसाधारण तांत्रिक ज्ञानापेक्षा अधिक तांत्रिक ज्ञान आवश्यक नसल्याबाबतचे अमलबजावणी यंत्रणेचे प्रमाणपत्र दिसून आले नाही.

2) कंत्राटदार ग्रामपंचायत विक्रीकर विभागात नोंदणीकृत नसल्यामूळे महाराष्ट्र शासन, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राजपत्र असाधारण भाग 1, दिनांक 04/04/2012 अन्वये अशा कत्राटदारांचे देयकातून 5

टक्के मूल्यवर्धीत कर रूपये 42,347/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये 16,939/- कपात केल्यामूळे रूपये 25,408/- शासन महसूलाची हानी झालेली आहे.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक जिपग/बावि /सलेअ/1815/2014, दिनांक 28/04/2014 मधील अटी व शर्ती क्रमांक 2 नियंत्रणाबाहेरील तांत्रिक अडचणी, नैसर्गीक आपत्ती व असामाजीक तत्वामूळे काम बंद असलेबबतची परीस्थिती उदभवल्याचे अभिलेखे प्रस्तावासोबत जोडलेले नसूनही सदर आदेशानूसार विलंबाबाबत प्रतिदिन रूपये 50/- ते रूपये 200/- दंडात्मक कारवाही केलेली नाही. तसेच करारनामातील क्लॉज 2 नूसार विलंबाबाबत 10 टक्के पर्यंत दंडात्मक कारवाहीची अट असतांना पत्र क्रमांक 615, दिनांक 31/03/2016 नूसार 358 दिवसांची 5 टक्के दंड आकारून मूदतवाढ दिल्याचे दिसून येते.

4) मोजमाप पूस्तक क्रमांक 5923 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामूळे मुल्यांकनाबाबत व इतर बाबीची तपासणी करता आली नाही.

5) कंत्राटदाराने शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नूसार कंत्राटी कामाचा आणि कार्यारंभ आदेशातील अटीनूसार कामगारांचा विमा काढल्याबबतचे अभिलेखे दिसून आले नाही.

6) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नूसार तपशिलवार मोजणी असलेले मोजमाप पुस्तकाचे पृष्ठ लाल शाईने कर्णरेषा काढून खोडणे आवश्यक आहे.

**3.505 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना चिंचोली (लिंबाजी) तालुका कन्नड कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,17,56,349/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचा सुधारित अंदाजपत्रक मान्यतेबाबतचा (रुपये 1,54,08,163/- निव्वळ व रुपये 1,67,95,000/- ढोबळ) प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. (मूळ किंमती पेक्षा 33.04 टक्के जास्त). शासन पत्र दिनांक 08/05/2014 नुसार 15 टक्के अधिक पर्यंतच्या योजनांना सुधारित मान्यता देण्याचे अधिकार पाणी पुरवठा विभागास व त्यापुढील योजनांना नियोजन व वित्त विभागाची मान्यता आवश्यक असल्याने प्रस्ताव पुन:श्च तपासून सादर करण्यास कळविले आहे. कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) यांनी सदर योजनेच्या विस्तारित भागात टाकावयाची वितरण व्यवस्था कमी करून रुपये 1,45,14,000/- एवढ्या रकमेचा प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव दिनांक 21/06/2014 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस न घेता तसेच अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता न घेता शासनास सादर केला आहे. केवळ नियोजन व वित्त विभागाची मान्यता टाळण्यासाठी विभागाने हा सर्व खटाटोप केल्याचे या वरून स्पष्ट होते.

2) मुळ अंदाजपत्रकात (अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष, तांत्रिक मान्यता क्रमांक 244, दिनांक 04/06/2011 मधील तरतुदीप्रमाणे) Pipe line (Rising main व Distribution system साठी) च्या चराच्या खोदकामाचा मऊ माती, मुरूम बोल्डर, मृदू खडक व कठीण खडक इत्यादी मधील भूस्तर चाचणी खड्डे घेऊन ठरविण्यात आल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे Rising main साठी रुपये 207.94 प्रती घ.मी. व Distribution system साठी रुपये 183.45 सरासरी दर येतात व त्यास कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. तथापि, कोणतेही सबळ कारण नसताना उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास लाभ देण्याच्या उद्देशाने Pipe line च्या चराच्या खोदकामाचा भूस्तर कोणत्याही प्रकारची क्षेत्रीय तपासणी न करता अधिकतम दराचा भूस्तर सुधारित अंदाजपत्रकात ठेवल्याचे व मंजुरी दिल्याचे व त्याप्रमाणे सुधारित दराने ठेकेदारास देयक अदा केल्याचे निदर्शनास आले आहे. सुधारित अंदाजपत्रकात ठेवलेल्या तरतूदी प्रमाणे Rising main साठी रुपये 362.75 प्रती घ.मी. व Distribution system साठी रुपये 361.10 सरासरी दर येतात. सुधारित अंदाजपत्रकात वाढीव दर ठेवल्यामुळे रुपये 17,65,512/- इतकी जास्तीची रक्कम नियमबाह्यरित्या ठेकेदारास अदा केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच Rising main च्या कामासाठी एकूण 6,130 मीटर लांबीचे pipe वापरण्यात आले.

परंतु, SGS Report मात्र 4,410 मीटर इतक्या लांबीच्या तुळशी pipe चा सादर केलेला आहे. उर्वरित 1,720 मीटर pipe ची गुणवत्ता तपासल्याचे दिसून येत नाही.

3) शासनाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या (पत्र दिनांक 09/07/2014) अट क्रमांक 01 नुसार योजनेच्या पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी सुधारित दरसूची लागू राहणार नाही, असे स्पष्ट निर्देश दिले असल्यामुळे अंतिम अदाई पूर्वी सुधारित दरसूचीनुसार अदाई केली असल्यास ती संबधीतांकडून वसूल करणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 03 नुसार सुधारित योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता देखील घेणे आवश्यक आहे. सदर जास्तीच्या ठेकेदारास अदा केलेल्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करून संबधिताकडून सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती2010/प्र.क्र.34/39,दिनांक 06/08/2010 नुसार रुपये 50 लक्ष व त्यापेक्षा अधिक खर्चाच्या विकास कामांना दिनांक 01/12/2010 पासून ई-निविदा प्रणाली अनिवार्य करण्यात आली असतांना सदर कामासाठी या प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

5) योजनेच्या ठिकाणी एकूण 1,20,000 लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाक्या अस्तित्वात होत्या. मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे त्या वापरणे प्रस्तावित असतांना सुधारित अंदाजपत्रकात अस्तित्वातील एकूण 1,20,000 लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाक्याची क्षमता विचारात न घेता ढोबळमानाने नवीन जादा क्षमतेची टाकी (2,40,000 लिटर्स) प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून शासनावर रुपये 12,30,250/- इतक्या वाढीव रक्कमेचा बोजा पडलेला असून सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौण खनिज/10/1009/सीआर-309/ ख, दिनांक 11/02/2010 नुसार देयकातून रुपये 70.67 घनमीटर दराने रुपये 4,67,926/- एवढी रॉयल्टी वसूल होणे आवश्यक आहे.

7) (अ) ॲप्रोच बंड या उपांगाच्या बाब क्रमांक - 02 “Earth work embackment साठी” चे एकूण परिमाण 6,196.19 घ.मी. साठी रुपये 117.73 प्रति घ.मी. दराने रक्कम रुपये 7,29,477/- चे प्रदान केले आहे. Standard specification व “mode of mesurment for earthwork embackment" नुसार एकूण परीमाणातून 10 टक्के दबाई घट वजा करणे आवश्यक आहे. तथापि, तशी 10 टक्के वजावट न करताच एकूण परिमाणासाठी प्रदान करण्यात आलेले आहे. सबब 10 टक्के दबाई घटाचे परिमाण 619.62 घ.मी.साठी रुपये 117.73 दराने रक्कम रुपये 72,948/- चे जादा प्रदान झालेले आहे. ते संबधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

(ब) मुळ योजनेमध्ये 360 मीटरच्या Approach Bund चे उपांग प्रस्तावित असताना व ज्याचे काम पुर्ण झालेले असताना सुधारित अंदाजपत्रकामध्ये 390 मीटरच्या Approach Road (किंमत रुपये 6 लक्ष) हे उपांग का प्रस्तावित करण्यात आले? याचा बोध होत नाही. कार्यकारी अभियंता यांनी याबाबत आवश्यक पडताळणी केलेली दिसून येत नाही.

8) योजनेच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 6621 पान क्रमांक 32 नुसार MSEB Charges रुपये 4,60,000/- प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि, सदर खर्चाबाबत महाराष्ट्र विद्युत मंडळाचे कोणतेही अभिलेखे (कोटेशन वगैरे) संचिकेत निदर्शनास आले नाहीत. सदर खर्चाबाबत अभिलेखे दर्शवून खात्री पटवावी.

9) योजनेसाठी 10 टक्के लोकवर्गणी रुपये 12,62,420/- जमा करणे आवश्यक असतांना फक्त रुपये 6,41,200/- लोकवर्गणी समितीच्या खात्यावर जमा केली आहे. उर्वरित लोकवर्गणी रुपये 6,21,220/- जमा करणे आवश्यक आहे.

10) सदर योजनेच्या 7 व्या देयकानुसार 2 टक्के रक्कम रुपये 2,41,157/- प्रशासकीय खर्चापोटी अदा करण्यात आली आहे. तथापि, सदर रक्कम कोणत्या बाबीवर खर्च करण्यात आली? याचा तपशील कुठेही नमूद केलेला आढळून आलेला नाही. त्यामुळे सदर रक्कमेच्या विनियोगाबाबत खात्री करता आली नाही.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा8, दिनांक 13/02/2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि, शासकीय विमा

निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 1,26,242/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

13) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसिए 2009/प्र.क्र.108/कामगार7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मुल्याच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेच्या देयकातून रुपये 1,17,563/- कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रुपये 1,17,563/- संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

14) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. उद्भव विहिरीच्या उपांगात बाब क्रमांक 07 व 08 अन्वये Rifilling trenches व Rifilling Boulders या बाबींची रुपये 70.67 प्रति घन मीटर दराने 785.77 घ.मी. ची रुपये 55,530/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

15) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100 टक्के व इतर मोजमापे 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि, यानुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

16) योजनेच्या मूळ प्रस्तावानुसार योजना दिनांक 31/03/2013 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु, अद्यापपर्यंत योजना अपूर्ण आहे. त्यामुळे गावकऱ्यांना वेळीच योजनेचा फायदा झालेला नाही. तसेच विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.506 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना गोलटगाव तालुका व जिल्हा औरंगाबाद कामातील गंभीर अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,54,44,481/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेची आखणी करतांना गोलटगाव येथे अस्तित्वात असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या उद्भव विहिरीचे खोलीकरणासाठी सहाय्यक भू-वैज्ञानिक यांनी सुचविल्याप्रमाणे तरतूद योजनेत करण्यात आलेली नाही. तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 04 नुसार योजनेची इतर कामे हाती घेण्यापूर्वी प्रथम उद्भव विहिरीपासून मिळणाऱ्या पाणी आवक बाबतची खात्री करावी व तद्नंतर अस्तित्वातील विहिरीचे खोलीकरणाचा निर्णय घ्यावा, असे नमूद आहे. तथापि, सदर विहिरीचे खोदकाम केल्याचे दिसून येत नाही.

2) सदरची मूळ योजना (तसेच निविदा) सन 2009-2010 चे दरसूचीवर आधारित आहे. सुधारित योजना सन 2011-2012 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आली असून त्यास शासनाने दिनांक 29/09/2015 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तथापि, सुधारित योजनेस मान्यता मिळण्यापूर्वीच स्विकृत निविदेमधील समाविष्ट कामांसाठी तसेच समाविष्ट नसलेल्या कामांसाठी सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे जास्तीचे दर (सन 2011-2012 च्या दरसूची नुसार) ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. त्यामुळे ठेकेदारास रुपये 20,44,600/- जादा अदाई झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाने या योजनेच्या केलेल्या चौकशी अहवालात सदर रक्कम संबधित ठेकेदाराकडून वसूल करून व या अनियमिततेस संबधित शाखा अभियंता / उप अभियंता यांना जबाबदार धरून संबधित अधिकाऱ्यांकडून व्याजाची रक्कम वसूल करणेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देश दिले असतांना याकडे विभागाने डोळेझाक केल्याचे दिसून येते. तसेच याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

3) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39 दिनांक 06/08/2010 नुसार रुपये 2 लक्ष व त्यापेक्षा अधिक खर्चाच्या विकास कामांना दिनांक 01/10/2010 पासून ई-निविदा प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे व दिनांक 16/01/2013 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रुपये 10 लक्ष करण्यात आली असतांना सदर कामासाठी या प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील “अ” वर्ग दैनिकात व त्या विभागातील “ब” व ज्या जिल्ह्याचे काम असेल, त्या जिल्ह्यातील एका “क” वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

4) निविदेमध्ये Pipe line च्या खोदकामाचे (विशेषतः Rising main) सरासरी दराची तरतूद ठेवण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी स्वतः Pipe line वर प्रत्येक 30 मीटरवर चाचणी खड्डे घेऊन प्रत्येक खड्ड्याच्या ठिकाणी आढळणाऱ्या खोदकामाच्या भूस्तरातील मापे स्वतः नोंदवून घेऊन व तसे प्रमाणित करून, अशा सर्व चाचणी खड्ड्याच्या ठिकाणी आढळणाऱ्या खोदकामाच्या भूस्तरातील मापांचा Weighted average calculate करून त्याप्रमाणे खोदकामाचा सरासरी दर निविदेमध्ये ठेऊन त्यास सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदर प्रक्रिया न अवलंबता ढोबळमानाने कार्यकारी अभियंता यांनी सरासरी दर मंजूर करून त्याप्रमाणे ठेकेदारास देयक अदा केल्याचे आढळून येते.

5) सदर योजनेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकामार्फत दिनांक 16/06/2015 ते दिनांक 17/06/2015 या कालावधीत चौकशी करण्यात आली आहे. या चौकशी अहवालातील सारांश क्रमांक 13 नुसार अ‍ॅप्रोच ब्रिजच्या दोन्ही बाजूस रेलिंग बनविलेली नसतांना मोजमाप पुस्तिकेत (क्रमांक 850 पान क्रमांक 62) याची खोटी मोजमापे नोंदवून ठेकेदारास रुपये 2,38,464/- अदा करण्यात आलेबाबत नमूद आहे. खोटी मोजमापे नोंदवून संबधित शाखा अभियंता व उपअभियांता यांनी शासनाची फसवणूक केली आहे. त्यामुळे त्यांचेवर अहवालात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) सदर योजनेचा दुसरा हप्ता वितरीत करण्यापूर्वी सुधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या 10 टक्के रुपये 22,87,256/- एवढी लोकवर्गणी भरणा करून घेणे आवश्यक असतांना फक्त रुपये 10,60,000/- वर्गणी भरण्यात आलेली आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दिनांक 30/08/2010 नुसार एकूण 10 टक्के लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन दुसरा हप्ता अनुज्ञेय आहे. उर्वरित लोकवर्गणी रुपये 12,86,739/- भरणा करणे आवश्यक आहे.

7) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील तपशिलानुसार Rifilling या बाबीची रूपये 70.67 प्रति घन मीटर दराने 6,033.9 घ.मी.ची रुपये 4,26,416/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे. याशिवाय इतर कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाची सुद्धा रॉयल्टी रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) नुसार देयकातून 2 टक्के आयकर रुपये 3,33,012/- वसूल करणेत आलेला नाही. सदर रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) देयकातून 2 टक्के कार्यकंत्राट कर 2 टक्के रुपये 3,33,012/- वसूल करणेत आलेला नाही. सदर रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार सदर कामाच्या कार्य करारासाठी रुपये 17,200/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असतांना तेवढे मुद्रांक शुल्क घेण्यात आलेले नाही. कमी घेतलेले रुपये 17,200/- मुद्रांक शुल्क संबधिताकडून वसूल करून “0030 मुद्रांक व नोंदणी” या शासन लेखाशीर्षाखाली भरणा होणे आवश्यक आहे.

11) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसिए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, देयकातून तो वसूल करण्यात आलेला नाही. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रुपये 1,66,506/- संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13/02/2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि, शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 1,80,562/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

13) विभागाने तिसरा हप्ता वितरीत करतांना रुपये 9,44,280/- एवढी रक्कम विविध कपातीपोटी कपात केली आहे. तथापि, कपात केलेल्या रकमेतून कपातीच्या रकमा संबधित लेखाशिर्षात जमा करण्यात आलेल्या नाहीत.

14) देयकातून 3 टक्के सुरक्षा अनामतीची (FSD) रक्कम कपात केलेली नाही.

15) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100 टक्के व इतर मोजमापे 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि, या नुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

16) सदर योजनेची मुदत 18 महिने होती. त्यापेक्षा दुप्पट कालावधी योजना पूर्ण करण्यास लागला आहे. तथापि, विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याबाबत ठेकेदारावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.507 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना, शिऊर, तालुका वैजापूर कामातील गंभीर अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,67,50,055/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचा दरडोई खर्च रुपये 2,321.90 एवढा होता, जो शासन निकषापेक्षा जास्त असल्याने दरडोई खर्चाच्या शिथिलतेस शासन मान्यता न घेताच योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

2) तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 7 नुसार वितरण व्यवस्थेची कामे करतांना गावात अस्तित्वात असलेली सुस्थितीतील वितरण व्यवस्था विचारात घेऊन त्याप्रमाणे वितरण व्यवस्था टाकण्याच्या सूचना होत्या. विभागाच्या अहवालानुसार सदर ठिकाणी पूर्वीच्या दोन उद्भव विहिरी असल्याचे त्याचप्रमाणे योजनेच्या नकाशानुसार गावात 07 लक्ष लिटर्सची पूर्वीची पाण्याची टाकी असल्याचे दिसून येते. शासन निर्णय दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 1.4 नुसार ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाची उपाययोजना प्रस्तावित करतांना किमान खर्चावर आधारित विकल्पाचा विचार करण्याच्या सूचना आहेत. अस्तित्वातील उदभव विहिरीस पाणी नसल्याचे जरी गृहीत धरले तरी उर्वरित उपांगाचा वापर न केल्यामुळे रुपये 1,48,69,659/- (अंदाजपत्रकीय तरतूद अधिक वाढीवदरानुसार) एवढा निष्फळ खर्च योजनेवर केल्याचे दिसून येते. त्यामुळे तेवढे अनावश्यक दायित्व शासनावर निर्माण झाले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

3) उपसंचालक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद यांचा अहवाल दिनांक 19/08/2013 नुसार उद्भव विहिरीचे ठिकाण बदलण्यात आले आहे. त्यानुसार योजनेत मोठ्याप्रमाणावर बदल होऊन खर्च वाढला आहे. तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 02 नुसार योजनेचे काम करण्यापूर्वी कार्यव्ययी सर्वेक्षण करावे व त्यानंतर काही फरक होत असल्यास पुन्हा संकल्पने करून सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेण्याचे निर्देश होते. तथापि, सदर निर्देशाचे पालन झालेले नाही. उलट उद्भव निश्चिती पूर्वीच कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

4) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39 दिनांक 06/08/2010 नुसार रुपये 2 लक्ष व त्यापेक्षा अधिक खर्चाच्या विकास कामांना दिनांक 01/10/2010 पासून ई-निविदा प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे व दिनांक 16/01/2013 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रुपये 10 लक्ष करण्यात आली असतांना सदर कामासाठी या प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन

निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील “अ” वर्ग दैनिकात व त्या विभागातील “ब” व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका “क” वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 187 (ए) टीप 6 नुसार कार्यकारी अभियंत्यांनी 10 टक्के पेक्षा जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे. विभागाने बाब निहाय चालू दरसूचीशी तुलना करून दर वाढल्याबाबत शहानिशा केलेली दिसून येत नाही. वाढीव दराचा शासनास प्रस्ताव पाठवतांना दर वाढल्याबाबत मोघमपणे नमूद केले आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाढीव दर प्राप्त झाल्यामुळे दुसऱ्यांदा निविदा मागविणे आवश्यक होते. तसेच वाढीव दर मंजूर केल्यामुळे अतिरिक्त रुपये 36,64,013/- दायित्व शासनावर पडले आहे.

6) सदर योजनेसाठी रुपये 29,21,974/- एवढी लोकवर्गणी भरणे आवश्यक असतांना फक्त रुपये 16,35,104/- वर्गणी भरण्यात आलेली आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दिनांक 30/08/2010 नुसार 5 टक्के लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता अनुज्ञेय आहे. तरी उर्वरित लोकवर्गणी रुपये 12,86,870/- भरणा करणे आवश्यक आहे.

7) सदर योजनेच्या विद्युतीकरणासाठी (11 KV HT Line,63 kv Transformar व 440 volt LT Line) पार्थ इलेक्ट्रिक वर्क्स, औरंगाबाद यांना रुपये 14,94,647/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर विद्युतीकरणास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच संबधितास काम देतांना कोणतीही विहित प्रक्रिया (ई-निविदा वगैरे) करण्यात आलेली नाही.

8) तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 4 नुसार दोन विहिरीपैकी प्रथम एक विहीर घेऊन तिची आवक क्षमतेची चाचणी घेऊन तदनंतरच दुसरी विहीर घेण्यात यावी, असे निर्देश होते. तथापि दोन्ही विहिरींचे कामे सोबतच केल्याचे मोजमाप नोंदवहीतील नोंदीवरून दिसून येते.

9) देयकातून 2 टक्के आयकर व 2 टक्के कार्यकंत्राट कर एकूण रुपये 14,70,000/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. तथापि, फक्त रुपये 3,75,089/- आयकर व कार्यकंत्राट कर भरल्याबाबतचे चलन संचिकेत निदर्शनास आले. तरी उर्वरित रक्कम रुपये 10,94,911/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार सदर कामाच्या कार्य करारासाठी रुपये 42,900/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असतांना फक्त रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे. कमी घेतलेले रुपये 42,800/- मुद्रांक शुल्क संबधिताकडून वसूल करून “0030 मुद्रांक व नोंदणी” या शासन लेखाशीर्षाखाली भरणा होणे आवश्यक आहे.

11) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसिए 2009/प्र.क्र.108/कामगार7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, देयकातून तो वसूल करण्यात आलेला नाही. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रुपये 3,61,776/- संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13/02/2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि, शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 4,37,554/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

13) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.-109/रा.म.-2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या 1000 मीटर DIK-9 पाईपचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले

साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. चाचणी अहवालाशिवाय केलेली अंतीम अदाई अनियमित आहे.

पावती क्रमांक 1801 ते 1917 अन्वये एकूण 115 गावकऱ्यांनी लोकवर्गणी जमा केल्याच्या पावत्या संचिकेत संलग्न करण्यात आलेल्या आहेत. तथापि, एकाही पावतीवर वर्गणी देणाऱ्याची स्वाक्षरी आढळली नाही.

14) सदर कामाचे मोजमापे मोजमाप पुस्तिका क्रमांक 141 व 231 वर नोंदविण्यात आलेली आहेत. तथापि, सदर मोजमाप पुस्तिका तसेच जिल्हा दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे नोंदविलेली मोजमापे व दराबाबत पडताळणी करता आली नाही.

15) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. उद्भव विहिर क्र. 01 व 02 या उपंगात बाब क्रमांक 13 व Rising main या उपंगात बाब क्रमांक 14 Refilling trenches या बाबींची रूपये 70.67 प्रति घनमीटर दराने 7642 घनमीटर ची रूपये 5,40,060/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून "853 गौण खनिज" या शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

16) ॲप्रोच बंड या उपंगात उद्भव विहिर ते रोड व उद्भव विहिर ते जंक्शनसाठी वापरलेल्या 10375 घनमीटरची रूपये 70.67 दराने रूपये 7,33,201/- एवढी रॉयल्टीची रक्कम तसेच पाण्याची टाकी, उद्भव विहिर व पंप हाऊस बांधकामासाठी वापरलेल्या गौण खनिजाची रॉयल्टीची रक्कम वसूल करून "853 गौण खनिज" या शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

**3.508 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना मौजे शेंदुरवादा, तालुका गंगापूर कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,16,51,341/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39 दिनांक 06/08/2010 नुसार रुपये 2 लक्ष व त्यापेक्षा अधिक खर्चाच्या विकास कामांना दिनांक 01/10/2010 पासून ई-निविदा प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे व दिनांक 16/01/2013 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रुपये 10 लक्ष करण्यात आली असतांना सदर कामासाठी या प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

2) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 202 व सार्वजनिक बांधकाम शासन निर्णय क्रमांक सीएटी10/2006/प्र.क्र.133/इमारती-2, दिनांक 02/11/2006 नुसार रुपये 50 लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या निविदा प्रसिध्दीसाठी प्रथमवेळी 25 दिवसांचा कालावधी निश्चित केला आहे. तथापि, सदर प्रकरणी फक्त 06 दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202 नुसार टीप-2 नुसार निविदा विक्रीची शेवटची तारीख आणि निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख यात 07 दिवसांचे अंतर असणे आवश्यक आहे. तथापि, सदर प्रकरणी निविदा विक्रीसाठी केवळ सहा दिवस देण्यात आले आहेत व निविदा विक्रीच्या अंतीम दिवशी लगेच निविदा स्विकृती ठेवण्यात आली आहे. निविदा प्रसिध्दी / विक्री व स्विकृतीचा कालावधी पाहता विशिष्ट ठेकेदारांना कामे देण्यासाठी पुरसा कालावधी देण्यात आलेला नसल्याचे यावरून स्पष्ट होते. ही अतिशय गंभीर बाब आहे.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 187 (ए) टीप 6 नुसार कार्यकारी अभियंत्यांनी 10 टक्के पेक्षा जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे. विभागाने बाब निहाय चालू दरसूचीशी तुलना करून दर वाढल्याबाबत शहानिशा केलेली दिसून येत नाही. वाढीव दराचा शासनास प्रस्ताव पाठवतांना दर वाढल्याबाबत मोघमपणे नमूद केले आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाढीव दर प्राप्त झाल्यामुळे दुसऱ्यांदा निविदा

मागविणे आवश्यक होते. तसेच वाढीव दर मंजूर केल्यामुळे अतिरिक्त रुपये 21.44 लक्ष दायित्व शासनावर पडले आहे.

5) विभागाच्या सर्वसाधारण अहवालातील मुद्दा क्रमांक 07 सदर ठिकाणी जुनी पाणी पुरवठा योजना अस्तित्वात होती. (पाण्याची टाकी, उद्भव विहीर, वितरण वाहिनी वगैरे) तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 04 नुसार काम हाती घेण्यापूर्वी योजनेच्या सर्व उपांगाचे कार्यान्वयन सर्वेक्षण करण्याची व त्यानुसार आलेले संकल्पन व मंजूर संकल्पन पडताळण्याचे निर्देश होते. तथापि, अशी पडताळणी न केल्यामुळे तसेच सदर योजनेचे काम करतांना जुन्या योजनेचा उपयोग न केल्यामुळे अनावश्यक खर्च सदर योजनेवर केल्याचे दिसून येते.

6) उद्भव विहीर क्रमांक 01 बाब क्रमांक 02 अन्वये 1.5 ते 6.00 व 18 ते 19.50 मीटर एवढ्या बाबीचे (रुपये 3,51,953/-) तसेच उदभव विहीर क्रमांक 02 बाब क्रमांक 02 अन्वये 1.5 ते 4.50 व 18 ते 19.50 मीटर एवढ्या बाबीचे (रुपये 2,99,245/-) अतिरिक्त खोदकाम करण्यात आले आहे. अतिरिक्त खोदकामास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

7) सदर योजनेचे दरपृथःकरण करतांना Sugar Cane भागाचे 5 टक्के दर अधिक धरून दर पृथःकरण करण्यात आले आहे. तथापि, सदर योजना Sugar Cane भागात असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाही.

8) वाढीव दराबाबतचे शासन पत्र दिनांक 07/04/2015 मधील अट क्रमांक 05 नुसार मूळ मंजूर किंमतीपेक्षा योजनेच्या वाढीव किंमतीच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी व सुधारित योजना मंजूर झाल्याशिवाय योजनेच्या मूळ मंजूर किंमतीपेक्षा अधिक खर्च करू नये. तथापि, सुधारित मंजुरी घेण्यात आलेली नाही. सुधारित मंजुरी न घेता केलेला वाढीव खर्च अनियमित आहे.

9) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही.

10) सहायक भू-वैज्ञानिक ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा औरंगाबाद यांचे पत्र दिनांक 29/06/2015 नुसार दोन्ही विहिरींची खोली प्रत्येकी 18 मीटर असल्याचे नमूद असतांना मोजमाप पुस्तिकेवर (क्रमांक 76 पान क्रमांक 03 व 04) 19.50 मीटर खोदकाम केल्याचे दर्शविले आहे. खोटी मापे नोंदविल्यामुळे अनुक्रमे रुपये 23,554/- व रुपये 75,737/- असे एकूण रुपये 99,291/- जादा अदाई ठेकेदारास झाली आहे. सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

11) सदर गावाची प्रकल्पित लोकसंख्या 8106 गृहीत धरून योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. एवढ्या लोकसंखेस मानसी 40 लिटर्स प्रमाणे 3.26 लक्ष लिटर्स पाण्याची आवश्यकता असतांना सहायक भू-वैज्ञानिक यांच्या दिनांक 29/06/2015 च्या अहवालानुसार दोन्ही विहिरी मिळून 1.5 लक्ष लिटर्स पाणी उपलब्ध होईल असे नमूद आहे. म्हणजे पुरेसा उद्भव नसतांना योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

12) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसिए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. दुसऱ्या धावत्या देयका अखेर रुपये 1,09,407/- कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रुपये 1,09,407/- संबधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

13) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी 09/05/प्र.क्र.381/इमारती-2, दिनांक 15/05/2007 नुसार रुपये 2 कोटी वरील कंत्राटासाठी कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये 10,000/- निश्चित करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकरणी कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये 5,000/- ठेवण्यात आली होती. सदर कामासाठी एकूण 01 तीन निविदा विक्री झाल्याने रुपये 5,000/- चे नुकसान झाले आहे. सदर रक्कम संबधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

14) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.-109/रा.म.-2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या 930 मीटर पीव्हीसी पाईपचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले पाईप विनिर्देशानुसार असल्याचे प्रमाणित होत नाही.

15) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100 टक्के व इतर मोजमापे 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि, यानुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

16) तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 18 नुसार लीड चार्जेसची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Quarry Chart प्रमाणे करून घेण्याच्या सूचना असतांना अशी तपासणी केलेली दिसून येत नाही.

17) निविदेमध्ये Pipe line च्या खोदकामाचे (विशेषतः Rising main) सरासरी दराची तरतूद ठेवण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी स्वतः Pipe line वर प्रत्येक 30 मीटरवर चाचणी खड्डे घेऊन प्रत्येक खड्ड्याच्या ठिकाणी आढळणाऱ्या खोदकामाच्या भूस्तरातील मापे स्वतः नोंदवून घेऊन व तसे प्रमाणित करून, अशा सर्व चाचणी खड्ड्याच्या ठिकाणी आढळणाऱ्या खोदकामाच्या भूस्तरातील मापांचा Weighted average calculate करून त्याप्रमाणे खोदकामाचा सरासरी दर निविदेमध्ये ठेवून त्यास सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदर प्रक्रिया न अवलंबता ढोबळमानाने कार्यकारी अभियंता यांनी सरासरी दर मंजूर करून त्याप्रमाणे ठेकेदारास देयक अदा केल्याचे आढळून येते.

**3.509 मौजे ब्रम्हपुरी तालुका जाफ्राबाद येथील राष्ट्रीय पेयजय योजनेतून नळाव्दारे पाणीपुरवठा योजनेतील कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,49,293/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामास दिनांक 16/09/2006 ची प्रशासकीय मान्यता व दिनांक 16/02/2007 ची सन 2006-2007 च्या दरसूचीसह तांत्रिक मान्यता असतांना 8 वर्षाने विलंबाने काम पूर्ण होत आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार मुदत वाढीबाबत केलेली कार्यवाही किंवा दंड आकारणीबाबत संचिकेमध्ये माहिती नसल्याने मुदतवाढ मंजूर केल्याबाबतचे सविस्तर अनुपालन सादर करावे.

2) समितीने कामासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी हे शासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा जिल्हा परिषद मान्यता प्राप्त यादीतील उत्पादक / पुरवठादाराकडून भारतीय मानक संस्थेच्या निकषानुसार प्रमाणित असलेल्या स्पेसिफीकेशननुसार केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 15/12/2006 तसेच शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नुसार रॉयल्टीची परिगणना करुन रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4) लेखा संहिता नियम 1968 चे नियम 161(1) नुसार कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणीपुरवठा, जालना यांनी 5 टक्के कामाची तपासणी करुन दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) तांत्रिक मंजूरी आदेशातील अटीनुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस1099/प्र.क्रमांक 54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये कामाच्या ठिकाणी परिच्छेद ब प्रमाणे फलकावर संपूर्ण कामाची माहिती लिहून लावण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना विभागाने शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता बोर्ड लावला नाही.

6) महाराष्ट्र शासन, निर्णय ग्रा.पा.पु.-1000/प्र.क्रमांक /90/पापु07, दिनांक 03/09/2001 तसेच आर्थिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 9 नुसार समितीमार्फत रुपये 1,000/- व त्यावरील केलेल्या खर्चाची अदाई रेखांकित धनादेशाने न करता ती रोखीने अदा केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी गंभीर वित्तीय अनियमितता झाली आहे.

7) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्रमांक 24/33 दिनांक 22/12/2000 नुसार कामाची मोजमाप पुस्तिका नोंदविणारा अभियंता, तपासणी करणारा उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी करणे अनिवार्य असतांना मात्र अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. याबाबत दैनंदिनी दर्शवून केलेली नोंदणी व दिनांक निहाय तपासणी याबाबत अनूपालन करावे.

**3.510 टंचाई निवाराणार्थ नळयोजना अंतर्गत विशेष दुरुस्ती नळपाणी पुरवठा योजना**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,08,405/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाचे ठेकेदारांचे आयकर भरणा कागदपत्रे, पॅनकार्ड छायांकीत छायाप्रत यंत्रसामुग्रीची यादी, इत्यादी कागदपत्रांअभावी फेरनिविदा मागविलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार खरेदी साहित्याच्या दर्जाची प्रयोगशाळेकडून तपासणी करुन विहीत गुणवत्तेची खात्री करण्यात आली नाही.

3) तांत्रिक मंजूरी आदेशातील अटीनुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये कामाच्या ठिकाणी परिच्छेद ब प्रमाणे फलकावर संपूर्ण कामाची माहिती लिहून लावण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना विभागाने शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता बोर्ड लावला नाही.

4) आर्थिक मान्यता व कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार सदरचे काम दिनांक 25/06/2014 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे काम पूर्ण आले नाही. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार मुदतवाढीबाबत केलेली कार्यवाही किंवा दंड आकारणीबाबत संचिकेमध्ये माहिती नसल्याने मुदतवाढ मंजूर केल्याबाबतचे सविस्तर अनुपालन सादर करावे.

5) लेखा संहिता नियम 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा, जालना यांनी 5 टक्के कामाची तपासणी करुन दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक 15/12/2006 तसेच शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नुसार रॉयल्टीची परिगणना करुन रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक बीजीडी 2005/प्र.क्रमांक 324/इमारत-2, दिनांक 03/03/2006 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक असतांना ठेकेदाराकडून 2 टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कर वसूल केलेला आहे. तरी कमी वसूल केलेला मुल्यवर्धीत कर आपल्या स्तरावरुन वसुल करण्यात यावा.

**3.511 जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत नळाद्वारे पाणी पुरवठा कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 68 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 6,09,14,837/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम 166 नुसार कामाचे मोजमापे मोजमाप पुस्तिकेत करुनच देयके अदा करणे आवश्यक आहे. परंतु, अनुक्रमांक 2,4,7,9,10,13,14,17, 21,24,29,31,32,34,44,45,48,50,51,52,54,58,59,62,68 इत्यादी कामाच्या मोजमाप पुस्तीका लेखापरिक्षणास उपलब्ध केल्या नाही. सदरील कामाच्या संचिकेमध्ये मुल्यांकन नोदवहीच्या झेरॉक्स सत्यप्रतीवरुन देयके आदा केल्याचे दिसुन आले. तसेच अनुक्रमांक 2,4,22,25, 35,39,43,46,61,65,66 चे प्रशासकिय मान्यता आदेश व तांत्रिक मान्यता आदेश व मुल्यांकन संचिकेमध्ये अढळून आले नाहीत.

2) योजनेच्या विहिरीची व पाण्याच्या टाकीची जागा ग्रामपंचायतच्या मालकीची असल्याबाबत किंवा संबंधीताचे दानपत्र घेतलेबाबतचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आले नाहीत.

3) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपरोक्त तपशिलानुसार अनुक्रमांक 12 कारेगव्हाण, अनुक्रमांक 15 कांबी मजरा, अनुक्रमांक 16 समनापूर, अनुक्रमांक 17 बेलगाव, अनुक्रमांक 20 काळेवाडी, अनुक्रमांक 24 भूरेवाडी, अनुक्रमांक 26 पाडळसिंगी, अनुक्रमांक 47 खंडाळा, अनुक्रमांक 63 खांडवी यांची सन 2011 या वर्षातील प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी आहे. तसेच अनुक्रमांक 68 बेनसूर पाणी पुरवठा योजनेची सन 2008 ची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी आहे, असे असताना सदरील कामे अपूर्ण स्थितीत आहेत. सदरील कामे मुदतबाहय झाले असुन सदरील कामावर विलंबासाठी दंडात्मक कार्यवाही झालेली नाही. विलंब झालेल्या योजनेस मुदतवाढ दिल्याबाबतचे पत्र कोणत्याही संचिकेत आढळून आले नाही. सदरील योजनेवर शासनाचा खर्च होवूनही जनतेस पाणी पुरवठा न होणे वितरीत केलेली रक्कम दिर्घकालावधीकरीता गुंतवून राहणे, याबाबतच्या नुकसान भरपाईकरीता ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही. यावरुन शासन आदेशाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झालेली नाही.

4) प्रथम आग्रिम दिल्यानंतर झालेल्या कामाचे मुल्यांकन करुनच द्वितीय अग्रिम देणे आवश्यक आहे. याबाबत योग्य कार्यवाही झालेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 1008, दिनांक 11/01/1999 मधील परिच्छेद क्रमांक 40 नुसार वापरलेल्या साहित्याची प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

6) उपरोक्त कामातील अनुक्रमांक 01 मधील कामाचे प्रदान रक्कम मुल्यांकनापेक्षा रूपये 3,25,628/- ने जादा आहे, सदर जादाची रक्कम रूपये 3,25,628/- अंतिम अमान्य करण्यात येते.

**3.512 ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील विविध योजनेत झालेल्या अपहाराबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 43 कामांवर रक्कम रूपये 14,99,55,251/- वितरीत करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक गस्वप्र/2007/वित्तीय सल्लागार/प्र.क्र.1/पापु11, दिनांक 06/12/2007 अन्वये नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राप्त शासकीय अनुदान व लोकवर्गणी हा जनतेचा पैसा असल्याने होणारा खर्च काटेकोर व आर्थिक स्थितीचे पालन करुन सदरील खर्च पारदर्शक केला पाहिजे. या करिता शासनाने वेळोवेळी शासन परिपत्रकाव्दारे सुचना दिलेल्या आहेत. सदर सुचनांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची असतांना समितीने अपहार करुन देखील त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये एकुण 43 योजना मध्ये अपहार झाल्याचे दिसुन येते. सदरील एकुण 43 योजनेमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाने दिलेल्या माहिती नुसार एकुण रक्कम रुपये 4,63,09,209/- इतका अपहार झाल्याचे दिसुन येते. सदरील कामास सन 2006-2007 पासुन मंजूरी मिळालेली आहे. तसेच सदरील कामे अपूर्ण व रखडलेले आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाने संबंधीत ग्रामीण पाणी पुरवठा समितीवर जिल्हा परिषदेमार्फत एफआयआर दाखल केलेले आहेत. यापुढे ग्रामीण पाणी पुरवठा समितीने अपहारीत रक्कमेच्या वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली? हे लेखापरिक्षणास कळू शकले नाही. सदरील योजना पूर्ण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना व पर्यायी व्यवस्था करण्यात आल्या? याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापायो-1108/प्र.क्र.32/पापु 07, दिनांक 18/03/2008 परिच्छेद क्रमांक 8 नुसार कामाचे तीन टप्पे पाहुनच अनुदानाचे वाटप करण्यात येईल असे असतांना त्या-त्या टप्प्यातील काम पुर्ण झाले, तरच दुसरा टप्प्या हप्ता देण्यात येईल. परंतु, सदरील टप्प्याचे काम पुर्ण झालेले नसतांना दुस-या टप्प्याचे अनुदान वितरित केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 36(1) नुसार जिल्हा परिषद पंचायत समितीच्या अपहार, गैरव्यवहार याबाबतची माहिती संवैधानिक लेखापरीक्षकास सादर करणे आवश्यक आहे, तसेच नियम 36(2) अन्वये चौकशी पुर्ण झाल्याचा अहवाल विभागीय आयुक्त, संवैधानिक लेखापरिक्षक यांना कळविणे आवश्यक आहे. परंतु, सदर प्रकरणी अशी कार्यवाही झालेली नाही.

5) विवरणपत्रानुसार एकूण 43 पाणी पुरवठा समित्यांकडे रुपये 4,63,09,209/- इतकी रक्कम अपहारित असुन अद्याप वसुली झालेली नाही.

6) पाणीपुरवठा योजनेच्या निधीचा गैरवापर केल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्रमांक ग्रापापूवि/जिपबीड/काअ/3061, दिनांक 25/10/2012 अन्वये संबंधीत समितीचे अध्यक्ष व सचिव यांचे 7/12 वर अपहारित रक्कमेचा बोजा टाकणेबाबत सुचित केले आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही.

7) योजनेच्या नियमानुसार योजना मंजूर झाल्यानंतर 18 महिन्याचे आत योजनेचे काम पुर्ण होणे आवश्यक असतांना योजना पुर्ण न होता मुदतबाह्य झालेल्या आहेत व अद्याप सदरच्या योजना झालेल्या नाहीत.

**3.513 टंचाई अंतर्गत नळ पाणी पुरवठा विहीरीचे खोलीकरण व दुरुस्तीचे कामात केलेली अनियमीतताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,45,405/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पान्हेरा, सावंगी पी.सी, वडी, येथील नळपाणी पुरवठा योजनेतंर्गत विहीरीचे खोलीकरण करणेसाठीच्या कामासाठी विहीरीचे सर्वेक्षण करुन सद्याची विहीरीची खोली किती आहे, गाळ किती आहे, किती खोलीकरण करणे अपेक्षीत आहे, गावांत किती विहीरी आहेत, विहीरीमध्ये पाणी आहे अथवा कोरडी आहे, विहीरीचे तळातील खडकांचा प्रकार, यावरुन घ्यावयाचे कामाबाबतचा स्थळ पाहणी अहवाल संचिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे काम सुरु करण्यापुर्वी विहीरीची स्थिती व काम केल्यानंतरची स्थिती याबाबतची तपासणी करता आली नाही.

2) सोस विहीर खोलीकरणाचे काम करणेसाठी सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवाल प्रपत्र-ब दिनांक 28/02/2015 नुसार विहीर कोरडी असल्याचे नमुद आहे. परंतु, बाब क्रमांक 2 वर 295 BHK पाणी उपसा केल्याचे दर्शवुन रुपये 17,700/- रक्कम मंजुर करण्यात आली आहे. विहीर कोरडी असतांना पाणी उपसा कसा होऊ शकतो? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) कंठेश्वर विहीर खोलीकरणाचे काम करणेसाठी सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवाल प्रपत्र-ब दिनांक 29/01/2015 नुसार विहीरीची सध्याची खोली 15 मीटर असुन 3 मीटर खोलीकरणे करणे अपेक्षीत असल्याचा अहवाल आहे. परंतु, मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 2 वर 13.50 ते 15.00 मी. 9.81 क्यु.मी. विहीर खोलीकरण केल्याचे दर्शवुन रुपये 9,496/- रक्कम मंजुर केली. तसेच बाब क्रमांक 1-Desilting the Supply Well intakewell चे 12.00 ते 13.50 (14.13 क्यु.मी.) व 13.50 ते 15.00 मी. (28.26 क्यु.मी.) काम केल्याचे दर्शवुन रुपये 9,269 + 19,075 रक्कम मंजुर केली. स्थळ पाहणी अहवालात विहीरीची काम करण्यापुर्वीची खोली 15.00 मीटर असल्याचे नमुद असतांना 12.00 ते 15.00 मीटर काम करण्यात आलेचे दर्शविले. याचाच अर्थ, सहाय्यक भु-वैज्ञानिक यांच्या स्थळ पाहणी अहवालाच्या अनुषंगाने प्रत्यक्षात काम झालेले नाही. त्यामुळे एकतर भु-वैज्ञानिक यांचा स्थळ पाहणी अहवाल अथवा प्रत्यक्षात झालेले काम यापैकी एक बाब संशयास्पद आहे. तसेच सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवालानुसार पाण्याअभावी नळ योजना बंद असा तपशील नोंद आहे. परंतु, बाब क्रमांक 3 वर 500 BHK पाणी उपसा केल्याचे दर्शवुन रुपये 30,000/- रक्कम मंजुर करण्यात आली आहे. विहीर कोरडी असतांना पाणी उपसा कसा होऊ शकतो? याबाबत खुलासा करावा.

4) नरळद विहीर खोलीकरणाचे काम करणेसाठी सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवा प्रपत्र-ब दिनांक 22/01/2015 नुसार सार्वजनिक 2 विहीरी असुन त्यांची खोली 9.20 व 10 मीटर असल्याचे नमुद केले असुन ज्या विहीरीचे खोलीकरण करावयाचे, तिची सद्याची खोली 5.20 मीटर असुन गाळ काढणे व 3 मीटर खोलीकरणे करणे अपेक्षीत असल्याचा अहवाल आहे. परंतु, मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 6 वर Excuvation sec.in hard material comprising of hardwork, manjra rock etc. चे काम 7.50 ते 9.00 (23.75 क्यु.मी.) रुपये 15,295/- व 9.00 ते 10.50 मीटर (35.62 क्यु.मी.) रुपये 23,687/- चे काम केल्याचे दर्शवुन रक्कम मंजुर करण्यात आली. भु-वैज्ञानिकांचे अहवाल विहीरीची खोली अनुक्रमे 9.20 व 10.00 मीटर असुन सध्या 5.20 मीटर असुन उर्वरीत गाळ काढण्याचे काम करण्याचे अभिप्राय आहेत. तरी 7.50 ते 9.20 पर्यत बाब क्रमांक 6 मध्ये कठीण व मांजरा खडक काढण्याचे काम कसे केले? याची खात्री पटु शकत नाही. तसेच उपविभागीय अधिकारी,

ग्रामीण पाणी पुरवठा, उ.वि.सेलू यांचे विवरणपत्र 3 पाहणी अहवालानुसार सदरचे विहीरीचे दुरुस्तीसाठी सन 2012-2013 मध्ये गाळ काढणे रुपये 53,729 + कॉनक्रीट टाकणे रुपये 20,812 + पाईपलाईन दुरुस्ती रुपये 13,716 एकूण रुपये 1,72,452/- खर्च अलहिदा करण्यात आलेला असुन सन 2015-2016 मध्ये पुन्हा तीन वर्षाचे आंतच विहीर खोलीकरण व गाळ काढण्याचे काम प्रस्तावित केले आहे. तीन वर्षात इतका गाळ जमा होऊ शकेल काय किंवा सन 2012-2013 मध्ये गाळ काढण्याचे काम योग्य झाले नाही काय? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवालानुसार विहीरी कोरडया असल्याचा तपशील नमुद आहे. परंतु, बाब क्रमांक 7 वर 550 BHK पाणी उपसा केल्याचे दर्शवुन रुपये 33,000/- रक्कम मंजुर करण्यात आली आहे. विहीर कोरडी असतांना पाणी उपसा कसा होऊ शकतो? याबाबत खात्री होऊ शकत नाही. याबाबत खुलासा करावा.

5) परिशिष्ट क्रमांक 2 मधील अनुक्रमांक 13 ब्राम्हणगांव विहीर खोलीकरणाचे काम करणेसाठी सहाय्यक भु-वैज्ञानिक यांचा पाहणी अहवाल प्रपत्र-ब दिनांक 04/12/2015 नुसार विहीर बुजली असुन सध्याची खोली 18.00 मीटर असुन 8.00 मीटर खोलीकरणाचे अभिप्राय दिलेले आहेत. विहीर बुजली असल्याचे नमुद आहे. परंतु, बाब दिनांक 23/02/2016 ते 09/03/2016 या कालावधीत 480 BHK (30BHK प्रति दिन पाणी) उपसा केल्याचे दर्शवुन रुपये 28,800/- रक्कम मंजुर करण्यात आली आहे. विहीर बुजलेली असतांना पाणी उपसा कसा होऊ शकतो? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) नागापुर नळयोजना विशेष दुरुस्तीचे काम केले आहे. या कामासाठी उपविभागीय अभियंता यांचा पाहणी अहवालातील विवरणपत्र 3 नुसार सन 2012-2013 मध्ये विहीर खोलीकरणाचे काम केले असुन रुपये 60,000/- खर्च करण्यात आलेला आहे. परत याच योजनेवर सन 2015-2016 मध्ये रुपये 1,47,410/- खर्च करण्यात आलेला आहे. वारंवार खर्च करण्याबाबत खुलासा करावा. तसेच भु-वैज्ञानिकांचा पाहणी अहवालानुसार विहीरीची खोली 17 मीटर असुन 5 मीटर खोलीकरण करण्याची शिफारस केली आहे. परंतु, मोजमाप पुस्तिकेतील पान क्रमांक 41 वरील मापांच्या नोंदीनुसार खोलीकरणाचे काम 16.50 मी. ते 18.00 मीटर काम केल्याचे दर्शवुन रुपये 21,760/- रक्कम मंजुर केली. येथे 0.50 मीटरचे जादा रक्कम उचल करण्यात आली आहे. तसेच अंदाजपत्रकामध्ये Dewatering साठी 300 x @ 60 = रुपये 18,000/- ची तरतुद केलेली असतांना 450 x @ 60 = रुपये 27,000 रक्कम उचल केली. अंदाजपत्रकात विहीर दुरुस्तीसाठी रुपये 1,36,180/- व Rising Main Repair साठी रुपये 13,060/- एवढी तांत्रिक मान्यता असतांना मोजमाप पुस्तिकेनुसार रुपये 1,21,640/- व रुपये 25,770/- खर्च नोंदविला आहे. म्हणजेच अंदाजपत्रकाप्रमाणे काम झालेले नसतांना व कामात बदल/वाढ होण्याबाबत कोणतीही मान्यता घेण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा.

7) ठोळा, पेडगांव, ब्राम्हणगांव येथील कामांच्या मोजमाप पुस्तिका तसेच दुर्डी व नागापुर या कामांची अंदाजपत्रक, संचिका व मोजमापन पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार काम झाले किंवा कसे, याबाबतची तपासणी करता आली नाही.

8) विहीरीचे खोलीकरण करतांना खोदकाम करावे लागत असुन त्याबाबतची रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. परंतु, प्रदानीत प्रमाणकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

**3.514 नळ योजना विशेष दुरुस्तीचे कामात केलेली अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 30,15,806/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) डासाळा:- 1) येथील कामासाठी ग्राम पंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 30/03/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. त्यानुसार त्यांना आदेश क्रमांक 27, दिनांक 08/04/2015 अन्वये काम करणेसाठी कार्यारंभ आदेशसुध्दा देण्यात आलेले आहेत. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 21/03/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली? (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा

5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम मंजीरी ट्रेडर्स यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट मंजीरी ट्रेडर्स यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली. (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही.

2) चिखलठाणा:- 1) येथील कामासाठी ग्राम पंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 09/04/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. त्यानुसार त्यांना आदेश क्रमांक 57, दिनांक 15/04/2015 अन्वये काम करणेसाठी कार्यारंभ आदेशसुध्दा देण्यात आलेले आहेत. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 28/03/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली. (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा 5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम मंजीरी ट्रेडर्स यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट मंजीरी ट्रेडर्स यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली. (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही.

3) कानसुर तांडा:- 1) येथील कामासाठी ग्रामपंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 01/04/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. त्यानुसार त्यांना आदेश क्रमांक 21, दिनांक 08/04/2015 अन्वये काम करणेसाठी कार्यारंभ आदेशसुध्दा देण्यात आलेले आहेत. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 21/03/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली. (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा 5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम ऐ.एस.कोल्हे, ठेकेदार यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट ऐ.एस.कोल्हे ठेकेदार यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली. (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही. (4) ई-निविदाचे सहपत्रासोबत ऐ.एस.कोल्हे ठेकेदार यांचे एम.जी.पी., ठाणे यांचे नोंदणी प्रमाणपत्र पुर्ण स्वाक्षरीसह उपलब्ध नाही,

4) केहाळ तांडा:- 1) येथील कामासाठी ग्रामपंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 17/06/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. त्यानुसार त्यांना आदेश क्रमांक 177, दिनांक 02/05/2015 अन्वये काम करणेसाठी कार्यारंभ आदेशसुध्दा देण्यात आलेले आहेत. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 27/05/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली? (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा 5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम एस.एस.राठोड, ठेकेदार यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट एस.एस.राठोड, ठेकेदार यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली. (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम

ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही.

5) कात्नेश्वर:- 1) येथील कामासाठी ग्रामपंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 21/05/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. परंतु, ग्रामपंचायतीस काम मंजुर केल्याचे व कार्यारंभ आदेश दिल्याची प्रत उपलब्ध नाही. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 04/05/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली. (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा 5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम डी.जी.चव्हाण, ठेकेदार यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट डी.जी.चव्हाण, ठेकेदार यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली? (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही.

6) साळापुरी:- 1) येथील कामासाठी ग्रामपंचायतीने सदरचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यासाठी दिनांक 04/04/2015 रोजी B-1 निविदा खरेदी करुन सादर केली. त्यानुसार त्यांना आदेश क्रमांक 23, दिनांक 08/04/2015 अन्वये काम करणेसाठी कार्यारंभ आदेशसुध्दा देण्यात आलेले आहेत. परंतु, यापुर्वीच ग्रामपंचायतीचे वतीने श्री. गंगाधर परशुराम निवडुंगे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी DSC वापरुन ई-निविदा दिनांक 21/03/2015 ला प्रसिध्द केली. ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा तयार करुन प्रसिध्द केली नाही व ई-निविदा आधीच प्रसिध्द केली असतांना B-1 निविदा कशी मंजुर केली? (2) तसेच ग्रामपंचायतीकडील जमा 5 टक्के लोकवाटा व 95 टक्के अनुदान असे एकत्रीत रक्कम ग्रामपंचायतीमार्फत ठेकेदारांस वाटप होणे आवश्यक आहे. ई-निविदेनुसार सदरचे काम मंजीरी ट्रेडर्स, ठेकेदार यांना मंजुर केलेले असतांना केलेल्या कामाची रक्कम ग्रामपंचायतीस देय होत असतांना परस्पर थेट मंजीरी ट्रेडर्स, ठेकेदार यांना कार्यकारी अभियंता यांनी 95 टक्के कशी मंजुर करुन वाटप केली? (3) तसेच ग्रामपंचायतीने त्यांचे स्तरावरुन लोकवाट्यामधुन 5 टक्के रक्कम ठेकेदारास प्रदान केली किंवा नाही, याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लोकवाटा रक्कमेतुन वाटप रक्कमेवर आयकर, व्हॅट, कामगार कल्याण निधी, विमा, ठेव रक्कमही कपात केली नाही.

7) रुपये 3.00 लक्ष पेक्षा जादा कामासाठी विभागीय स्तरावर ई-निविदा मागवुन त्यामधुन पात्र ठेकेदारास काम वाटप करणे आवश्यक असतांना प्रत्येक ग्रामपंचायतीकडील कामासाठी ग्रामपंचायतीना बी-1 निविदेवर काम मंजुर केले. सदरचे काम मंजुर करण्यापुर्वीच ग्रामपंचायतनिहाय ई-निविदा प्रसिध्द केली. ती एकत्रीत करणे आवश्यक आहे.

8) परिशिष्ठ क्रमांक 6 अनुक्रमांक 3 ते 9 वरील प्रमाणकांचे अनुषंगाने संचिका, अंदाजपत्रके उपलब्ध करुन दिली. परंतु, कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिल्या नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार कामे झाली किंवा कसे? याबाबतची तपासणी करता आली नाही.

9) विभागाकडे दिनांक 03/01/2014 च्या बैठकीतील इतिवृत्तांतानुसार रुपये 1,30,01,369/- निधी अखर्चीत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे या अखर्चीत निधीमधुन या कामांचा खर्च होणे अभिप्रेत असतांना जिल्हाधिकारी यांचेकडुन याच लेखाशिर्षातंर्गत नव्याने निधी मागवुन खर्च केला आहे.

10) शासन निर्णय क्रमांक जिवर/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 अन्वये व विमा संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे पत्र क्रमांक प्रविसी 2303/ सहविमा/जिप/संकिर्ण अभियांत्रीकी/एम 2, दिनांक 27/06/2003 व विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि-1801/सिआर/जिप/संकिर्ण, दिनांक 30/07/2008 अन्वये कंत्राटी कामास प्रारंभ करण्यापुर्वी संबंधीत कंत्राटदाराने कंत्राटी मुल्याच्या शेकडा 100 पैसे दराने कामाचा विमा योग्य विमा पत्राखाली शासकिय विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे उतरविला.

याची खात्री करावी, असे स्पष्ट नमुद आहे. तथापि, विम्याची रक्कम सुरुवातीस भरुन घेण्यात आली नाही. ठेकेदारांना देय असलेल्या रक्कमेतुन कामाच्या मुल्याकंनानुसार रक्कम कपात केली आहे. वास्तविक पहाता अंदाजपत्रकांच्या रक्कमेनुसार 1 टक्का भरणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार अनुज्ञेय होणारी 1 टक्का रक्कम व प्रत्यक्षात वसुल केलेली रक्कम वजा जाता शिल्लक रक्कम गणना करुन विमा संचालनायाकडे पाठविणेत याव्यात.

11) बहुतांश कामे पुर्ण झाल्यावर ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेतल्यांच्या अहवाल आहे. परंतु, कामावर कोणकोणते साहित्य कोणत्या कंपनीचे, संख्या, किंमत याबाबतचा तपशील अहवालात उपलब्ध नाही.

**3.515 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत ग्रामपंचायत सावरगांव मौजे खानापूर (बंगला) तालुका हिंगोली नळ पाणी पुरवठा योजना कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,78,550/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रकातील बाब निहाय नमुद केलेले दर शासन दरसुचीनुसार असल्याबाबत शासन दरसुची (DSR) उपलब्ध करुन न दिल्याने त्याची मंडळास खातरजमा करता आली नाही. तसेच सत्यता पडताळता आली नाही.

2) लेखा संहिता नियम 168 प्रमाणे योजनेच्या कामाची उपविभागीय अभियंता 100 टक्के व कार्यकारी अभियंता 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

3) योजनेचे कामासाठी पाणी उपसा मोटारचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 चे नियम 100 प्रमाणे प्रस्तुत कामाची नोंद नमुना नंबर 42 प्रकल्प नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक विकास 1098/प्र.क्र.43/कराधन-1 दिनांक 05/05/1998 अन्वये व महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22 नुसार दिनांक 01/04/2012 पासुन मूल्यवर्धीत कर कपातीचा दर 5 टक्के करण्यात आला आहे. परंतू, कामाच्या एकुण रूपये 9,78,550/- मुल्यांकन रकमेवरील रूपये 48,927/- कपात करण्यात आलेली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे देयकातून 2.24 टक्के आयकर रुपये 21,919/- वसुल करुन शासन खाती भरणा केलेली नाही.

6) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बि.सी.ए.-2009 /प्र.क्र.108/ कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे अंदाजपत्रकीय किंमतीच्या 1 टक्के कामगार उपकर रूपये 9,785/- वसुल करुन शासन खाती भरणा करावा.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये निविदा कामाच्या मुल्याच्या शेकडा 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी, अशी कार्यवाही झालेली नाही व देयकातून विमा रक्कम रुपये 9,785/- कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा केलेली नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्षबा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापूर्वी साहित्य चाचणी घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104 (अ)/ पापु-7, दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार लोकवर्गणी जमा केलेनंतर शासन निधीचा पहिला हप्ता 30 टक्के, दुसरा हप्ता 30 टक्के व तिसरा हप्ता 30 टक्के याप्रमाणे वितरीत करावयाचा आहे. उर्वरित 10 टक्के निधी पुढील एक वर्षे योजना यशस्वीरित्या चालवल्यानंतर अदा करावयाचा आहे. योजना एक वर्षे यशस्वीरित्या चालवल्याबाबतची कागदपत्रे संचिकेत नाहीत. त्यामुळे 10 टक्के शासन निधी प्रदानाबाबत पडताळणी करता आली नाही.

10) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनिज 10/1009/प्र.क्र.309 ख(1), दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजावर प्रति घ.मी. दर रूपये 70.68/- प्रमाणे स्वामीत्व धनाची देयकातुन रक्कम कपात केली नाही. सदरील रक्कम कपात करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

11) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 17/03/2010 अनुक्रमांक 8.2 प्रमाणे विहीराची खोद काम झाल्यावर क्षमता चाचणी (Yeild Test) करून भुजल विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

12) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पाधो-1109/ प्र.क्र.104(अ)/पापु-7, दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक 7.9 प्रमाणे भूसंपादन दानपत्र खरेदी खताची नोंदणीची कार्यवाही कागदपत्रे संचिकेत दिसुन आली नाही.

**3.516 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत ग्रामपंचायत खेर्डा, तालुका हिंगोली नळ पाणी पुरवठा योजना कामातील अनियमितता व जादा प्रदानबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 32,35,473/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखा संहिता नियम 168 प्रमाणे योजनेच्या कामाची उपविभागीय अभियंता 100 टक्के व कार्यकारी अभियंता 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/ पंरा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. पूर्तता करुन दर्शवावी.

3) योजनेचे कामासाठी पाणी उपसा मोटारचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही. ती उपलब्ध करुन दर्शविण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक विकास1098/प्र.क्र.43/कराधन-1, दिनांक 05/05/1998 अन्वये व महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22 दिनांक एप्रिल 2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासुन मूल्यवर्धीत कर कपातीचा दर 5 टक्के करण्यात आला आहे. परंतू, कामाच्या एकुण मुल्यांकन रक्कम रूपये 32,35,473/- वरील कमी कपातीची रक्कम रूपये 1,18,359/- कपात करण्यात आलेली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे देयकातून 2.24 टक्के आयकर एकुण मुल्यांकन रकमेवरील अनुज्ञेय कपात रक्कम 72,474/- रक्कमेपैकी रूपये 28,635/- रक्कम कपात केलेली असुन कमी कपात रक्कम रुपये 43,839/- वसुल करुन शासन खाती भरणा केलेली नाही.

6) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बि.सी.ए.-2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे अंदाजपत्रकीय किंमतीच्या 1 टक्के कामगार उपकर एकुण मुल्यांकन रकमेवरील अनुज्ञेय कपात रक्कम रूपये 32,354/- रक्कमेपैकी रूपये 29,001/- रक्कम कपात केलेली असुन कमी कपात रक्कम रुपये 3,353/- वसुल करुन शासन खाती भरणा केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये निविदा कामाच्या मुल्याच्या शेकडा 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी, अशी कार्यवाही झालेली नाही व देयकातून कमी कपात केलेली विमा एकुण मुल्यांकन रक्कमेवरील अनुज्ञेय कपात रक्कम रूपये 32,354/- रक्कमेपैकी रूपये 29,001/- रक्कम कपात केलेली असुन कमी कपात रक्कम रुपये 3,353/- वसुल करुन शासन खाती भरणा केलेली नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्षबा.स., दिनांक 18/11/2009 नूसार साहित्य वापरण्यापूर्वी साहित्य चाचणी घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104 (अ)/ पापु-7, दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार लोकवर्गणी जमा केलेनंतर शासन निधीचा पहिला

हप्ता 30 टक्के, दुसरा हप्ता 30 टक्के व तिसरा हप्ता 30 टक्के याप्रमाणे वितरीत करावयाचा आहे. उर्वरित 10 टक्के निधी पुढील एक वर्षे योजना यशस्वीरित्या चालवल्यानंतर अदा करावयाचा आहे. योजना एक वर्षे यशस्वीरित्या चालवल्याबाबतची कागदपत्रे संचिकेत नाहीत. त्यामुळे 10 टक्के शासन निधी प्रदानाबाबत पडताळणी करता आली नाही.

10) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनिज 10/1009 /प्र.क्र. 309 ख(1), दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजावर प्रति घ.मी. दर रूपये 70.68/- प्रमाणे स्वामीत्व धनाची देयकातुन रक्कम कपात केली नाही. सदरील रक्कम कपात करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

11) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 17/03/2010 अनुक्रमांक 8.2 प्रमाणे विहीराचे खोदकाम झाल्यावर क्षमता चाचणी (Yeild Test) करून भुजल विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

**3.517 जलयुक्त शिवार योजने अंतर्गत कामाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत एकूण 7 कामांवर रक्कम रूपये 16,91,955/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 197 नुसार नमुना क्रमांक 161 (1) नुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी नोंदविलेल्या मोजमापाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असताना 5 टक्के तपासणी केलेली नाही.

2) मक्तेदाराने बी-1 फॉममधील माहीती परीपुर्ण भरलेली नसल्यामुळे मक्तेदाराची क्षमता कशाच्या आधारे निर्गमित केली? मक्तेदाराने बी-1 फॉममधील स्वाक्षरी व प्रमाणकारील स्वाक्षरी यामध्ये तफावत आहे. याबाबत खुलासा करावा.

3) जिल्हयात तालुकानिहाय व गावनिहाय असलेल्या हातपंपाचे तपशिलवार हिस्ट्रीशिट व नोंदवही ठेवलेली नाही.

4) कामाच्या गावाचा कृती अराखड्यात समावेश करून त्यास ग्रामसभेत मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार ग्रामसभेची मान्यता घेतल्याबाबत ग्रामसभेचा ठराव संचिकेत दिसुन आला नाही.

**3.518 वर्धीत वेग/भारत निर्माण योजना अंतर्गत सन 2006-2007 ते 2009-2010 मधील मंजुर व हाती घेतलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेची कामे नियोजना अभावी अदयाप अपुर्ण असल्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल न झाल्यामुळे शासनाचे वायफळ खर्चाबाबत रूपये 346.17 लक्ष.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,46,17,000/- खर्च नोंदविणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे सन 2015-2016 या कालावधीचे लेखापरीक्षणात भारत निर्माण योजने अंतर्गत 2005 ते मार्च 2009 या कालावधी नळ पाणीपुरवठा योजनेची मंजुर व हाती घेतलेली कामे विहीत कालावधीत पुर्ण करणे आवश्यक होते. परंतु विभागाने उपलब्ध केलेल्या कामाच्या विवरणपत्राची तपासणी केली असता योजना पुर्ण करण्याचा कालबध्द कार्यक्रम आखुन त्याची अंमलबजावणी काटेकोर न केल्यामुळे योजना विहीत मुदतीत पुर्ण होवुन त्याचा लाभ मिळालेला नाही परिणामी योजना पुर्ण करण्यास विलंब झालेला असल्याने व झालेली कामे वापरात न आल्याने योजनेवर झालेला खर्च रक्कम रुपये 346.17 लक्ष वायफळ झाल्याचे (Wastefulexpenditure) लेखापरीक्षणात स्पष्ट होते. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येतात.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र. 126/पापु-13, 1) दिनांक 02/08/2008 मधील मार्गदर्शक सुचना 8 नुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी संबंधीत जिल्हा परिषदेच्या नियंत्राखाली ग्रामस्तरावरुन ग्राम आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येते त्यामुळे योजनेचे काम गुणवत्तापुर्वक व विहीत मुदतीत होते किंवा नाही याची देखरेख व

सनियंत्रण करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (ग्रापापु) याचीं आहे. तसेच कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी सतत कामाचा आढावा घेणे आवश्यक होते, परंतु आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दर महिन्यानी योजनेच्या कामाचा आढावा घेवुन काही अडचणी असल्यास स्थानिक पातळीवर सोडवाव्यात तर अधीक्षक अभियंता तथा विभागीय समन्वयक अधिकारी, भारत निर्माण यांनी दर दोन महिन्यांनी कामाचा आढावा घेवुन शासनाच्या मार्गदर्शन मागविणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) विभागाने उपलब्ध विवरणपत्रानुसार सदर कामे अपुर्ण राहण्याची कारणे खालीलप्रमाणे नमुद केलेली आहे.

1) ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमुळे

2) समितीच्या अंतर्गत वादामुळे

3) न्यायालयीन प्रकरणामुळे

4) विदयुत कनेक्शनमुळे

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-3404,प्र.क्र. 126,3/पापु-13, दिनांक 02/08/2008 मधील मार्गदर्शक सुचना 7 नुसार एखाद्या योजनेचे काम सर्वाथाने पुर्ण करण्याच्या दृष्टीने एखाद्या विभागाची परवानगी न घेता काम हाती घेतले असल्यास व त्यामुळे कामास विलंब झाल्यास काम सुरु करणा-या कार्यकारी अभियंतास व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय, दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट नमुद आहे. याबाबत मार्गदर्शक सुचना 11 अन्वये सदर कामे विहीत मुदतीत करुन घेण्याची सर्व जबाबदारी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांची आहे.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जस्वप्र-2007,वित्तीय सल्लागार,प्र.क्र.1,4/पापु–11, दिनांक 06/12/2007 मध्ये दिलेल्या सुचना प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधीका-यांची कर्तव्ये व जबाबदा-या नमुद केलेले आहे. प्रकल्पाचा निधी हा ग्रामपंचायत निधीचा भाग असल्याने त्याचा जमा खर्चाची तपासणी सुध्दा ग्रामपंचायत अधिनियमानुसार होणे बंधनकारक आहे. त्यामुळे उपलब्ध निधीची तपासणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), गटविकास अधिकारी, पंचायत समिती व विस्तार अधिकारी यांचेमार्फत करण्यात यावी सदर तपासणीमध्ये काही अनियमितता आढळून आल्यास समितीच्या सदस्यांना जबाबदार धरुन रक्कम वसुल करावी असे नमुद असताना संबधीत कर्मचारी अधिका-यांने शासन नियमाप्रमाणे आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. परिणामी योजना पुर्ण करण्यास विलंब झालेल्या असल्याने व झालेली कामे वापरात न आल्याने योजनेवर झालेला खर्च रक्कम रूपये 346.17 लक्ष वायफळ झाल्याचे (Wastefulexpenditure) लेखापरीक्षणात स्पष्ट होते.

5) सन 2005 ते 2010 या कालावधीत भारत निर्माण योजनेचे अंतर्गत अपुर्ण कामे झालेल्या खर्चाचा व अद्याप अपुर्ण स्थितीत असलेल्या कामाची दक्षता व गुण नियंत्रक विभागाकडुन तांत्रिक तपासणी करूण आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

उपरोक्त अक्षेपाची अनुपालन सादर करावे तो पावेतो रूपये 346.17 लक्ष तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

**3.519 नळपाणीपुरवठा योजना कामामध्ये झालेल्या गैरव्यवहार/अपहार रक्कमेच्या वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पैशाचा एवढया मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला असतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 36 (1) (2) नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

2) विभागाने 14 प्रकरणातील रक्कमेच्या वसुलीबाबत योग्य ती दक्षता घेतलेली दिसून येत नाही. तसेच असा गैरव्यवहार पुन्हा होऊ नये, म्हणून कोणतेच नियोजन केलेले दिसून येत नाही.

3) मुल्यांकनापेक्षा जादा रकमेचे आहरण करुन अपहार हा पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सचिव व अध्यक्ष यांनी केलेला आहे.

**3.520 मुल्यांकनापेक्षा जास्तीची रक्कम उचल केलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** भारत निर्माण कार्यक्रम / राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचीव यांनी योजनेच्या झालेल्या मुल्यांकनापेक्षा जास्तीची रक्कम उचलल्याचे आढळून आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत निर्माण कार्यक्रम / राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचीव यांनी योजनेच्या झालेल्या मुल्यांकनापेक्षा जास्तीची रक्कम उचलल्याचे आढळून आलेले आहे. संबंधित अध्यक्ष व सचिव यांनी योजनेच्या कामासाठी धनादेशाव्दारे रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना रोख स्वरूपात आहरीत केलेली रक्कम कामासाठी वापरल्यानंतर उर्वरीत रक्कम तात्काळ समितीच्या बँक खातेमध्ये जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 36(1) व (2) नुसार वसूलीची कार्यवाही व सदर प्रकरणे पून्हा घडू नयेत, याबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**3.521 पाणीपुरवठा विभाग नैसर्गीक आपत्ती लेखाशिर्षा अंतर्गत केलेल्या कामामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात नैसर्गीक आपत्ती या लेखाशिर्षाखाली टंचाई काळात झालेल्या कामाची तपासणी केली असता त्यावर रुपये 12,44,208/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराचे देयकातून आयकराची रक्कम 2.30 टक्के प्रमाणे रुपये 28,613/- कपात करणे आवश्यक असतांना देयकातून कपात झालेली नाही. आयकराची रक्कम वसूल करून चलनाद्वारे भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

2) विवरणातील अनुक्रमांक 6,8,9 या कामात डी वाटरींग या बाबी वर पंप चालवल्याचे दर्शवून रक्कमा अदा करण्यात आलेले आहे. परंतु सदरील पंप प्रत्यक्ष किती तास चालविण्यात आले त्याचे लॉगबुक न ठेवल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही. त्यामुळे सदर बाबीवर करण्यात आलेला खर्च योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची प्रगती नोदवही न.नं.23 मध्ये ठेवण्यात येईल या नोंदवहीमध्ये कामाचा संपुर्ण तपशील नमुद करण्यात येईल व काम सुरु केल्याच्या तारखेपासून समाप्तीच्या तारखेपर्यत सर्व तपशील असेल वेळोवेळी केलेल्या कामाचा तपशील त्यामध्ये नमूद करण्यात येईल. अशी तरतूद असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना 69 मध्ये घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) परिशिष्ट-1 अनुक्रमांक 5 व 7 वरील पाईपलाईनच्या कामावर बसविण्यात आलेले पाईप चे टेस्टींग रिपोर्ट घेण्यात आलेले नाही. सदर चाचणी अहवाल नसतांना काम कसे पुर्ण झाले या बाबत खुलासा करुन पाईप चे टेस्टींग रिपोर्ट घेउन पाईप योग्य दर्जाचे असल्या बाबत खात्री करुन पुर्तता दर्शवावी.

6) अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 13/07/2017 अन्वये मागणी करून देखील अर्धसमासाचे उत्तर देण्यात आलेले नाही.